# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक – २८
## सभावृत्तांत

दिनांक – २०.३.२०१९ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च- २०१९ ची मासिक मा. महापालिका सभा बुधवार दिनांक २०.३.२०१९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.राहुल गुलाब जाधव महापौर
२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव उपमहापौर
३) मा.दत्तात्रय बाबूराव साने
४) मा.सारीका शिवाजी सस्ते
५) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
६) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
७) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
८) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
९) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
१०) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
११) मा.सागर बाळासाहेब गवळी
१२) मा.लांडगे रवि लक्ष्मण
१३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव
१४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
१५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
१६) मा.फुगे भिमाबाई पोपट
१७) मा.अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१८) मा.सावळे सिमा रविंद्र

,

१९) मा.लोंढे नम्रता योगेश

२०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२१) मा.लांडे विक्रांत विलास

२२) मा.गीता सुशिल मंचरकर

२३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२४) मा.अनुराधा गणपत गोरखे

२५) मा.केशव हनुमंत घोळवे

२६) मा.मंगला अशोक कदम

२७) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२८) मा.अश्विनी भिमा बोबडे

२९) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३०) मा.संजय बबन नेवाळे

३१) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३२) मा.भालेकर प्रविण महादेव

३३) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३४) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३६) मा.घोलप कमल अनिल

३७) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३८) मा.चिखले सचिन तुकाराम

३९) मा.यादव मीनल विशाल

४०) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४१) मा.राजू मिसाळ

४२) मा.बाबर शर्मिला राजू

४३) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४४) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

,

४५) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४६) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४७) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४८) मा.करुणा शेखर चिंचवडे

४९) मा.भोईर सुरेश शिवाजी

५०) मा.अपर्णा निलेश डोके

५१) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५२) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५३) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

५४) मा.जयश्री वसंत गावडे

५५) मा.कोमल दिपक मेवानी

५६) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५७) मा.सुलक्षणा राजू धर

५८) मा.शाम गणपतराव लांडे

५९) मा.सुजाता सुनिल पालांडे

६०) मा.कदम निकीता अर्जुन

६१) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६२) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६३) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

६४) मा.पाडाळे निता विलास

६५) मा.काळे उषा दिलीप

६६) मा.पवार मनिषा प्रमोद

६७) मा.बारणे अर्चना तानाजी

६८) मा.अभिषेक गोविंद बारणे

६९) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७०) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

,

७१) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७२) मा.निलेश हिरामण बारणे

७३) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७४) मा.दर्शले रेखा राजेश

७५) मा.कलाटे राहुल तानाजी

७६) मा.कामठे तुषार गजानन

७७) मा.कस्पटे संदिप अरुण

७८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८०) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८१) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८२) मा.कुटे निर्मला संजय

८३) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८४) मा.आंगोळकर सागर सुनिल

८५) मा.लोखंडे चंदा राजू

८६) मा.आशा धायगुडे-शेंडगे

८७) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

८८) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

८९) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९०) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९१) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

९२) मा.नवनाथ दत्तू जगताप

९३) मा.संतोष बबन कांबळे

९४) मा.सोनवणे शारदा हिरेन

९५) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

९६) मा. वाबळे संजय मल्हारराव

,

याशिवाय मा. संतोष पाटील - अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.सवणे-प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे,मा.अष्टीकर, मा.झगडे- सहा.आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर**- उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नगरसचिव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. लोकसभेची आदर्श आचारसंहिता सध्या सुरु आहे. आचारसंहितेच्या अनुषंगाने शासनाचे काही निर्देश प्राप्त झालेले आहेत ते मी मा.सभागृहाच्या निदर्शनास आणुन देत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाना सर्व सभा, बैठका, स्थानिक स्वराज्य संस्थामधील सर्वसाधारण सभा, विवीध समित्यांच्या विषय समित्या इत्यादी बैठका ज्या कायदेशिर बंधनकारक आहे त्या घेता येतील. परंतु नेमणुका, अनुदान खर्च अथवा आर्थिक सहाय्य मंजूर किंवा आदा करण्यात येवू नये. कोणत्याही नवीन कामास मंजूरी देता येणार नाही तसेच मतदारावर कोणत्याही प्रकारचा प्रभाव पडेल असे कोणतेही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. अशाप्रकारचे निर्देश आहेत. (शासनाकडील आचारसंहिता निर्देशाचे वाचन केले.)

**मा.विलास मडिगेरी** - मा.महापौर साहेब, जम्मु काश्मिर मधील नियंत्रण रेषेवर झालेल्या चकमकीत सीमा सुरक्षा दलाचे ७ जवान शहिद, भारतीय वायुदलाचे हेलिकॉप्टर जम्मू काश्मिरच्या बडगाम जिल्हयात दुर्घटनाग्रस्त होवून वायुदलाचे पायलट अनिल मांडवगणेसह ५ जवान शहिद, छत्रपती शिवाजी टर्मिनन्स मुंबई येथील पूल दुर्घटनेमध्ये ६ नागरिकाचे निधन तसेच मनोहर पर्रिकर - माजी संरक्षणमंत्री तसेच गोवा राज्याचे मुख्यमंत्री, ह.भ.प.शकुंतला ज्ञानोबा गव्हाणे- पिंपरी वाघेरे येथील ज्येष्ठ माता, कु.कौशिक राजू धर- सन्मा.नगरसदस्या सुलक्षणा शिलवंत धर यांचे सुपूत्र, नितीन नामदेव मळेकर- सामाजिक कार्यकर्ते चिखली, केसरबाई कोडींबा मोरे- चिखली, तुकाराम सपकाळ, नारायण गुरव, बाळासाहेब विनोदे, दामोदर विनोदे, कै.पारुबाई गणपत भालेकर- तळवडे, तुकाराम भोसले, विश्वनाथ भिंगारे- सामाजीक कार्यकर्ते, हिरालालजी मेवाणी - सन्मा.नगरसदस्या कोमल मेवाणी यांचे सासरे यांचे निधन झाल्याने तसेच शहरातील ज्ञात-अज्ञात दिवंगत व्यक्तिना श्रध्दांजली

,

वाहण्यात यावी व सदर सभा पुढील महासभेपर्यंत तहकूब करावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.विकास डोळस** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर**- सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गोव्याचे मुख्यमंत्री आणि या देशाचे संरक्षण मंत्री आदरणीय मनोहरजी पर्रिकर साहेब यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे. त्यांचे दुःखद निधनामुळे निश्चितच भाजपच्या परीवारास खुप मोठ दु:ख झालेल आहे. खरतर मनोहर पर्रिकरांच्या बाबतीत सांगायच म्हणलतर त्यावेळेला ते संरक्षण मंत्री असताना शहरामधल्या विवीध प्रश्नामध्ये त्यांनी लक्ष घातल होतं. मग तो दिघीचा रेडझोन असेल, आमच्या तळवडेचा रेडझोन असेल, भोसरीचा रेडझोन असेल. विशेष म्हणजे आमच्या शहरामधील विवीध प्रश्न आदरणीय मा.शरदचंद्रजी पवार यांच्या माध्यमातून त्यांनी खुप मोठे मार्गी लावण्याचे ठरवले होतं. हे असताना अचानक त्यांना संरक्षण पदावरुन कमी करुन पुन्हा एकदा गोव्याचे मुख्यमंत्रीपद दिले. खरतर त्यांचा स्वभाव खुप चांगला होता. माझीही त्यांच्याशी रेडझोनच्या माध्यमातून आमच्या काही संघटनेचे मार्फत मिटींग झाली. खुप चांगला स्वभाव, मनमिळावू स्वभाव त्यांचा होता. असं कोणीही म्हणणार नाही की जो देशाचा संरक्षण मंत्री असताना सुध्दा त्यांनी कधी स्वत:च्या अंगावर राजकीय वलय येवू दिल नाही. सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये वागणारे त्यांचे नेतृत्व आपल्यातून निघून गेल्यामुळे विशेष करुन त्यांच्या परीवारास खुप मोठ दु:ख झालेल आहे. हे दु:ख सहन करण्याची ताकद परमेश्वर त्यांना देओ अशी मी माझ्या पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने, राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने, सभागृहाच्या वतीने मी त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो.

**मा.एकनाथ पवार**- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर परवा मनोहर भाईंच निधन झाल, निश्चितच राजकारणामध्ये उतूंग व्यक्तीमत्वामध्ये जावुन आपण कशा पध्दतीच असल पाहीजे तस वागल पाहीजे याच मुर्तीमंत उदाहरण म्हणजे मनोहर भाई. खरतर त्यांच संरक्षण मंत्रीपदी असो किंवा गोवा राज्याचे तीनवेळा मुख्यमंत्री पदी असो एक सर्वसामान्य माणसासारख कितीही मोठया पदावर गेलतर सर्वसामान्य माणसामध्ये मिळून असणार व्यक्तीमत्व होतं ते मनोहरभाई. खरतर

,

दत्ताकाकानी त्यांचा उल्लेख केला आहे की या शहराच्या संरक्षणमंञ्याच्या संबंधित असलेल्या अनेक विभागाबाबत मनोहरभाईनी आपल्याला खुप पॉझिटीव्हली मदत केली. ज्यावेळेस ते संरक्षणमंत्री पदावरुन पुन्हा एकदा गोव्याचे मुख्यमंत्री झाले मला असं वाटत की तो जो आठ-दहा दिवसाचा काळ जर संपला असतातर काही विषय हे कधीच संपले पण असते ही एकंदरीत परिस्थिती आहे. खरतर मनोहरभाईंचा आणि माझा खुप जवळचा संबंध होता, मागच्या लोकसभेच्या काळामध्ये मी आणि मनोहरभाई अमेठीमध्ये पाच ते सहा दिवस एकत्रीत होतो. खरतर त्यावेळेस ते गोव्याचे मुख्यमंत्री होते. गोव्याचा मुख्यमंत्री सुध्दा एखादया मारुती सारख्या किंवा झेन सारख्या गाडीमध्ये चार-चार तास उन्हा तान्हामध्ये फिरणारा खरतर पहीला माणुस. आपण बघतो की साधा नगरसेवक जरी झालातरी त्याच्या वागण्या, चालण्या, बोलण्यामध्ये त्यांच्या गाडयामध्ये निश्चितच बदल होतो. पण तीस-पस्तीस वर्षे राजकारणामध्ये राहून सुध्दा एक साध व्यक्तिमत्व म्हणजे मनोहरभाईंच्या निमीत्तान एक मनापासून ठरवल पाहीजे की आपण कितीही मोठा झालो पण माणसाचा माणुस मनोहरभाईंच्या रुपान ज्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत बघीतला आणि खरतर त्यांची मागच्या आठ-दहा दिवसाची परिस्थिती बघितलीतर गोवा राज्याचा ज्यावेळेस अर्थसंकल्प सादर होत होता, सलाईन लावून एखाद भाषण एखादा मुख्यमंत्री करतो तर मला असं वाटत की शेवटच्या क्षणापर्यंत या देशाची सेवा करणारे व्यक्तीमत्व आपल्या सगळयाच्या मधुन खरतर हारवलेल आहे. त्यांना श्रध्दांजली देत असताना आपणही खरतर निर्णय केला पाहीजे की आपल्या आचारणामध्ये, आपल्या वागण्यामध्ये, आपल्या सांगण्यामध्ये, बोलण्यामध्ये मनोहर भाईंचा आदर्श आपण डोळयासमोर ठेवलातर मला अस वाटत की ख-या अर्थान त्यांना श्रध्दांजली देण्यासारख होइल. मी आपल्या सर्वांच्या वतीने मनोहरभाईना भावपुर्ण आदरांजली अर्पण करतो आणि मा.महापौरांना विनंती करतो की ही सभा दि.२०/४/२०१९ रोजी पर्यंत तहकूब करावी.

**मा.महापौर** – सर्व उपस्थित सन्मा.सभागृह. नगरसेवक, नगरसेवीका, पदाधिकारी गोवा राज्याचे मुख्यमंत्री व माजी संरक्षण मंत्री मनोहरजी पर्रिकर साहेब यांचे दु:खद निधन झालेल आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्या प्रमाणे मुख्यमंत्री पदावर असो किंवा संरक्षण खात्याच्या मंत्री पदावर असो तरी देखील अगदी ग्राऊंड लेव्हलनी काम करणारे मनोहरजी पर्रिकर यांचा  सर्वानाच परीचय आहे. ख-या अर्थांन संपुर्ण भारत देशाच्या तळागाळातील जनतेला मनोहरजी पर्रिकर हे माहित होते. त्यांच्या जाण्यान सर्वानाच दु:ख होणं साहजीक आहे. त्यांना सर्व सभागृहाच्या वतीन श्रध्दांजली अर्पण करुन त्याच बरोबर

,

हिरालालजी मेवाणी यांनाही श्रध्दांजली अर्पण करुन आजची सभा शनिवार दिनांक २०/४/२०१९ रोजी दु.१.४५ पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

------

(राहुल गुलाब जाधव)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक – २८

सभावृत्तांत

(दिनांक २०/३/२०१९ ची तहकूब सभा)

दिनांक – २०.४.२०१९ वेळ – दुपारी १.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.३.२०१९ ची तहकूब मा. महापालिका सभा शनिवार दिनांक २०.४.२०१९ रोजी दुपारी १.४५ वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.राहुल गुलाब जाधव महापौर

२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.साधना अंकुश मळेकर

५) मा.दत्तात्रय बाबूराव साने

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.बुर्डे सुवर्णा विकास

९) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१०) मा.गायकवाड निर्मला मनोज

११) मा.सागर बाळासाहेब गवळी

१२) मा.बारसे प्रियांका प्रविण

१३) मा.लांडगे सारिका संतोष

,

१४) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१५) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१६) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१७) मा.सावळे सिमा रविंद्र

१८) मा.लोंढे नम्रता योगेश

१९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२०) मा.गीता सुशिल मंचरकर

२१) मा.मंगला अशोक कदम

२२) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२३) मा.अश्विनी भिमा बोबडे

२४) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२५) मा.संजय बबन नेवाळे

२६) मा.एकनाथ रावसाहेब पवार

२७) मा.भालेकर प्रविण महादेव

२८) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

२९) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३०) मा.घोलप कमल अनिल

३१) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३२) मा.प्रमोद कुटे

३३) मा.शैलजा अविनाश मोरे

३४) मा.बाबर शर्मिला राजू

३५) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

३६) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३७) मा.ढाके नामदेव जनार्दन

,

३८) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

३९) मा.करुणा शेखर चिंचवडे

४०) मा.भोईर सुरेश शिवाजी

४१) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४२) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४३) मा.जयश्री वसंत गावडे

४४) मा.कोमल दिपक मेवानी

४५) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४६) मा.शाम गणपतराव लांडे

४७) मा.सुजाता सुनिल पालांडे

४८) मा.पवार मनिषा प्रमोद

४९) मा.बारणे अर्चना तानाजी

५०) मा.अभिषेक गोविंद बारणे

५१) मा. अॅड.भोसले सचिन सुरेश

५२) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

५३) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

५४) मा.दर्शले रेखा राजेश

५५) मा.कलाटे राहुल तानाजी

५६) मा.कामठे तुषार गजानन

५७) मा.चोंधे आरती सुरेश

५८) मा.कस्पटे संदिप अरुण

५९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

६०) मा.सविता बाळकृष्ण खुळे

६१) मा.सुनिता हेमंत तापकीर

,

६२) मा.कुटे निर्मला संजय

६३) मा.लोखंडे चंदा राजू

६४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

६५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

६६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

६७) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

६८) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

६९) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

७०) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

७१) मा.नवनाथ दत्तू जगताप

७२) मा.संतोष बबन कांबळे

७३) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

७४) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

७५) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

७६) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. संतोष पाटील - अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.चितळे, मा.आष्टीकर, मा.दुरगुडे, - सहा.आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर**- उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू**- मा.महापौर साहेब, छत्तीसगड येथे नक्षलवादी हल्ल्यात चार जवान शहीद तसेच नितीन बनकर - पिंपरी चिंचवड लघुउदयोजक संघटनेचे माजी अध्यक्ष यांचे निधन, भीमा मांडवी - छत्तीसगडचे आमदार यांचे दहशतवादी हाल्ल्यात मृत्यूमुखी, बाळासाहेब रामभाऊ भोईर -चिंचवड गाव येथील ज्येष्ठ नागरीक यांचे निधन, जमुनाबाई शंकर चिंचवडे -चिंचवड गाव येथील ज्येष्ठ

,

माता यांचे निधन, विजय ज्ञानेश्वर चिंचवडे -चिंचवड गाव येथील सामाजिक कार्यकर्ते यांचे निधन, दिलीप रघुनाथ नखाते -रहाटणी काळेवाडी येथील यांचे निधन, बाजीराव बुर्डे, उल्हास बुर्डे, राजाराम बोराटे यांचे निधन झाल्याने श्रध्दांजली वाहण्यात यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.तुषार हिंगे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर**- सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.विलास मडिगेरी** - मा. महापौर साहेब, आजची सभा सोमवार दि.२०/५/२०१९ रोजी दुपारी १.३० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.राजेंद्र लांडगे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर**- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने आजची सभा सोमवार दि.२०/५/२०१९ दु.१.३० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

---------

**(राहुल गुलाब जाधव)**

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी -४११ ०१८.

,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक – २८

सभावृत्तांत

(दिनांक २०/३/२०१९ व दि.२०/४/२०१९ (दु.१.४५) ची तहकूब सभा)

दिनांक – २०.५.२०१९ वेळ – दुपारी १.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.४.२०१९ ची तहकूब मा. महापालिका सभा सोमवार दिनांक २०.५.२०१९ रोजी दुपारी १.३० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ६) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ७) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ८) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ९) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| १०) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| ११) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| १२) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| १३) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |

,

१४) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१५) मा.सागर बाळासाहेब गवळी

१६) मा.गोफणे अनुराधा  देविदास

१७) मा.बारसे प्रियांका प्रविण

१८) मा.अजित दामोदर गव्हाणे

१९) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२०) मा.लांडगे सारिका संतोष

२१) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२२) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२३) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२४) मा.फुगे भिमाबाई पोपट

२५) मा.लोंढे नम्रता योगेश

२६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२७) मा.लांडे विक्रांत विलास

२८) मा.गीता सुशिल मंचरकर

२९) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३०) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३१) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३२) मा.अनुराधा गणपत गोरखे

३३) मा.केशव हनुमंत घोळवे

३४) मा.मंगला अशोक कदम

३५) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३६) मा.अश्विनी भिमा बोबडे

३७) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

,

३८) मा.संजय बबन नेवाळे

३९) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४०) मा.भालेकर प्रविण महादेव

४१) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४२) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४३) मा.घोलप कमल अनिल

४४) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४५) मा.पवळे सुमनताई मधुकर

४६) मा.चिखले सचिन तुकाराम

४७) मा.जावेद रमजान शेख

४८) मा.यादव मीनल विशाल

४९) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५०) मा.प्रमोद कुटे

५१) मा.राजू मिसाळ

५२) मा.शैलजा अविनाश मोरे

५३) मा.बाबर शर्मिला राजू

५४) मा.अमित राजेंद्र गावडे

५५) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५६) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५७) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५८) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५९) मा.ढाके नामदेव जनार्दन

६०) मा.करुणा शेखर चिंचवडे

६१) मा.भोईर सुरेश शिवाजी

,

६२) मा.अपर्णा निलेश डोके

६३) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६४) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६५) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६६) मा.कोमल दिपक मेवानी

६७) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६८) मा.सुलक्षणा राजू धर

६९) मा.शाम गणपतराव लांडे

७०) मा.सुजाता सुनिल पालांडे

७१) मा.योगेश मंगलसेन बहल

७२) मा.कदम निकीता अर्जुन

७३) मा.संथ्दीप बाळकृष्ण वाघेरे

७४) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७५) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७६) मा.नढे विनोद जयवंत

७७) मा.पाडाळे निता विलास

७८) मा.काळे उषा दिलीप

७९) मा.कोकणे संतोष अंकुश

८०) मा.पवार मनिषा प्रमोद

८१) मा.बारणे अर्चना तानाजी

८२) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८३) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

८४) मा.बारणे माया संतोष

८५) मा.निलेश हिरामण बारणे

,

८६) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८७) मा.दर्शले रेखा राजेश

८८) मा.कलाटे राहुल तानाजी

८९) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९०) मा.ममता विनायक गायकवाड

९१) मा.कामठे तुषार गजानन

९२) मा.कस्पटे संदिप अरुण

९३) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९४) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९५) मा.सुनिता हेमंत तापकीर

९६) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९७) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९८) मा.कुटे निर्मला संजय

९९) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१००) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०१) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०२) मा.मुंढे उषा अंकुश

१०३) मा.कदम शशिकांत गणपत

१०४) मा.लोखंडे चंदा राजू

१०५) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०६) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०७) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०८) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०९) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

,

११०) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१११) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११२) मा.नवनाथ दत्तू जगताप

११३) मा.सोनवणे शारदा हिरेन

११४) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११५) मा. वाबळे संजय मल्हारराव

११६) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११७) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११८) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११९) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा. संतोष पाटील - अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.पाटील-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पवार- उपसंचालक नगररचना,मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.निकम-सह शहर अभियंता, मा.सवणे- प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.आष्टीकर, मा.लोणकर- सहा.आयुक्त, मा.राऊत - प्र.सहा.आयुक्त, मा.तांबे- कार्यकारी अभियंता, मा.गोफणे- आरोग्य अधिकारी, मा.ऐवले- समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा. महापौर**- उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके** - मा.महापौर साहेब, आजची सभा गुरुवार दिनांक ६/६/२०१९ रोजी दु.२.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

,

**मा.महापौर-** आजची सभा गुरुवार दिनांक ६/६/२०१९ रोजी दु.२.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-------

(राहुल गुलाब जाधव)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक – २८

सभावृत्तांत

(दिनांक २०/३/२०१९ व दि.२०/४/२०१९(दु.१.४५) व २०/५/२०१९ (दु.१.३०) ची तहकूब सभा)

दिनांक – ६.६.२०१९ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/५/२०१९ (दु.१.३०) ची तहकूब मा. महापालिका सभा गुरुवार दिनांक ६/६/२०१९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.राहुल गुलाब जाधव महापौर

२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.दत्तात्रय बाबूराव साने

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.वसंत प्रभाकर बोराटे

९) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास

११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

,

१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.ठंडे लक्ष्मण धोंडू

१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१६) मा.गायकवाड निर्मला मनोज

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२२) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२४) मा.फुगे भिमाबाई पोपट

२५) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२६) मा.सावळे सिमा रविंद्र

२७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२८) मा.लांडे विक्रांत विलास

२९) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३०) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३१) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३२) मा.अनुराधा गणपत गोरखे

३३) मा.मंगला अशोक कदम

३४) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३५) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

,

३६) मा.संजय बबन नेवाळे

३७) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३८) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३९) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४०) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४१) मा.घोलप कमल अनिल

४२) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४३) मा.पवळे सुमनताई मधुकर

४४) मा.चिखले सचिन तुकाराम

४५) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४६) मा.बाबर शर्मिला राजू

४७) मा.अमित राजेंद्र गावडे

४८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५१) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५२) मा.ढाके नामदेव जनार्दन

५३) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५४) मा.करुणा शेखर चिंचवडे

५५) मा.भोईर सुरेश शिवाजी

५६) मा.अपर्णा निलेश डोके

५७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५९) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

,

६०) मा.जयश्री वसंत गावडे

६१) मा.कोमल दिपक मेवानी

६२) मा.सुलक्षणा राजू धर

६३) मा.शाम गणपतराव लांडे

६४) मा.सुजाता सुनिल पालांडे

६५) मा.योगेश मंगलसेन बहल

६६) मा.कदम निकीता अर्जुन

६७) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६८) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६९) मा.पाडाळे निता विलास

७०) मा.काळे उषा दिलीप

७१) मा.कोकणे संतोष अंकुश

७२) मा.पवार मनिषा प्रमोद

७३) मा.बारणे अर्चना तानाजी

७४) मा.अभिषेक गोविंद बारणे

७५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७६) मा. अॅड.भोसले सचिन सुरेश

७७) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७८) मा.बारणे माया संतोष

७९) मा.निलेश हिरामण बारणे

८०) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८१) मा.दर्शले रेखा राजेश

८२) मा.कलाटे राहुल तानाजी

८३) मा.कलाटे मयूर पांडुरंग

,

८४) मा.कामठे तुषार गजानन

८५) मा.चोंधे आरती सुरेश

८६) मा.कस्पटे संदिप अरुण

८७) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८८) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८९) मा.सुनिता हेमंत तापकीर

९०) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९१) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९२) मा.कुटे निर्मला संजय

९३) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९४) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९५) मा.आंगोळकर सागर सुनिल

९६) मा.मुंढे उषा अंकुश

९७) मा.कदम शशिकांत गणपत

९८) मा.लोखंडे चंदा राजू

९९) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१००) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०१) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०२) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०३) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०४) मा.नवनाथ दत्तू जगताप

१०५) मा.संतोष बबन कांबळे

१०६) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१०७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

,

१०८) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०९) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११०) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा. संतोष पाटील - अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.पाटील- प्र.शहर अभियंता, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.निकम- सह शहर अभियंता,मा.तुपे- सह शहर अभियंता (वि), मा.सवणे- प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा.इंदलकर, मा.झगडे,मा.लोणकर,मा.बोदडे, मा.खोत- सहा.आयुक्त, मा.राऊत,मा.दांगट - प्र.सहा.आयुक्त, मा.पाटील- प्राचार्य,औ.प्र.केंद्र, मा.शिंदे- प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे- प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.डॉ.साळवे- अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.चव्हाण, .कुलकर्णी,मा.जुंधारे,मा.गट्टुवार,मा.पुजारी,मा.भोसले, मा.लडकत, मा.ओंभासे, मा.वाघुंडे मा.पाटील - कार्यकारी अभियंता,मा.माने- लेखाधिकारी पीएमपीएमएल, मा.गोफणे- आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा. महापौर-** सन्मा.सभागृह उपस्थित मा.नगरसेवक, मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार बंधु, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, झारखंड मध्ये नक्षलवाद्यांबरोबर झालेल्या चकमकीत सीमा सुरक्षा दलाचे २ जवान शहिद, पद्मश्री पुरस्कार प्राप्त जेष्ठ अभिनेते दिनयार कॉन्ट्रॅक्टर यांच निधन, वत्सला दामोदर कवीतके, देवराम वाघू साने – वय ७५, गणेश मच्छिंद्र गावडे यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

**मा.राजेंद्र गावडे** – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.नगरसचिव –** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएम हॉस्पीटल मध्ये डीन म्हणुन डॉ.वाबळे हे

,

रुजू झालेले आहेत मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी त्यांची सभागृहास ओळख करुन देणेत यावी.

( मा.डॉ.वाबळे, अधिष्ठता  यशवंतराव चव्हाण रुग्णालय यांनी सभागृहास त्यांची ओळख करुन दिली.)

**मा.आशा धायगुडे- शेंडगे –** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी याठिकाणी एका वेगळया विषयांवरती  चर्चा करण्याची परवानगी मागीतली होती त्यांस परवानगी दिलेली आहे. त्याबद्दल धन्यवाद. मागील १५ दिवस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कामकाज करीत असताना  ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची  जयंती महानगरपालिकेच्या  कलात्मक धोरणांचा  अंमल  करतो. आणि ती जयंती  लाटत नसतो तर घरगुती कलात्मक कलेला संधी देण्यासाठी आपण तो कार्यक्रम करीत असतो.आज अनेक विषय होत असताना आपले विरोधी पक्षनेते  दत्ता साने यांनी अनेक वाभाडे काढले त्यांचा मी प्रथमत: मी याठिकाणी निषेध करते.ख-या अर्थाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर म्हणजे अनेक मंदिर देशामध्ये  बांधत असताना त्यावेळी अनेक सुंदर असे घाट बांधत असताना त्यावेळी ज्यांनी अनेक ठिकाणी त्या अहिल्यादेवी  किंवा ज्यांनी आयुष्यात अनेक  दु:खांना सामोरे गेले त्यांचे सासरे वारले, पती वारले,त्यांचा मुलगा वारला,मुलगी वारली,जावई वारला हे सगळं दु:ख असताना देखील समाज हितासाठी समाजकारण करीत असताना एक समाज कारणाची एक राणी म्हणुन आमची अहिल्यादेवी त्या अहिल्यादेवीची जयंती महानगरपालिकेच्या माध्यमातून नेहमीच होत असायची आणि आजही होत असते. परंतु त्या अहिल्यादेवीच्या पुतळयाला मेघडंबरी नव्हती त्या मेघडंबरीचा कार्यक्रम २ वर्षापूर्वी केला आणि मेघडंबरीनंतर कुठे तरी उद्घघाटन सोहळयाला साधा नको चांगला करु असे तत्कालीन महापौर धराडेताईंच कौतूक केल पाहिजे.त्यांनीच त्यावेळेला मदत केली. असे करण्यास काही हरकत नाही एक चांगली परंपरा महानगरपालिकेच्या अहिल्यादेवीचे स्मरण करण्यासाठी अहिल्यादेवीचा इतिहास समाजापर्यंत पोहचवण्यासाठी आपण याठिकाणी हे सगळ करण लागतो आणि म्हणून त्याठिकाणी हा कार्यक्रम सुरु झाला. सांगवीतल्या एका कार्यक्रमामध्ये ती एका संस्थेच्या नगरसेविकेची संस्था आहे. अहो नांव घ्यायची भीती का वाटते,आणि जर का  नांवच माहिती नव्हते तर वाभाडे काढण्याची काय कारण आहे.जर का नांव माहित नसेल ती नगरसेविका कोण,  नांव माहित नसेल तर मला पत्रकार परीषद घेऊन सांगावे लागते की, दुसरी कोणी नगरसेविका नसून मीच आहे. नंतर

,

आमच्यावरती वाभाडे काढले की,त्या संस्थेला याठिकाणी महानगरपालिकेकडुन त्या संस्थेच्या नावावरती वतीने लाखो रुपये जातात का? ही पत्रकार परिषद. अहो आपण एक विरोधी पक्षनेते म्हणुन आपण जबाबदारीचे पद सांभाळता.आपण एक विरोधी पक्षनेता आहात याचा विचार सारासार पक्षाने केला पाहिजे. जर आपल्याला याची माहिती नसेल तर माहिती घ्यावी त्यानंतर पत्रकार परिषद घेतली पाहिजे.असा एक साधा नियम जर हे आपले १३३ नगरसेवक आपल्या समाजाच्या विश्वासावरती निवडुन येतो, त्यांच्या विश्वासास पात्र राहून निवडुन येतो. यांनी अशी पत्रकार परिषद घेणे कितपत योग्य आहे. धर्मदाय आयुक्तांकडे नोंद आहे का? हे नोंदणीचे परिपत्रक याठिकाणी आहे त्या संस्थेची नोंदणी आहे आणि दुसरा विषय त्या संस्थेच्या अकौंटवरती महापालिकेच्या वतीने माध्यमातून लाखो रुपये गेले. एकही रुपया त्या संस्थेच्या अकौंटवर आलेला नाही असे ३ तारखेच्या स्टेटमेंटवरती आहे मा.महापौर साहेब, का असे केलं म्हणजे आमच्या समाजाला यांचा विरोध आहे ज्या चांगल्या भावनेतून आम्ही पुण्यश्लोक अहिल्यादेवीनी केलेले काम हे जग विसरु शकत नाही त्या धनगर समाजाची मी एक अहिल्यादेवीचा अंश आहे म्हणुन मी या सभागृहामध्ये येत आहे आणि मला निश्चितपणे अभिमान आणि स्वाभीमान आहे धनगर समाजाची असण्याचा आणि धनगर आहे म्हणुन हे सगळं करीत असताना माझे समाज बांधव असतील,अनेक नगरसेवक असतील, अनेक सहकारी याठिकाणी येत असतात परंतु हुशार व कुशाग्र बुध्दी असणा-या आमच्या दत्ता काकांना याठिकाणी खर्चामध्ये मोठा गफला आहे, गफला हा शब्द वापरते. काय आहे गफला, धनगर समाजाचा सोहळा २०१५-१६ खर्च आहे १ लाख १० हजार, दुसरं वर्ष २०१६-१७ खर्च ३ लाख ६५ हजार, खर्च का वाढला याचा प्रश्न तुम्हांला पडला असेल तर त्याठिकाणी महिला महोत्सव आयोजित केला होता त्या महिला महोत्सवाला ७० हजार रु.देण्यात आले.तिसरे वर्ष २०१७-१८ खर्च आहे ५ लाख ६२ हजार याठिकाणी खर्च वाढला कारण त्याठिकाणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावरती आयोजित केलेलं नाटक आणि त्याच उद्घघाटन सन्मा.नरेंद्र मोदी यांनी केल होत ते नाटक आपण या सभागृहामध्ये दाखवलं होत त्यामुळे त्याचा खर्च वाढलेला होता. तसेच २०१८-१९ खर्च ३ लाख २० हजार, आणि चौथं वर्ष १ लाख ७० हजार एकही रुपया या संस्थेच्या नावांवर आलेला नाही. समजा त्याठिकाणी ज्यांच्या गायनाचा कार्यक्रम घेतात त्यांच्या नावांवर तो चेक जात असतो महापालिका कोणत्याही संस्थेच्या हातात देत नाही, किंवा नगरसेवकाच्या हातातही देत नाही, मग संस्था

,

अटॅच का? असाही प्रश्न काही जणांना नक्कीच पडेल. याठिकाणी संस्था ऍटच करण्याच एकच कारण होतं सन्मा.महापौर साहेब,सन्मा.आयुक्त साहेब संस्थेच्या मार्फत समाज गोळा करणं,त्याठिकाणी लागणारं, चहा, पाणी, नाष्टा, झेंडे जे जे समाजासाठी लागतात ते उपलब्ध करुन देण्यासाठी कोणी तरी असलं पाहिजे आणि त्या माध्यमातून त्याठिकाणी कार्यक्रम घेतला जातो. सन्मा.महापौ सो. याठिकाणी अत्यंत दु:ख आणि खेद वाटतो की,फक्त आम्ही मागासवर्गीय समाजाचे आहोत. आम्ही अत्यंत गरीब घराण्यात जन्म घेतलेला आहे. कोणत्या राजघराण्यातून राजकन्या म्हणुन सभागृहात आलेलो नाही. अत्यंत प्रामाणिकपणे काम आम्ही आमच्या प्रभागामध्ये करतो आणि तिथल्या लोकांचा विश्वास जिंकुण आम्ही या महानगरपालिकेच्या पवित्र मंदीरामध्ये पाऊल ठेवतो. कोणताही राजकीय वारसा नसून आमचे वडील महापौर होते, ना आमचे आजोबा आमदार होते, ना खासदार होते अत्यंत सामान्य घरातील, सामान्य कुटूंबातील आमचे वडील अल्फा लावल मध्ये नोकरी करायचे त्या कुटूंबातून मी आलेली आहे. आज मी याठिकाणी असेल, सीमा सावळे असतील यांनी अनेक विषय मागील ५ वर्ष या सभागृहामधील काढले एकही विषय काढले तर पुरावे दिले नव्हते का सन्मा.महापौर साहेब, आम्ही कोणताही विषय काढला तर १०० टक्के पुरावे देतो. आणि मगच पत्रकार बंधु तुम्ही सुध्दा बातमी छापता. तुमचा आमच्या कामाला विरोध आहे का, अत्यंत प्रामाणिकपणे आम्ही काम केलेले आहे. प्रामाणिकपणे काम करतो. पत्रकार बंधुनो, कोणी तरी येतो आणि सांगतो की, याठिकाणी काही तरी होतय आणि त्याची चौकशी करा म्हणुन सांगतो आणि पक्षनेता लगेच पत्रकार परिषद घेतो. एखादया मागास समाजाच्या लोकांची इज्जत काय चव्हाटयावर आणता का, आपण कोणत्या पध्दतीने वागता याचा आपण विचार केला पाहिजे. मा.महापौर साहेब, आमच्या समाजाचे काम करण्याची जबाबदारी आमची आहे. आज या गोष्टीच्या माध्यमातून निश्चितपणे विरोधी पक्षनेता म्हणुन जे काम करतात त्या विरोधी पक्षनेत्यांना सांगायचं आहे की, महानगरपालिकेचे ३ हजार ५०० कोटीचे बजेट आहे. आमच्या अहिल्यादेवीच्या जयंतीच्या कार्यक्रमाचा खर्च २, ३ ते ४ लाखाचा असतो. आपल्या सगळयांच्या अहिल्यादेवी आहेत परंतु ज्यावेळेस एखादा समाज इथं ठामपणे बोलतो त्या अहिल्यादेवीच्या कार्यक्रमाच्या ३ लाखामध्ये गफला होतो. ३ हजार ५०० कोटी यांना दिसत नाहीत. तिथे सेटेलमेंट होतात, सेटेलमेंट हा शब्द वापरते मी, सेटेलमेंट होतात म्हणुन याठिकाणी काही बोलत नाहीत. ३ हजार ५०० कोटीच्या बजेटवर काही बोलायचं नाही, स्मार्ट सिटीच्या

,

विषयावर मला बोलायचे नाही परंतु माझ्या अहिल्यादेवीच्या कार्यक्रमात आरोप करतात. ही कोणती पध्दत आहे यांची इथं आपल्या शहरामध्ये कला,सांस्कृतीक कार्यक्रम राबवित असतो अत्यंत चांगल्या प्रकारचे काम महानगरपालिकेच्या माध्यमातून केले जात आहे.आणि याठिकाणी सगळया महापुरुषांच्या जयंत्या गुण्या गोविंदाने केल्या जातात त्यामध्ये काही चुका होत असतात पण मला आठवत नाही की, की पेपरबाजी केली. माझ्या अहिल्यादेवीच्या कार्यक्रमाच्या ३ लाखांमध्ये गफला दिसतो. आणि हिंमत असेल तर माझ्या बाबतीत जे काही आरोप करायचे असतील ते करा मग सांगते मग सांगते अहिल्यादेवीची जयंती ३१ तारखेला होती म्हणुन तोंड आवरले एका शब्दाने बोलले नाही. तुम्ही पुरावे द्या आणि मग बोला. तुम्हांला सिध्द करा म्हणुन सांगितलं आहे की, आशा शेंडगेच्या अकौंट मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेव होळकर या संस्थेच्या अकौंटवर जर काही पैसे आले असतील तर आशा शेंडगे राजकीय संन्यास घेईल. मा.महापौर साहेब, मी आपल्याला पत्र देणार आहे हे सगळयांनी बघा आणि याच्यावर महापालिकेकडुन काही रक्कम आली नसेल तर दत्ता काका साने यांनी राजकीय संन्यास घ्यावा. आशा शेंडगे बोलती ते करतेच. आमच्या अहिल्यादेवीच्या जयंतीच्या पैशावरती आमचं घर किंवा कुटूंब चालतं एवढया तुच्छ बुध्दीचे आम्ही नाहीत हे लक्षात त्यांनी ठेवावे.सन्मा.महापौर साहेब, त्यांना सांगा की, आमच्या समाजाच्या लोकांची जाहीर माफी मागावी.

**मा. नामदेव ढाके** – मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. १७ व्या लोकसभेच्या लोकशाहीचा उत्सव पार पडला आणि मला याठिकाणी सांगायला आनंद वाटेल की, या १७ व्या लोकशाहीचा उत्सव पार पडला असताना निवडणुक आयोग आणि आपल्या सर्व अधिका-यांनी या लोकशाहीचा उत्सव अतिशय पारदर्शी आणि चोखपणे केला प्रथमता मी या लोकशाही उत्सवामध्ये काम करणा-या सर्व अधिकारी आणि निवडणुक आयोग यांचे अभिनंदन करतो. आणि १७ व्या लोकसभेची निवडणुक होत असताना देशासमोर आपल्या देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंदभाई मोदी यांनी गेल्या ५ वर्षामध्ये सर्वसामान्य लोकांना केंद्रबिंदू मानुन सर्व समाजातील घटकांना केंद्रबिंदू मानून त्यांच भलं करायच, त्यांच्यासाठी योजना आणायच्या आणि देशाचा विकास करायचा,देशाचं संरक्षण करायचं, कृषी क्षेत्रामध्ये असेल,कामगार क्षेत्रामधील असेल ,नगरविकास खात्यामध्ये असेल सर्व खात्यांमध्ये असेल त्यांनी चांगल्या पध्दतीचं काम केल आणि म्हणुन एक सामान्यातला सामान्य गरीबातला गरीब आणि

,

श्रीमंतातला श्रीमंत माणुस सुध्दा या लोकशाहीच्या उत्सवामध्ये त्याठिकाणी सकाळपासून लाईनमध्ये लागला. आणि आदरणीय देशाचे पंतप्रधान यांनी आवाज दिला होता की, एक बार फिर मोदी सरकार तो नारा याठिकाणी ऐकला आणि या १७ व्या लोकसभेमध्ये बहुमताने या देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्रभाई मोदी यांना याठिकाणी बसवलं मी प्रथमता या लोकशाहीच्या उत्सवामध्ये देशातील आणि पिंपरी चिंचवड शहरातील सर्व मतदाराचं मी याठिकाणी आभार व्यक्त करतो. आणि या देशामध्ये पुन्हा आदरणीय पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांचे सरकार आलं त्यांच्या अभिनंदनाचा ठराव याठिकाणी मांडतो. आणि या ५ वर्षामध्ये राज्य सरकार असेल,केंद्र सरकार असेल यांच्या माध्यमातून अनेक योजना याठिकाणी आलेल्या आहेत त्याचा उल्लेख मी याठिकाणी करणार नाही. सर्व सामान्यांना या योजनाबद्दलची माहिती आहे. सर्वसामान्यांच्या खात्यामध्ये पैसे द्यायचे असेल, अगदी पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरामध्ये जो विषय असेल तर तो केंद्र सरकारच्या माध्यमातून त्यांनी मेट्रोचं काम याठिकाणी केलं. पिंपरी पर्यंतची मेट्रो निगडी पर्यंत नेण्याचं काम त्यांनी केलं. तसेच डॉ.वाबळे साहेबांनी सांगितलं की, यशवंतराव चव्हाण हॉस्पिटल मध्ये पी.जी. इन्सिटयुट करण्यात आली. त्याची सुध्दा केंद्र सरकार, राज्य सरकारच्या माध्यमातून आपल्याला परवानगी मिळाली.या सभागृहामध्ये अनेक विषय केले. आणि म्हणुन पुन्हा याठिकाणी लोकांनी भारतीय जनता पार्टीवर विश्वास ठेवला आणि विश्वासाला पात्र ठेवून भारतीय जनता पार्टीने जी हाक दिली इस बार ३०५ याठिकाणी केलेलं आहे मी याठिकाणी सर्व कार्यकर्ते,नगरसेवक यांनी काम केलं आणि देशांमध्ये आदरणीय नरेंद्रभाई मोदी यांचे सरकार आलं त्यांच मी अभिनंदन करतो.धन्यवाद.

**मा.प्रियांका बारसे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. १७ वी लोकसभेचा उत्सव संपुर्ण देशामध्ये साजरा केला. आम्ही या निवडणुकीमध्ये किंवा राजकीय क्षेत्रामध्ये पहिल्यांदाच आलो आणि लोकसभेच्या प्रचारामध्ये पहिल्या टप्प्यापासून आम्ही सुध्दा सहभागी होतो. हा उत्सव सर्वांनी आनंदाने साजरा केला. आपणही या विजयाचा एक वाटा आहोत हा एक मोठा आनंदच आहे. तो निश्चितच या क्षणी आनंदच आहे. त्यासाठी सर्वात प्रथम अभिनंदन केलं पाहिजे ते आपले पंतप्रधान नरेंद्रभाई मोदीजी, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमितजी शहा,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस,प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे, पिंपरी चिंचवड शहराचे शहराध्यक्ष

,

लक्ष्मणभाऊ जगताप,सर्व आमदार,खासदार,पदाधिकारी,नगरसेवक या सर्वांच्या कार्याचं आपल्याला हे फलीत मिळालेलं आहे. आज आपण लोकसभेचा उत्सव साजरा केलेला आहे. खरं तर आपल्याला हे स्वप्न वाटतंय की, एक हाती सत्ता भारतीय जनता पार्टीने मिळवलेली आहे. खरं तर असं म्हणता येईल की, जनता विकासाच्या मुद्दयालाच पाठींबा देते. परत एकदा या जनतेने आपल्या सर्वांना दाखवून दिलेलं आहे की, नोटाबंदी,सर्जीकल स्ट्राईक्स, जीएसटी सारखे कठीण आणि मोठे निर्णय घेऊन आपण किती सक्षम आहोत याची त्यांनी जनतेला जाणीव करुन दिली. आणि अशा जबाबदार असलेल्या पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या पाठीशी जनता खंबीरपणे उभी राहिली. या लोकसभा निवडणुकीच्या वेळेस असा अनुभव आला की, एका बाजुला आदरणीय पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी आणि एका बाजूला सर्व विरोधक म्हणजे ही एकतर्फी लढाई आहे की,काय असा क्षणभर आम्हांला अनुभव येत होता. या अनुभवाच्या पाठीमागे हजारो,कोटयावधी लोकांचे आशीर्वाद त्यांना मिळालेले आहेत. त्यांच्या जाहीरनाम्यातील मुद्दे पाहिले तर ते मुद्दे इतके स्ट्राँग आहेत की, जनतेला सुध्दा त्यांनी विचार करायला भाग पाडलेले आहे. काश्मीर मधील ३७० कलम आणि ३५ अ सारखं कलम हटवण्यात येईल हा एक जाहीर संदेश जनतेला त्यांनी देणं आणि स्वत:वर संकट ओढवून घेणं ही एक पंतप्रधानांची खेळी म्हटलं तरी चालेल. पण त्यांनी याच्यामध्ये खूप मोठे यशस्वी झाले आणि आता त्यांनी लगेच सुरुवात केली आहे की, अमित शहा गृहमंत्री झाल्यानंतर त्यांनी लगेच काश्मीरचा दौरा केला. आदरणीय पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी हे दुस-यांदा निवडुन आले त्यावेळेस त्यांनी म्हणले की,संरक्षण खात्यामध्ये जे काम करतात त्यांच्या मुलांसाठी त्यांनी शिष्यवृत्ती लगेच जाहीर केली. म्हणजे संरक्षण खातं सुध्दा किती सजग आहे हे त्यांनी आपल्याला दाखवून दिलेले आहे. गॅस योजना,आयुष्यमान भारत, पंतप्रधान आवास योजना अशा अनेक योजना आहेत की, ज्या ठिकाणी महिला वृध्द व गरीब, शेतकरी या तीन मुद्यांनाच त्यांनी हात घातलेला आहे. आणि हे मुद्दे आपल्याला विकासाचा एक पायंडा दाखवून देणारा आहे. अशा या भारतीय जनता पार्टीची मी एक खारुताई म्हणुन उभे राहीले आणि मला याठिकाणी दोन शब्द त्यांच्यासाठी बोलण्याची संधी मिळालेली आहे यासाठी मी खरंच स्वत:ला सौभाग्यशाली समजते. आणि भारतीय जनता पार्टी आणि सहयोगी पक्षाचे मी अभिनंदन करते.

,

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. १७ व्या लोकसभेला ख-या अर्थानं मोदी सरकारने विकास कामे केली आणि त्यामुळे अभूतपुर्व असं यश मिळालेलं आहे. ज्या नेत्याला सगळयांनी टारगेट केलं होत. आणि त्यांना घरी बसवण्याच्या नादात त्यांनी बाशिंग सुध्दा बांधलेलं होतं. परंतु भारतातील बहुसंख्य सभासदांनी , भारत देशातील सर्व मतदारांनी जागरुक होऊन एक दिलाने,एक संघ होऊन भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी जे काम केलं आणि अभूतपुर्व काम केलं आणि ३५० चा आकडा पार केला. ख-या अर्थानं विकास केला जे शेजारचे देश कुरापती करीत होते त्याला ठोस निर्णय घेणारा नेता होता तो म्हणजे मोदीजी जे कुरापती करीत होते त्याला ठोस उत्तर दिलं आणि ४८ तासाच्या आत आपला सैनिक अभिनंदन यांना सुध्दा परत घेतलं. आणि ख-या अर्थानं देशाची सेवा कोण करील, रक्षण कोण करील तर ते फक्त आदरणीय नरेंद्रजी मोदी सरकार आणि म्हणुन महाराष्ट्रामध्ये म्हणत होते की, यावेळेस सरकार येणार नाही याठिकाणी ४१ खासदारांचा आकडा पार केला. आणि बहुमताने सरकार आणलं. विरोधी पक्षाने सांगितलं होतं की, ईव्हीएम मशिनचा घोटाळा आहे. लोकशाही राहणार नाही पण ख-या अर्थानं लोकशाही राहीली. आणि या लोकशाहीच मी अभिनंदन करतो तसेच जे अधिकारी वर्ग आहे त्यांनी जे सहकार्य केले आहे, पोलीस यंत्रणेनेही चोखपणे उत्तर दिलेले आहे. आणि खरी लोकशाही आणली. म्हणून मी मोदी सरकारचं अभिनंदन करतो.आणि ज्यांना चहावाला,चौकीदार म्हणुन हिणवलं पण तेच शेवटच्या लोकांपर्यंत गेले आणि या चहावाला आणि चौकीदार यांच मतदान भारतीय जनता पार्टीला झालं. मी एक भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता म्हणुन एनडीए सरकारचं अभिनंदन करतो.

**मा.उषा उर्फ माई ढोरे** – मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी अभिनंदनाचा ठराव करीत असताना खरं तर आपण जुने कार्यकर्ते आहोत. आणि एवढा मोठा विजय मिळाल्यानंतर त्यांच कौतूक होणं आपल्या सारख्या सभागृहाला हे आपले कर्तव्य समजते. म्हणुनच १७ वी लोकसभा निवडणुक झाली आणि आपल्याला ऐकायला मिळायचं काय तुमचे मोदी सरकारने जीएसटी लावले,नोटबंदी केली असे अनेक प्रकारचे वेगवेगळे आरोप करुन विरोधकांनी प्रचार सुरु केला. आणि मला कधी वाटले नाही की, आपले मोदी सरकार सुटतात म्हणुन. आणि हे करीत असतांना मोदी साहेबांनी गोर गरीब असो, मध्यमवर्गीय असो, श्रीमंत असो, व्यापारी असो त्यांची मनं जिंकलेली होती. आणि त्यांची मनं जिंकल्यानंतर

,

लोकांना खरा प्रॉब्लम काय आहे. पहिल्या प्रथम त्यांनी आवास योजना चालू केली.गोर गरीब या लोकांना कुठं तरी निवारा मिळाला पाहिजे. जगण्याला काय लागतं निवारा लागतो, अन्न लागत आणि ही नाळ मोदी साहेबांनी जनतेची ओळखली आणि म्हणुनच गोर गरीबांना घरे देण्याचं अतिशय चांगल काम या मोदी सरकारने अतिशय चांगल्या प्रकारे केलं. त्याच बरोबर शेतक-यांना दिलासा येईल असा निर्णय त्यांनी केंद्रामध्ये घेतले. शेतकरी वर्ग सुध्दा मोदी साहेबांना खुप मानायला लागला. त्याच बरोबर  विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती चालू केली. ग्रामीण भागामध्ये प्रत्येक घरांमध्ये गॅसची सोय केली. मोदी साहेबांनी मोठ मोठया योजना करीत असताना गोर गरीबांच्या घरात जाऊन पोहोचले आणि त्यांच्यासाठी देशाच्या पंतप्रधानांनी काय केले पाहिजे. हे त्यांनी अभ्यास केला आणि तळागाळातील लोकांसाठी योजना केल्या. पाश्चात्य देशातील नेते हे आपल्या देशांकडे कधीही चांगल्या नजरेने बघत नव्हते. पण आज मोदी साहेबांच्या रुपाने ते आपल्या देशाच्या पुढे,पुढे करायला लागले आहेत. मोदी साहेबांचा पक्ष खुप मतांनी निवडुन आला. आणि अभिनंदनाचा वर्षाव सर्वांनी केला. किंग मोदी,किंग मोदी ही घोषणा आपण ऐकतं होतो. ती सत्यात उतरली आणि मोदी साहेबांच्या पासून अनेक गोर गरीबांना, धार्मीक असतील, शैक्षणिक असतील या सगळया लोकांना काही तरी मोदी साहेबांकडुन अपेक्षा आहेत आणि त्या पूर्ण करायच्या आहेत त्यासाठी मोदी साहेबच पाहिजेत. आणि म्हणुन एकटया मोदी साहेबांनी एवढया मोठया माणसांची मनं  जिंकली. म्हणतात ना मनुष्य जन्म कशासाठी असतो मनुष्य जन्म घेतल्यानंतर आपल्याला अनेक चांगल्या गोष्टी करता येतात. आणि हे भारत रत्न महापुत्र म्हणुन आपल्याला मोदी साहेबांच्या रुपाने हे आपल्या देशाचं नशिब मी माझ्या स्वत:च्या वतीने मा.नरेंद्र मोदी साहेबांच अभिनंदन करते आणि अशीच संधी त्यांना यापुढे मिळत जावो. अशी अपेक्षा करते.

**मा.नायर प्रेमकुमार उर्फ बाबू –** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज नामदेव ढाके यांनी अभिनंदनाचा ठराव प्रस्तुत केला त्याला अनुमोदन देताना या लोकशाहीचा उत्सव गेल्या तीन महिन्यांपासून या भारत देशामध्ये मोठया प्रमाणात सर्व लोकांना बरोबर घेऊन एक मोठा उत्सव साजरा केला गेला. आणि जगभरातून  या लोकशाहीच्या उत्सवाकडे  लोकांच लक्ष होतं. गेल्या ५ वर्षात नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली एक विकासाचा अजेंडा घेऊन देश चालवला आणि या निवडणुकीचे वैशिष्ठये पाहिलं तर या देशामध्ये अनेक निवडणुका पाहिल्या गेल्या

,

आहेत. या निवडणुकीचं वैशिष्ठये पाहिलं तर आतापर्यंतच्या निवडणुकीमध्ये पहिले जाती धर्माला महत्व देवुन अनेक पक्ष राजकारण करत होते. ते या निवडणुकीमध्ये संपुष्टात आल आहे. जाती धर्माला महत्व नाही फक्त विकासाला महत्व आहे. आणि भ्रष्टाचार करणा-याची समाजात कुठलीही किंमत राहणार नाही. हे या निवडणुकीमध्ये सिध्द झालेलं आहे. नरेंद्र मोदीजी गेल्या ५ वर्षामध्ये केलेलं काम आणि पुढच्या ५ वर्षामध्ये करावयाच्या कामांचा अजेंडा लोकांसमोर जेंव्हा त्यांनी प्रस्तुत केलं मला वाटतं की, सर्वसामान्य लोकापासून म्हणजे गोर गरीब असेल, कष्टकरी असेल, शेतकरी वर्ग असेल,कामगार वर्ग असेल या सर्वांनी नरेंद्र मोदीजी ही व्यक्ती म्हणुन आणि भारतीय जनता पार्टी पक्ष म्हणुन विश्वास ठेवुन एवढया मोठया संख्येने सदस्य पार्लमेंटमध्ये निवडुन दिलेले आहेत.याठिकाणी अभिनंदनाचा ठराव मांडत असताना पुणे जिल्हयातून जे निवडुन आलेले खासदार पुण्याचे माजी पालकमंत्री गिरीषजी बापट, खासदार श्रीरंग बारणे, डॉ.अमोल कोल्हे,सुप्रिया सुळे यांना पण या सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो आणि नरेंद्र मोदीजींना दिर्घ आयुष्य लाभो आणि त्यांच्या हातून या देशाचा विकास होवो आणि त्यांच्या हातून भारत निर्माण करण्याची ताकद त्यांना मिळो. आपल्या सर्वांच्या सदीच्छा पिंपरी चिंचवड शहराच्या नागरीकांच्या वतीने सदीच्छा देतो. मला बोलण्याची जी संधी दिली त्याबद्दल धन्यवाद. जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा. ॲड.सचिन भोसले -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. संपुर्ण जगाचं लक्ष या भारताच्या लोकसभेकडे लागलं होतं. निवडणुकीच्या दरम्यान अनेक घडामोडी या शहरात पहायला मिळालेल्या आहेत. विकास पुरुष म्हणुन मा.नरेंद्रभाई मोदी यांच्याकडे सगळा देश पहातो आहे. गेल्या ५ वर्षामध्ये त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे जो विकास झाला त्या विकासाला नागरिकांनी मत दिलेलं आहे. पिंपरी चिंचवडचा विषय असेल, मावळ मतदार संघाचा खास करुन विषय असेल,या शहरामध्ये उमेदवारी जाहीर होण्यापासून उमेदवारी निश्चित होण्यापर्यंत अनेक घडामोडी झाल्या. परंतु आपल्या शहराचे कार्यसम्राट आमदार लक्ष्मणभाऊ जगताप, त्याचप्रमाणे महेशदादा लांडगे,गौतम चाबुकस्वार या सर्वांनी ज्या ताकदीने निवडुन दिले. खरं तर या शहरामध्ये लक्ष्मणभाऊचे कार्य विकासाची दृष्टी पाहिली आणि या लोकसभेमध्ये या शहरातील दोन नेत्यांमुळे सर्व कार्यकर्त्यांना बळ मिळालं आणि त्यामुळंच आपला विजय सुकर झाला. प्रत्येक कार्यकर्ता भाजपाचा असेल, शिवसेनेचा

,

असेल, आरपीआयचा असेल व सर्व कार्यकर्त्यांनी जे परिश्रम केले त्या कार्यकर्त्यामुळं यश आलं आणि नागरिकांनी भरभरुन मतदान करुन आदरणीय श्रीरंग आप्पा बारणे यांना प्रचंड मतांनी लोकसभेमध्ये पाठवलं. खरं तर प्रत्येक निष्ठावंत कार्यकर्त्याचे आणि नगरसेवकांचे मनपुर्वक हार्दीक अभिनंदन करतो. ज्याप्रमाणे निवडणुकीच्या दरम्यान अनेक अनुभव आपल्याला आले. पक्षामध्ये दुफळी निर्माण करण्याचं काम घर का भेदी पक्षात राहून ज्यांनी पक्षाच्या विरोधात काम केलं त्यांचा मी याठिकाणी निषेध व्यक्त करतो.आणि पुन्हा एकदा आपणां सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो. जयहिंद,जयमहाराष्ट्र.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे –** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. २०१९ ची १७ वी लोकसभा निवडणुक ख-या अर्थानं अत्यंत वेगळी निवडणुक होती.भारतीय जनता पार्टीचे सर्वोच्च नेते मा.नरेंद्रभाई मोदी व मा.अमितभाई शहा यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणुक लढवली गेली. ख-या अर्थाने यावेळी लोकशाहीचा उत्सव नागरिकांनी साजरा केला. या निवडणुकीमध्ये सर्व देशवासियांनी कुठली जात,धर्म,पंथ किंवा प्रांत भाषा यांचा विचार न करता केवळ देशहितासाठी आणि विकासासाठी नरेंद्रभाई मोदी यांच्या समर्थनाथ लोकशाहीचं दर्शन घडवलेलं आहेअसे मी मानतो. या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचे जुने निष्ठावंत कार्यकर्ते असतील या सर्व कार्यकर्ते तसेच यामध्ये शिवसेना असेल या सर्वांचे योगदान फार महत्वाचे ठरलेलं आहे. आणि त्याच बरोबर राष्ट्रीय स्वयं सेवक संघाच्या सर्व कार्यकर्त्यांनी या निवडणुकीमध्ये कष्ट घेतलेले आहेत. या सगळयांच मी मनापासून अभिनंदन करतो आणि मा.नरेंद्रभाई मोदी व त्यांच्या संपुर्ण मंत्रिमंडळाचं अभिनंदन करतो आणि त्यांच्या पुढील कारकीर्दीस शुभेच्छा देतो. व थांबतो धन्यवाद.

**मा.संदीप वाघेरे–** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज २०१९ ची लोकसभा निवडणुक ही नरेंद्रभाई मोदी यांच्या नेतृत्वाखाली झाली. आणि मोदी साहेबांमुळे जे घवघवीत यश मिळालेलं आहे. ते निव्वळ मोदी साहेबांमुळेच मिळालं आहे. इथे बाकीचे १८ पगड पक्ष होते, डावे पक्ष व इतर सर्व पक्ष सगळे भुईसपाट करुन टाकलेले आहेत. ते फक्त नरेंद्रभाई मोदी या नावाच्या व्यक्तीने त्या व्यक्तीनी काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंत आणि बंगाल पासून पश्चिम महाराष्ट्र, गुजरात पर्यंत याठिकाणी भगवाच फडकलेला आहे. आणि पिंपरी चिंचवड मध्ये विशेषता आप्पा बारणे असतील, अमोल कोल्हे, मा. गिरीषजी बापट ही त्यांच्या कर्तत्वावर निवडुन

,

आलेली आहेत. आणि त्यांना बीजेपीची साथ,संघाची साथ,बजरंग दल, आरएसएस असेल, विश्व हिंदू परिषद असेल यांनी जो घराघरामध्ये जाऊन प्रचार केला कोणीही एक माणुस याचे श्रेय घेतो आणि माझ्यामुळे ही गोष्ट झाली हे परिवर्तन झालं ते फक्त आदरणीय नरेंद्रभाई मोदी यांच्यामुळे झालेलं आहे. ते मी म्हणु शकत नाही किंवा अजुन कोणी म्हणु शकत नाही. माझ्या प्रभागात सुध्दा ७७०० मतं राष्ट्रवादीपेक्षा जास्त मिळाली. माझ्या इथं ३१८०४ मतदान झालं त्यामध्ये आप्पा बारणे यांना १७५५२ झालं आणि राष्ट्रवादीला ९५०० च्या आसपास मतदान झालेलं आहे. हे मतदान मोदीमुळे झालेलं आहे. मोदींनी लोकांना ज्या आशा-आकांक्षा दाखविलेल्या आहेत ते त्या पूर्ण करणार आहेत. आज काश्मीर मध्ये पाहिले तर मिलटरीने पूर्णपणे वॉल फेन्सिंग तयार करण्याचे काम चालू केलेले आहे. तसेच सिंधु नदीचा प्रश्न असेल सिंधु नदीचे २० टक्के पाणी पाकिस्तानला देत होतो. ते थांबवून त्याठिकाणी डॅम वगैरे बांधु शकतो. इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. लोकांना रोजगार देण्याचा प्रयत्न करीत आहेत, नदीजोड प्रकल्प आहे, शेततळे आहे, म्हणजे मोदींनी ज्या ज्या गोष्टी केलेल्या आहेत त्या लोकांना भावल्या आहेत. म्हणजे समजा उजाला योजना,पंतप्रधान आवास योजना या विविध माध्यमाच्या योजनातून मोदी साहेब घराघरात पोहचले आहेत आणि यात मोदींच यश आहे. सभागृहाने पूर्णता मनापासून धन्यवाद दिले पाहिजेत. हे मोदींनी केलंल परिवर्तन आहे कोणी एका माणसांने केलेलं नाही एवढं बोलून थांबतो. जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.सचिन चिंचवडे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आजच्या लोकशाहीच्या सर्वात मोठा विजय साजरा केला जात आहे. भारतातील एक सर्वांत मोठी लोकशाहीचा विजय आपण मोदीच्या रुपाने तो आपण पाहिलेला आहे. आणि अनुभवलेला आहे. देशामध्ये हा एक इतिहास घडलेला आहे. याचे आपण सर्वजण साक्षीदार झालेलो आहोत. संपुर्ण जगाचं लक्ष या निवडणूकीकडे लागलेलं असताना ज्या पध्दतीनं नरेंद्रभाई मोदींच्या नेतृत्वाखाली संपुर्ण भाजप व मित्रपक्षांनी ज्या पध्दतीने देशामध्ये कामगिरी केली ती कामगिरी नक्कीच नावाजण्यासारखी आहे. सर्व प्रथम आपल्या या सभागृहाच्या वतीने आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांचे तसेच त्यांच्या टीमचेही अभिनंदन करतो. आणि याची एक आनंदाची उधळण करीत असताना एक जाणीव आपण सर्वांनी ठेवली पाहिजे जसा आनंद किंवा मोठया प्रमाणात आपल्याला विजय मिळालेला आहे. तेवढयाच मोठया प्रमाणात

,

जबाबदा-या देखील येऊन पडलेल्या आहेत. त्या जबाबदारीची जाणीव आपण ठेवण्याची गरज आहे. आणि शहरामध्ये आपण ख-या अर्थाने नरेंद्रभाई मोदींचे आपण नेतृत्व करतो आहे. देशाचा प्रत्येक नागरीक हा देशाचा पंतप्रधान आहे असा जेंव्हा वागायला सुरुवात करील त्यावेळेस आपल्या देशाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. एका व्यक्तीने किंवा हाताने हा देश बदलू शकत नाही त्यासाठी हजारो हात पुढे आले पाहिजेत आणि त्या विचारांना साथ दिली पाहिजे. आणि आपण त्याच आत्मचिंतन केलं पाहिजे की, खरंच आपण त्यांच्या विचारानुसार चालतोय का मग तो पक्ष कुठलाही असु या भारतीय जनता पार्टी असो किंवा इतर कुठलेही पक्ष असो त्यांची नांवे घेऊन त्या गोष्टीत घेऊन त्यांना बांधण्याची गरज नाही. आज भारताचा नागरीक एवढंच पुरेसं आहे. आपल्या देशाचं हित पहायचं असेल तर तो त्याला पक्षाच्या चौकटीत न बांधता आपण देशाचे नागरीक आहोत, भारतीय आहोत एवढीच मनामध्ये भावना रुजवली आणि देशाच्या हितासाठी कुठलही काम करण्याचं ठरवलं तर देशाचा विकास नरेंद्रभाई मोदी यांच्या नेतृत्वाखाली झाल्या शिवाय राहणार नाही. आणि आज जगामध्ये भारताचं नांव वेगळया दृष्टीने होत चाललं आहे. एक महासत्ता म्हणुन पुढच्या काळामध्ये नक्कीच उदयास येणार आहोत आणि त्यासाठी आपल्या देशातील प्रत्येक नागरीकाची जबाबदारी आहे की,त्यासाठी आपण योगदान दिलं पाहिजे. आज पिंपरी चिंचवड शहरामध्ये आयुक्त सो.मी उपमहापौर म्हणुन काम करतो आणि आमच तुमच्याकडे कधी तरी काम असतं शहरासाठीच असतं त्यासाठी तुम्हांला आम्ही कॉल करीत असतो. आमच्या वैयक्तीक कुठल्या कामासाठी कॉल करीत नसतो. आयुक्त साहेबांना एवढंच सांगायच आहे की, सगळयावरती जबाबदा-या आहेत अभिनंदन किंवा आनंदोत्सव साजरा करत असताना या गोष्टीचा विसर पडला नाही पाहिजे. कामं सर्वांनाच असतात तुमच्यावरती सुध्दा इलेक्शनची डयुटी होती. आपल्यावर जी जबाबदारी असते त्या जबाबदारीची जाणीव आणि त्या गोष्टींची काम करण्याची पध्दत याच्यामध्ये कुठे तफावत किंवा अंतर दिसल नाही पाहिजे. आम्ही तळमळीने काम करण्याचा प्रयत्न करतो पण प्रशासनाच्या तुमच्यावरती काय मेहरबानी आहे की,काय हे माहित नाही. आता सभागृहात ब-याचशा गोष्टी बोलणं उचित नाही. सकाळी मी तुम्हांला फोनवरती बोललो आहे. त्या गोष्टीची दखल आपण घ्याल अशी अपेक्षा बाळगतो.आणि यापुढं जर दखल घेतली नाही तर आम्हाला वेगळया पध्दतीने या गोष्टी जनतेसमोर मांडाव्या लागतील. धन्यवाद.

,

**मा.उषा मुंढे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज आनंदोत्सव साजरा करीत असताना लोकसभेचे बिगुल वाजले. नरेंद्रभाई मोदी पुन्हा पंतप्रधान झाले. नरेंद्र साहेब म्हणजे देशाची शान,देशाची आण,देशाची मान यासाठी जे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले,सर्वसामान्य नागरीक आज विजय साजरा करीत आहेत. हा विजय जनतेचा आहे. आज जसा राम सेतू वळसा घालून प्रभू रामचंद्रांना एक खारीचा मोदक झाली. तसंच या सरकारच्या शिलेदारांना निवडुन आणण्याची जबाबदारी माझ्या सारख्या कार्यकर्तीवर आली.तेंव्हा आमच्या भाजपचे आमदार लक्ष्मणभाऊ जगताप त्यांनी जी जबाबदारी आमच्या सारख्या कार्यकर्त्यांवर दिली ती जबाबदारी पार पाडत असताना भारतीय जनता पार्टीचं अभिनंदन करीत असताना मी माझ्या प्रभागातील सर्व नागरीकांच आणि कार्यकर्त्यांच मी अभिनंदन करते. आणि थांबते.

**मा.राजू बनसोडे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता माझे सर्व सहकारी मित्र सांगत होते सरकार आल्याबद्दल सर्व कौतूक करीत होते, अभिनंदन करीत होते. ते आता थांबवून आता विकासाच्या मुद्यावर बोलू. आयुक्त साहेब मी तुम्हांला परवाच्या दिवशी एक क्लीप सोडलेली आहे. आयुक्त साहेब आमच्या वार्डामध्ये जाणुन बूजून दुर्लक्ष करीत आहेत. या प्रभागाकडे कोणच लक्ष देत नाही. महापालिकेतून प्रभाग क्र.३० हा वगळलेला आहे का. माझ्या वॉर्डात ३/४ महिने झाले पाणी येत नाही. आलं तर कमी दाबाने पाणी येत आहे आणि तेही गढुळ पाणी येत आहे. आयुक्त साहेब मी बरेच दिवस झाले कांबळे साहेबांना फोन करतोय, तुम्हांला फोन करतोय माझ्या प्रभागातील पाण्याचा प्रश्न मिटलेला नाही. पाणी आलं तरी कमी दाबाने येत आहे. परवा फुगेवाडीमध्ये एका महिलेचा पाण्यामुळं जीव गमवावा लागला. तसेच प्रभागामध्ये एक झाड पडलेलं आहे १५ दिवसापूर्वी अति. आयुक्तांना त्याचा फोटो व्हॉटस ऍपला पाठविलेला होता. तुम्ही लोकांना मारायची सुपारी घेतलेली आहे का. वॉर्डामध्ये पाण्याची समस्या आहे, झाड पडलं तरी ते उचलत नाही,आयुक्त साहेब आपण वॉर्डामध्ये लक्ष द्या. प्रभागातील लोकांच आम्हांला नको ते बोलतात. जर तुम्हांला आमच्या प्रभागामध्ये कामच करायचं नसेल तर महापालिकेतून भाग वगळून टाका आणि तिकडं जोडा. माझ्या प्रभागात आपण एक भेट द्यावी आणि ज्या ज्या समस्या आहेत त्या सोडवाव्यात अशी विनंती करतो.

,

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरं तर देशाच्या १७ व्या लोकसभेच्या निमीत्ताने जो अभिनंदनाचा ठराव ढाके साहेबांनी मांडला त्या ठरावाच्या बाबत मी ढाके साहेबांच अभिनंदन करतो. खरं तर देशामध्ये नरेंद्रभाई मोदी आणि अमित शहा यांच्या माध्यमातून जे मोदी सरकार आलेलं आहे या मोदी सरकारचं मी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शहराच्या वतीने अभिनंदन करतो. ज्या जबाबदा-या नागरीकांनी आपल्याला दिलेल्या आहेत, ज्या समस्या आपल्यासमोर आहेत त्या समस्यांच निराकरण नरेंद्र मोदी सरकारच्या माध्यमातून होवो अशी अपेक्षा व्यक्त करतो मी पुनश्च एकदा नरेंद्रभाई मोदी आणि अमित शहा यांच राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अभिनंदन करतो,आभार मानतो आणि त्यांच कौतूक करतो. आणि ज्या भगिनींनी माझ्यावर तोंडसुख घेतलं त्याबाबतीत मी आपल्याला काही गोष्टी निदर्शनास आणून देतो. ज्यांनी मला निवेदन दिलं आहे ते २० मे २०१९ पिंपरी चिंचवड शहर धनगर समाज महासंघ अध्यक्ष आहेत अशोक खरात त्यांच्यामधले संघटनात्मक लोक माझ्याकडे आलेली होती. अमीत शेडगे,राजु दुर्गे, सोनलकर यांनी मला एक निवेदन दिलेलं होतं. गेल्यावर्षीही दिलं होतं आणि याही वर्षी दिलं होतं. ज्या मातेच्या बाबतीत अश्रु ढाळण्याचा प्रकार केला त्या आमच्याही माता आहेत. त्या माता संपुर्ण महाराष्ट्राच्या माता आहेत,सर्वसामान्य गोर गरीबांच्या माता आहेत अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म जरी धनगर समाजामध्ये झाला असला तरी त्यांचा आदर्श संपुर्ण महाराष्ट्र त्यांच्या माध्यमातून घेत आहे. हे घेत असताना कोण काय केलं, कोणाच्या संस्थेनी काय केलं याच्याशी आमचा काहीच मतलब नव्हता मी काय पत्र दिलय, कुठल्या पत्रकाराला पत्र दिलंय,कुणी केल हे मी आयुक्तांना पत्र दिलेलं आहे की, मला जे पत्र आलेलं आहे, मला ज्या संघटनेनी पत्र दिलेलं आहे त्या संघटनेच्या बाबतीत योग्य ती चौकशी करुन आपण योग्य तो निर्णय घ्यावा असं मी ३१/५/२०१९ रोजी पत्र दिलेलं आहे. ते माझं कर्तव्य आहे. ज्यांनी मला नागरीकांनी निवेदन दिलेलं आहे त्यामध्ये चुकीचा कारभार झाला की, नाही झाला त्याच पत्र फक्त मी दिलेलं आहे. कुणी काही समाजाच्या बाबतीत काही हे असेल आणि चुकीच्या शब्दाचा कोणी काही करत असेल, आणि ज्यांनी कोणी माझ्यावर आरोप करीत असेल तर त्याचा पहिला मी निषेध करतो. मला पत्र काय दिलेलं आहे, तुमच्याच समाज बांधवांनी पत्र दिलेलं आहे त्यांनीच मला सांगितलं की, अहिल्यादेवीच्या जयंतीचा जो कार्यक्रम होतो आहे तो थाटामाटात व्हावा,चांगला व्हावा, त्यामध्ये

,

कोणीही हस्तक्षेप केला नाही किंवा अहिल्यादेवी होळकर जयंतीला आमचा विरोध नव्हता. त्यामुळे तुमच्या लोकांनी जे पत्र दिलयं त्या पत्राची शहानिशा करा म्हणुन आदरणीय आयुक्तांना पत्र दिलयं यामध्ये माझा कसलाही तीळमात्र संबंध नाही ज्यांना कोणाला माझ्यावर वैयक्तीक टीका करायची असेल माझी आई कुठे, बाप कुठे ज्यांना बघायचे असेल माझा बाप दोन वर्षापुर्वी एक्सपायर झाले आणि माझी आई कोणी खालच्या दर्जात बोलत असेल तर माझ्या घरी जाऊन बघा मी काही बोलू शकत नाही,पण जे खालच्या दर्जात बोलतात त्यांना सडेतोड उत्तर देण्याची आमच्यात धमक आहे. माझी आई माझ्या घरी आहे. १२८ नगरसेवक आहेत याठिकाणी त्यांना घरी घेऊन जावा. कोणाला जर का पर्सेनली आईचं नाव घेऊन कोण काय करत असेल तर माझ्या सारखा वाईट कोणी नाही. राजकारण गेलं खड्डयात कोणाचा बाप,कोणाची आई काढायची गरज नाही. हे पत्र कोणालाही वाचायला सांगा धनगर समाजाचं पत्र आहे. तुम्ही बोलताना मी सगळं ऐकुण घेतलेलो आहे. तुमचा प्रत्येक शब्द मी ऐकुण घेतलेला आहे. आम्ही धनगर समाजाचा आदर करतो आहे. तुमच्या समाजाचा विश्वास तुमच्यावरुन उडालेला आहे. तुमच्या समाजाचं तुमच्यानी काही होत नाही, तुमच्या समाजानेच मला पत्र दिलेलं आहे. त्या पत्राची मी चौकशी केली याच्यामध्ये माझा दोष नाही. मला पिंपरी चिंचवड शहरामध्ये विरोधी पक्षाच्या नात्यानं कोणी जर पत्र दिलं तर सेकंद मिनीटामध्ये मी आयुक्तांना पत्र देतो. हा माझा पहिल्या दिवसापासूनचा कारभार आहे. ते पत्र चांगल आहे की, वाईट हे आम्ही काहीच सांगू शकत नाही. तेंव्हा आम्ही जबाबदार नाही. नागरीकांनी जे पत्र दिलेलं आहे त्या पत्राचं उत्तर त्यामध्ये राष्ट्रीय समाज पक्ष यांनीही पत्र दिलेलं आहे. त्यानंतर पाडोळे यांनी पत्र दिलेलं आहे की, या संघटनेमध्ये काही तरी काळंबेरं चालतंय पाच,पाच वर्ष जर त्या समाजाची पत्र येत असतील तर दत्ता साने म्हणुन नाही तर विरोधी पक्षनेता म्हणुन मी चौकशी करण्याचं काम जबाबदारीन काम पार पाडलेलं आहे. ज्यांनी कोणी काही केलं नसेल,संघटनेमध्ये काही झालं नसेल तर यावर तिळपापड करायचा काहीही संबंध नाही. ज्याला काही लागलं असेल,ज्यांनी काही काळंबेरं केल असेल तर त्याला लागेल. तुमच्याच लोकांचा तुमच्यावर आरोप आहे,दत्ता सानेचा नाही. विशेष म्हणजे राजू दुर्गे हा भाजपचाच माजी नगरसेवक आहे. आणि हे ओरीजनल त्या पक्षाचे जुने कार्यकर्ते आहेत गेली २० वर्षे मी बघतोय

(गोंधळ)

,

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह,माझ्यावर जे आरोप केलेले आहेत त्याचा मी जाहीर निषेध करतो. यांना यांच्या पक्षांनी वाळीत टाकलेलं असेल किंवा त्या संस्थेनी टाकलेल असेल, त्या संस्थेचा आणि यांचा काही वाद असेल याच्यामध्ये माझा काहीच संबंध नाही.

**मा.एकनाथ पवार –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरं तर लोकसभा निवडणुकीच्या नंतरची ही पहिली जी.बी.आहे. आणि निवडणुकीमध्ये आपण खूप चांगली भाषणं केली. आणि सगळया नेत्यांनी चांगली भाषणं केल्यामुळंच केंद्रात मोदी सरकार आलं.

(गोंधळ)

**मा.एकनाथ पवार –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरं तर या सभागृहामध्ये पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांचे अभिनंदन करण्यासाठी माझ्या सर्व सहका-यांनी खूप चांगलं भाषण केलं. आणि खरं आहे या देशामध्ये भाजपाचे ३०३ आणि मित्र पक्षाचे मिळून ३५३ मला अस वाटतंय की,भारताच्या इतिहासामध्ये दुस-यांदा एवढी मोठी मेजॉरिटी एखादया पक्षाला मिळाली ती म्हणजे नरेंद्रभाई मोदीमुळे खरं तर आपण नरेंद्रभाई मोदीचं आणि त्यांच्या टीमचं अभिनंदन एवढया साठी करणे गरजेचं आहे की,देश कुठे तरी विकासाच्या दृष्टीने जात आहे. आणि देशाच्या विकासाच्या बरोबर आपला विकास होतो की नाही हे या सभागृहामध्ये सगळयांनीच मनापासून बोललं पाहिजे इथे संसद ज्या पध्दतीने,ज्या पावित्र्यान त्या संसदेतल्या देशाच्या विकासाचे निर्णय केले जातात नरेंद्रभाई ज्यावेळेस सभागृहामध्ये भाषण करतात, इतर सगळया पक्षाचे नेते भाषण करतात सन्मानाने त्या, त्या पक्षाचे नेते एक आदर्श कुटूंब म्हणुन भाषण करीत असतात. मा.महापौर मी अधिक वेळ घेणार नाही पण एवढ निश्चित सांगेन,ज्या पध्दतीचं निवडणुकीच्या आगोदरच वातावरण होतं आणि मला असं वाटतय की, नरेंद्रभाई मोदी विरुध्द बाकी सगळे अशा पध्दतीचं देशातील वातावरण मिडीया असेल किंवा विरोधी पक्षाच्या वतीनं केलं. आणि खरं तर एकटया नरेंद्रभाई मोदींनी सगळयांना अंगावर घेऊन ज्या पध्दतीनं नरेंद्रभाई मोदींची लाट आली मी उदा.देतो विकासाच्या दिशेने सगळेजण म्हणत होते की, यांच सरकार येईल, त्यांच सरकार येईल, महाराष्ट्रात एवढया जागा यांच्या येतील,त्यांच्या एवढया जागा येतील, पण खरा तर हा जो गेस आहे तो गेल्या ५ वर्षाच्या काळामध्ये

,

विकास हा सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचला जावा,सर्वसामान्य माणुस कुठल्याही भूलथापाला पडणार नाही, बळी पडलेला नाही, कुठल्याही विरोधी पक्षाच्या आदेशाला बळी पडलेला नाही. याच एकच कारण आहे की,या देशाचा विकास या देशाला पुढच्या काळामध्ये विकासाच्या दिशेने पुढे कोण घेऊन जाऊ शकतो तर ते फक्त नरेंद्रभाई मोदी घेऊन जाऊ शकतात. मी या ठिकाणी सर्व सन्मा.नगरसेवकांच मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी नरेंद्रभाई मोदी सरकारचं मनापासून अभिनंदन केलं. आणि दत्ता काका तुम्हीही केलं मला असं वाटलं की,राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक मंडळीना आनंद झाला असेल की,नरेंद्रभाई मोदीचं केंद्रामध्ये सरकार आलं मी या सर्वांच मनापासून अभिनंदन करतो. आणि महापौर आपल्याला विनंती करतो की, आपण पुढील विषयाला सुरुवात करावी.

**मा.विलास मडिगेरी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आपल्या सभागृहातील नगरसेविक सौभाग्यवती मनिषाताई पवार ,तसेच आयटीआयचे प्राचार्य शशिकांत पाटील यांचा वाढदिवस आहे. आजच्या या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना या सभागृहाच्या वतीने खुप,खुप शुभेच्छा, त्यांना दिर्घायुष्य लाभो.मा.महापौरांना विनंती आहे की, दोन्ही मान्यवरांचा याठिकाणी सन्मान करावा,शुभेच्छा द्याव्यात.
( मा.महापौर यांच्या हस्ते सन्मा.सदस्या सौ.मनिषाताई पवार तसेच आयटीआयचे प्राचार्य शशिकांत पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.)
**मा.उषा मुंढे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३९५ — विषय क्रमांक- १
दिनांक - ६/६/२०१९ — विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.राजेंद्र लांडगे, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.८२, दि.०१/०२/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.३८५ दि.२२/२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सह शहर अभियंता (स्थापत्य) या प्रवर्गात ३ पदे मंजूर असून त्यापैकी १ पद मागासवर्गीयांसाठी आरक्षित आहे. महाराष्ट्र शासनाचे

,

सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.बीसीसी-२०१६/प्र.क.२२८ए/१६/१६-ब दि.२९ मे २०१७ नुसार छोटया संवर्गातील मागासवर्गीयां करीता आरक्षित पदे पदोन्नतीने पदे भरताना अनुसरावयाची कार्यपध्दती विहित केलेली आहे. त्यानुसार बिंदुनामावलीच्या क्रमवारीनुसार प्रथमतः अनुसुचित जाती प्रवर्गाकरीता पद भरण्याचा विचार करावा, त्यानंतर अनुसुचित जमाती प्रवर्गाचा विचार करावयाचा आहे. यापूर्वी सह शहर अभियंता पदावर अनुसुचित जाती प्रवर्गातील उमेदवार भरणेत आले असून सदरचे पद आता रिक्त आहे. बिंदु नामावलीनुसार सदर जागेवर सद्यस्थितीत अनुसुचित जमाती प्रवर्गाचे उमेदवारास पदोन्नती देणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर अनुसुचित जमातीच्या प्रवर्गाचे श्री.देवन्ना नरसिमलु गट्टूवार हे सेवाजेष्ठता यादीप्रमाणे प्रथम क्रमांकावर आहेत. तरी सदर अधिकारी यांची कार्यकारी अभियंता या पदावर चार वर्षापेक्षा जास्त सेवा झालेली असल्याने त्यांना अनुभवाचा काही कालावधी शिथिल करुन पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** –मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सागर गवळी-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- २

दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा. राजेंद्र लांडगे, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.९० दि.१/३/२०१९

,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर शासन मंजूर असलेले रिक्त पदांवर अथवा नव्याने शासन मंजूर होणा-या आकृतीबंधानुसार उपायुक्त अभिनामाची पदे शासन मंजूर होणार असल्याने व सदरची पदे महापालिका सभेने निर्माण केली असल्याने त्या मंजूर होणा-या सहाय्यक आयुक्त/उपायुक्त या पदावर नियमानुसार सेवाजेष्ठता शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण करणारे पात्रताधारक, पदोन्नती पूर्व प्रशासन अधिकारी या पदावरील सेवाजेष्ठ अधिकारी श्री.श्रीनिवास रामचंद्र दांगट, श्री.राजेश अंकुश आगळे व श्री. सिताराम देवचंद बहुरे यांना नियमानुसार पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.शैलेश मोरे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- श्री.उल्हास बबनराव जगताप (नगरसचिव) यांची 'सहाय्यक आयुक्त' पदावर नेमणूक करण्यास तसेच त्यांचा महापालिकेतील गट 'ब' पदावरील सेवा कालावधी विचारात घेवून 'सहाय्यक आयुक्त' पदाचे सेवाज्येष्ठतेकामी त्यांना मानीव तारीख निश्चित करुन देण्यास मान्यता देणेत यावी आणि शासन निर्णयानुसार आणि महापालिकेच्या प्रस्तावित आकृतीबंधानुसार महापालिकेच्या आस्थापनेवर महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम ४५ अन्वये मंजूर गट 'अ' मधील वैधानिक पदावर काम करणा-या अधिका-यांकरीता "अतिरिक्त आयुक्त" अभिनामाचे एक पद शासन मंजूर असून रिक्त आहे. सदर पदावर महापालिका अस्थापनेवरील MMC Act.Sec.45 अन्वये वैधानिक (गट-अ) पदावरील काम करणा-या अधिका-याची नेमणूक करणे आवश्यक असल्याने "अतिरिक्त आयुक्त (२)" या पदाचा अतिरिक्त पदभार श्री.उल्हास बबनराव जगताप यांच्याकडे सोपविण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच डॉ. फिरके राजेंद्र प्रल्हाद व डॉ. गोफणे लक्ष्मण पांडुरंग ह्या दोन वैद्यकीय अधिकारी यांना प्रशासन विभागाकडील आदेश क्र. प्रशा/१/कावि/२३५/२०१८ दिनांक ०७/०३/२०१८ अन्वये ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या (Ad-hoc) स्वरुपात दिनांक ०७/०३/२०१८ पासून ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी या वर्ग १ चे पदावर पदोन्नतीची सर्व विहित कार्यपध्दती अनुसरुन मा. विधी व मा. महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्यात आली होती. सदर ११ महिन्याचा कालावधी दिनांक ०७/०२/२०१९ रोजी संपुष्टात आलेला असल्याने ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी या वर्ग १ चे पदावर नियमित पदोन्नतीसाठी वरील दोन अधिकारी सेवाज्येष्ठता व इतर निकषानुसार पात्र ठरत असल्याने त्यांना

,

दिनांक ०७/०२/२०१९ पासून वर्ग १ चे ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी या पदावर नियमित पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच श्री.विजय ज्ञानदेव भोजने, उपअभियंता (स्थापत्य) यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (वेतन श्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००) या अभिनामाच्या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.हर्षल ढोरे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सागर गवळी-** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.सचिन चिखले-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरं तर मगाशी अभिनंदनाचा ठराव केला त्याच्या आगोदर वायसीएमएचच्या अधिष्ठता या पदावर वाबळे सो.यांची नियुक्ती केली त्यांचे मी अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे एका छोटयाशा गोष्टीकडे लक्ष वेधु इचिछतो की, आपण मागच्या महिन्यामध्ये आपण असंख्य कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम घेतला होता. म्हणजे आपण त्यांचा पदभार कमी झालेला आहे. रिक्त झालेल्या पदांची संख्या जवळपास ३ ते ४ हजार पर्यंत अशी रिक्त झालेली पदे लवकरात लवकर भरणेत यावी अशी मी विनंती करतो. आणि ही पदे लवकरात लवकर भरणेत यावी आणि जास्तीत जास्त पिंपरी चिंचवड शहरातील युवक / युवतींना प्रोत्साहन देण्यात यावे अशी विनंती करतो.

**मा.दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लाच घेणा-या आणि फौजदारी गुन्हा दाखल झालेल्या अशा १६ कर्मचारी / अधिकारी ज्यांनी यापुर्वी महानगरपालिकेमध्ये या ना त्या कारणामुळे लाचलुचपतच्या माध्यमातून कोणी १०/१२ लाख रु.पर्यंत लाच घेण्याची केलेली मजल अशा भ्रष्टाचाराने बरबटलेल्या लोकांना काल मा.आयुक्तांनी त्यांचा मान सन्मान करुन त्यांना आयुक्तांच्या अधिकारात कामावर घेतल असे आम्हांला वर्तमानापत्रातून ऐकायला आलं,मा.महापौर साहेब या विषयाला तुमचा आणि माझाही विरोध आहे सत्ताधारी पक्षाचे नेते एकनाथ पवार यांचाही विरोध असताना सभागृहाच्या तीनही गट नेत्यांचा विरोध असताना आयुक्तांनी यांच्यावर मेहरबान होण्याचं कारण काय ? हे मी त्यांना विचारलं तर ते म्हणाले की, मी कायद्याच्या चौकटीत बसवून त्यांना कामावर घेतलं आहे. साहेब मला खेदान सांगव लागत आहे की, ज्या भृष्ट अधिका-यांना जर आपण त्यांना पगार देवुन घरी बसविले तरी त्याच वाईट वाटत

,

नव्हतं पण उद्या त्यांना कामावर घेऊन आपल्याकडे जेवढे कामगार कामावर आहेत त्या लोकांना आपण भृष्ट बनविण्याचा अधिकार आपण त्यांना देतो की काय हा प्रश्न माझ्या सारख्या कार्यकर्त्यावर आल्या शिवाय राहणार नाही. १०० टक्के आपण त्यांना तुम्ही चो-या करा, २/४ महिने घरी बसा पुन्हा तुम्हांला कायदयाच्या चौकटीत बसवून कामावर घेतो असे आपण सांगण्याचा प्रयत्न केला, तर या शहरामध्ये, अधिका-यांमध्ये, नागरिकामध्ये चांगला मेसेज जाऊ शकत नाही. सत्तारुढ पक्षनेते आपल्याला विनंती आहे की, हया विषयाला प्रसिध्दी माध्यमांनी त्याला उचलून धरलं होतं आम्ही सर्वांनी त्याला विरोध केला असताना आयुक्तांनी हा निर्णय का घेतलेला आहे आम्हांला माहित आहे की, त्यांना घरी ७५ टक्के पगार द्यावा लागतो किंवा त्यांना आर्थिक काम देणार नाहीत पण त्यांना कामावर घेतले हीच मोठी चुक झाली आदरणीय आयुक्त सो. आपली झाली असे वाटते. सर्व अधिका-यांना, नागरीकांना जे टॅक्स पेअर लोक आहेत त्यांना तुम्ही चुकीचा संदेश देत आहात असे मला वाटते.चोरी केली त्याला फाशी दिली पाहिजे.चोरी केली तरी त्याला परत कामावर घ्यायचं ही कुठली पध्दत आहे हे माहित नाही. कुठल्या चौकटीत बसविले माहित नाही पण सर्वसामान्य नागरीकांना वाटते की तुम्ही केलेला कायदयाचा वापर हा चुकीचा असेल असे मला वाटते. मला आयुक्तांचा या विषयांवर कायदेशीर खुलासा जो असेल तो असेल पण या विषयाचा मी जाहीर निषेध करतो त्यांनी जे काम केलेले आहे ते चुकीचा संदेश नागरीकांना आणि तुमच्या कामगारांना देण्याचा प्रयत्न केलेला आहे. १२ लाख रु. शिर्केनी घेतले त्याला रेड हॅण्ड पकडले आहे त्यांना जर आपण सन्मानाने महानगरपालिकेमध्ये कामावर घेत असाल तर यापेक्षा वाईट दिवस महापालिकेमध्ये नसतील असे मला वाटतय.हा विषय आयुक्तांनी सभागृहामध्ये आणायचा होता त्यावर साधक बाधक चर्चा करायची होती नगरसेवकांची मतं अजमावयाची होती चर्चा करुन मार्ग काढायला पाहिजे होता. तुम्ही तुमच्या अधिकाराचा केलेला गैरवापर यावर पुन्हा एकदा निर्णय घ्यावा आणि त्या लोकांना कामावर घेऊ नये असा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीन विनंती करतो. आणि मला पूर्णपणे खुलासा द्यावा अशी विनंती करतो.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ज्या विषयांवर आपण बोलतोय ते विषय मागच्या ८/१० दिवसापासूनची असेल महापालिकेमध्ये बरेचसे अधिकारी दरवर्षी रिटायर्ड होत असतात आणि ३ ते ३५००

पदे रिक्त आहेत आणि ती पदाची भरती करताना जे याठिकाणचे भूमीपुत्र आहेत,जे या शहराचे रहिवाशी आहेत त्यांना कशा प्रकारे प्राधान्य देता येईल याचा देखील विचार करावा आणि दत्ता काकांनी जो विषय मांडला निश्चितच आपण जे १२ अधिकारी / कर्मचारी कामावर घेतले आहेत त्यांची चौकशी झाली किंवा संपली आपण त्यांना सेवेत घेताय ते नेमकं कशामुळे त्यांना सेवेत घेताय संपुर्ण शहरामध्ये एक वेगळा संदेश या नागरीकांना काय देता येईल जेणेकरुन तुम्ही कसेही वागा पाठीशी घालण्यासाठी आम्ही तुमच्या मागे उभे आहोत असा संदेश या शहराच्या नागरीकांमध्ये जाता कामा नये सभागृहास आपण सांगावे की, या शिर्केची केस ही एक ते दिड वर्षापूर्वीचीच असेल आणि ती संपली असेल असे वाटत नाही फक्त जामीनावर सोडले आहे या बेसवर जर आपण त्यांना कामावर घेतले असेल तर आपण आता दत्ता साने यांनी सांगि तल्याप्रमाणे यांच्या कायदेशीर कोर्ट केसेस संपलेल्या आहेत का याचा खुलासा करावा.

**मा.संदीप वाघेरे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, अन्टी करप्शनच्या प्रकरणामध्ये जे १६ कर्मचारी सापडले आहेत त्यांना परत कामावर घेतलेले आहे. महापालिकेच्या चौकशी समितीमध्ये हे १६ कर्मचारी दोषी आहेत ते दोषी असताना त्यांची कोर्ट केस पूर्ण न होता तुम्ही त्यांना लगेच पदावर घेतले आहे आणि त्यांना यापुर्वी काम दिले होते ते न देता दुसरे काम देणार आहोत असे म्हणता. आपल्याच महापालिकेमध्ये काळे म्हणुन अधिकारी होता त्याच्या कामासंबंधी ९ रु चा ऑडीट मध्ये गफळा सापडला तो फक्त ९ रु.चा होता. आज आपण चहा पिण्यास गेलो तरी १० रु.लागतात. त्या ९ रु.साठी त्याला सस्पेंड केलेले आहे आज तो माणुस मेन्टॅलिटी डिप्रेशन मध्ये जाऊन तो वेडा म्हणुन फिरतोय, त्याला आपण निलंबीत केल्यानंतर त्याच्या ज्या सोयी सुविधा आहेत ज्या सेवा कालावधीत देत होतो त्याही आपण त्यांना दिलेल्या नाहीत. खरात म्हणुन एक कर्मचारी टाऊन प्लॅनिंगला कामाला होता त्यांनी म्हणजे माझ्या स्वत:ची मोजणी पण झालेली नव्हती तरी त्यांनी मला शिक्के मारुन दिलेले होते. असे ब-याच ठिकाणी त्यांनी उद्योग करुन ठेवलेले आहेत म्हणजे आयुक्त साहेब डिमार्केशनमध्ये जे घोटाळा झालेला आहे त्यामध्ये तो दोषी आढळला आहे आपण चुकीचं काम करणा-याला त्याठिकाणी कामावर घेणार आहात का आता तुम्ही म्हणता की आमची चौकशी पूर्ण झालेली आहे

,

नंतर आम्हांला शासनाच्या नियमाप्रमाणे ५० टक्के,७५ टक्के पगार त्यांना फुकट द्यावा लागतो त्यापेक्षा त्यांच्याकडून काही तरी काम करुन घेऊ असा तुमचा उद्देश असेल पण आयुक्त सो. म्हातारी मेल्याचं दु: ख झालं पण काळ सोकावणार आहे.आज या १६ लोकांना कामावर घेतल तर दुसरा अधिकारी काय म्हणणार आहे की, काय होतंय वर्ष सहा महिन्यांनी परत कामावर येतोय हा चुकीचा पायंडा पडेल. आणि आयुक्त सो.मागे मी आपल्याला एक पत्र दिलेलं होतं ३ हजार पदं आणि सरळ सेवेतील १ हजार पद रिक्त आहेत अशी जवळपास ४१०० ते ४२०० पदे रिक्त आहेत माझे असे म्हणणे आहे की, किंवा प्रत्येक सदस्यांचे म्हणणे आहे असेल आणि २०१६ मध्ये ठराव पास झालेला आहे की, आरक्षण प्लस २० टक्के भूमीपुत्रांना द्याव ज्याची ५गुंठे जागा पेक्षा किंवा त्यापेक्षा जास्त जागा कुठल्याही आरक्षणामध्ये गेली असेल मग ती मिलीटरीमध्ये असेल, एमआयडीसी मध्ये गेली असेल किंवा इतर वेगवेगळया आरक्षणामध्ये जागा गेली असेल, महापौर सो. आज तुमच्या आमच्या २२ /२३ गावाचे मिळून हे शहर तयार झालेलं आहे आज भूमीपुत्राचे काय हाल आहेत आज तो ८ ते १० हजार रु. मध्ये तो वॉचमन / सिक्युरीटी म्हणुन कामाला जातो आहे. त्याला हक्काचा रोजगार मिळाला तर पुन्हा त्याची आर्थीक परिस्थिती सुधारेल. आज अशी परिस्थिती आहे, पिंपळे सौदागर आणि वाकड ही गावं सोडली आणि बाकीची जी २२ /२३ गावं आहेत त्यामध्ये भोसरी,आकुर्डी , निगडी ही सगळी गावं जी आहेत या ठिकाणच्या मुलांच वय ३० वर्ष आहे त्यांची लग्न जमत नाही कारण तो काही कामधंदा करीत नाही कारण मुलाच्या घरी जमीन नाही,मुलगा कामाला नाही . म्हणजे इथं काय परिस्थिती झाली की, आई जेऊ घालीना आणि बाप फिरुन भीक मागू देईना. तर आमचं म्हणणं आहे की, हे आरक्षण २० टक्के जो आता मुख्यमंत्र्यांकडून काय पत्र आलेलं आहे की,तुमचं म्हणण काय आहे याबाबतीत मी जे पत्र पाठविलं त्याला उत्तर मागीतलेले आहे की, या उत्तरा मध्ये सभागृहाने २०१६ रोजी ठराव करुन घेतला होता की, आरक्षण प्लस २० टक्के राखीव आज मध्य प्रदेश सारख्या गर्व्हमेंटनी तिथल्या कामगारांसाठी किंवा तरुण बेरोजगार तरुणांसाठी ७० ते ८० टक्के रिर्झव्हेशन आणि काही उद्योगधंदयांन सवलती असा ठराव पास करुन घेतला आणि महाराष्ट्र शासनाने पण केलेला आहे त्याची अंमलबजावणी करावी. आता आपण जे इंजिनियर भरले त्यावेळेस पण आपण लागू केलेले नाही. आता आपण फायरब्रिगेड मध्ये ४३/४७ कामगार मानधनावर घेणार आहोत त्यासाठी

,

आमच्याकडचा माणुस फायरब्रिगेडचे काम करु शकत नाही. मा.महापौर साहेब याचा आपण विचार करावा आपले जे भूमीपुत्र आहेत त्यांना न्याय मिळालाच पाहिजे. एवढ बोलून थांबतो जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खर तर प्रशासनाने १६ अधिकरी व कर्मचा-यांना कामावर घेण्याचा जो निर्णय घेतला आहे त्या कर्मचा-यांवर प्रशासनाचे आरोप आहेत. आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्यीमधील सर्व शहरवासीयांनी जे टॅक्स पेड करतात आणि सर्वांचे लक्ष जाते की, हा भ्रष्टाचार कसा थांबवला जाईल त्यासाठी आम्हांला सभागृहामध्ये पाठविले आहे. आणि या १६ अधिका-यांना आपण कामावर घेतल आहे ते कसं घेतले आहे त्यासाठी काय निकष लावले याचा संपुर्ण खुलासा करावा अशी विनंती करतो आणि त्याच बरोबर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये ज्या रिक्त जागांची भरती होणार आहे त्या जागावर सुध्दा या पिंपरी चिंचवडच्या भूमीपुत्राचा सर्वात मोठा अधिकार आहे आणि त्यांना नक्कीच सेवेमध्ये घ्यावे अशी विनंती करतो आणि थांबतो.

**मा.एकनाथ पवार –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, खरं तर हा विषय विषयपत्रिकेवर नसला तरी महत्वाचा आहे असे वाटते. भ्रष्टाचाराच्या संबंधी ज्यांनी ज्यांनी चर्चा त्यांच्या मताशी मी सहमत आहे. खरं तर भ्रष्टाचाराच्या संबंधी आयुक्त सो आपण आरोपपत्र दाखल केले मी कामगार युनियन मध्ये काम केल्यामुळे मला थोडीशी परिस्थिती माहिती आहे. एखादयाने एखादा गुन्हा दाखल केला तर त्याच्यावर आपण आरोपपत्र दाखल करतो आणि त्याची चौकशी करतो त्याच्या चौकशीमध्ये फायनल निर्णय आल्यानंतर त्यावर निर्णय घेतो. पण कधी कधी परिस्थितीच अशी आहे की, एखादयाने एकाच्या कानाखाली मारली आणि गुन्हा दाखल होतो आणि दोघांमध्ये क्रॉम्प्रमाइझ झाले तर समजू शकतो पण ज्यांनी खरेच पैसे घेतलेले आहेत करप्शन केलेले आहे अशा पध्दतीच्या कर्मचा-याला पुन्हा सेवेमध्ये घेतलं तर मला असे वाटते की, काही कर्मचारी खूप चांगले काम करतात बरेच कर्मचारी असे आहेत की, कुठल्याही आमिषाला बळी न पडता या महापालिकेमध्ये सेवा करतात अशा कर्मचा-यांची मनोबल वाढविण्याची गरज आहे त्यांची संख्या वाढविण्याची गरज आहे. आणि दुर्देवाने पैसे घेतलेला माणुस पुन्हा सेवेमध्ये येतो तर

,

माझी आयुक्त सो नी खुलासा करावा परंतु यामध्ये अजुन काय तरतुद असेल अशा कर्मचा-यांना त्यांना सेवेमध्ये घेऊन येण्याच्या आगोदर अशा कर्मचा-याना स्वेच्छा निवृत्ती दिली तर अशा प्रकारची परिस्थिती पुढच्या काळात उद्भभवणार नाही. आणि जे करप्शन मध्ये दगावले जातील याचा परिणाम काय होईल जे दगावले जातील ते काय म्हणतील ६ महिने घरी राहीलो आणि ७५ टक्के पगार मिळाला आणि पुन्हा कामावर गेल्यानंतर ताठ मानेने रहातोय तर त्याला लाज वाटली पाहिजे म्हणजे या महापालिकेच्या सभागृहामध्ये आपण एक गोष्ट निश्चितपणे ठरवली पाहिजे कोणीही करप्शन केलेले आहे,पैसे घेतलेले आहेत असा कर्मचारी उथळ माथ्याने फिरता कामा नये याच्या साठी आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कायदयामध्ये जे काही बदल करण्यासाठी हे सभागृह आपल्या बरोबर आहे मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, या संदर्भात आपण सविस्तर खुलासा करावा आणि पुढच्या विषयाला सुरुवात करावी.

**मा.आयुक्त -** सन्मा.महापौर,सन्मा.सभागृह आता सभागृहामध्ये विविध निलंबीत कर्मचा-यांना पुनश्च सेवेमध्ये रुजू घेण्याच्या विषयाच्या संबंधाने सविस्तर चर्चा झालेली आहे. या विषयाच्या अनुषंगाने विविध वर्तमानपत्रामध्ये याविषयी बातम्या छापून आल्या आहेत, त्याच्या अनुषंगाने काही आक्षेप त्याच्यावरती मांडलेले आहेत निश्चितपणे सभागृहाच्या समोर जी कारवाई करण्यात आली त्याचा खुलासा सादर करतो.सर्वप्रथम आपण एक सभागृहाच्या समोर एक मांडू इच्छितो की,सर्व प्रशासकीय बाबीकरीता जरी महानगरपालिका स्वायत्त संस्था असली तरी त्याकरीता प्रशासकीय सेवा रेग्युलेट करण्यासाठी MCSR ॲडॉप्ट केलेले आहे त्यामुळे MCSR च्या नुसार आपण सर्व प्रकारच्या प्रशासकीय कारवाया केल्या जात असतात. ॲन्टी करप्शनच्या कायदयाअंतर्गत किंवा अन्य कोणत्याही बाबीनुसार, त्याच्यामध्ये एखादया कर्मचा-यांकडुन कुठलाही अपहार झाला असेल ,त्याच्यामध्ये कुठलेही क्रिमीनल प्रोसीडींग होणार असेल तर त्या क्रिमीनल प्रोसीडींगच्या गांर्भीयानुसार त्याच्यावरती तात्काळ निलंबीत करण्याच्या सूचना वेळोवेळी शासनाने पारीत केलेल्या आहेत. ॲन्टी करप्शनच्या ट्रॅपमध्ये जर कोणी सापडल आणि ट्रॅपचा रिपोर्ट आपल्याकडे प्राप्त होतो त्याच क्षणी संबंधित कर्मचा-याला निलंबीत करण्याच्या सूचना शासनाकडून प्राप्त आहेत. त्यासोबतच अन्य कुठलेही गंभीर गुन्हे असतील, ज्यांना आयपीसीएस अंतर्गत कुठल्याही प्रकारच्या गुन्हयांमध्ये शासन होणे शक्य असेल अशा गुन्हयांमधील देखील कुठल्याही कर्मचा-यांस जर अरेस्ट झाली आणि

,

४८ तास सलग त्यांना तुरुंगात जाव लागल्यास ऍटोमॅटीक सस्पेंन्ड गृहीत धरण्यात आलं आहे आणि जर तसं न झाल्यास त्यांना निलंबीत करण्याची कारवाई करण्यात येते.या व्यतिरिक्त विविध वेळी कुठल्याही कर्मचा-याकडुन कुठलेही गैरवर्तन झाल्यास,बेजबाबदारपणा झाल्यास त्याचे गांर्भीय ओळखून प्रशासनाच्या वतीने निलंबनाचे आदेश हे पारीत केले जात असतात.मला सभागृहाच्या निदर्शनास आणुन द्यावयाचे आहे की, निलंबन ही शिक्षा नसून ही केवळ अंतर्गत केलेली उपाययोजना असते त्या कालावधीमध्ये संपुर्ण गुन्हयाचा त्या कर्मचा-याने केलेल्या गुन्हयाचा तपास केला जातो त्या तपास कालावधीमध्ये कुठल्याही प्रकारचा तपास कार्यावरती अडथळा आणू नये किंवा जो काही इव्हीडन्स याठिकाणी निर्माण करतो त्याचे कुठल्याही प्रकारे डाक्युमेंट गायब केले जाऊ नये यासाठी संबंधित कर्मचा-यांस त्या कार्यालयापासून दूर ठेवण्याची तरतुद म्हणुन निलंबनाची कारवाई केली जातेअनेक वर्षापासून निलंबनाची कारवाई विविध क्षेत्रामध्ये, विविध कार्यालयामध्ये, विविध संस्थामध्ये वेळोवेळी केली जात असुन मोठया प्रमाणामध्ये कर्मचारी वेळोवेळी निलंबीत केले जात असतात. मात्र अनेक वर्षापासून एक बाब निदर्शनास येत होती की, या विषयामध्ये केवळ विभागीय चौकशी करुन गुन्हा निश्चित किंवा अंतिम होणार नाही.आणि अशाच प्रकरणांमध्ये ज्याच्यामध्ये न्यायालयात प्रकरण चालणार आहे किंवा फौजदारी गुन्हा चालणार आहे त्याच्यामध्ये गंभीर गुन्हयाची त्याची संपुर्ण तपासणी करुन त्याची न्यायीक प्रक्रिया होणार आहे. अशा प्रकरणामध्ये निलंबन कालावधी हा खुप कालावधीसाठी एक्सटेंड होत होतं याच्या सोबतच सुप्रिम कोर्टाने ,हायकोर्टाने वेळोवेळी जे निर्देश दिलेले आहेत याच्यामध्ये निलंबनाबाबत अशा सूचना आहेत की, शक्यतो ३ महिन्याच्या आत निलंबीत झालेल्या कर्मचा-याची चौकशी ३ महिन्याच्या आत तपास पूर्ण करुन त्याच्यावर शास्ती करण्यात यावी. कुठलंही निलंबन शक्यतो ३ महिन्यांपेक्षा जास्त एक्सटेंड केले जाऊ नये, आणि त्याच्यावर एनकेसच्या अंतर्गत ६ महिन्याची देखील मुदत घालण्यात आली होती. तथापि अनेक प्रकरणांमध्ये न्यायीक प्रक्रीयेला खूप मोठया प्रमाणात विलंब लागतो. कदाचित ५ वर्ष, १० वर्षापर्यंत देखील जाऊ शकतो.आणि यामुळे त्या केसेस मध्ये जे कर्मचारी निलंबीत रहात होते त्यांना निलंबन कालावधीमध्ये मोठया प्रमाणामध्ये आपण त्यांना पगार देत असतो त्यांच्याकडुन कुठलेही काम करुन घेतले जात नसत त्यांना आपल्याकडं उपस्थिती द्यावी लागत असते अशा परिस्थितीमध्ये राज्य शासनाने

,

वेळोवेळी निर्देश पारीत केलेले आहेत त्याच्या अंतर्गत १४ ऑक्टोबर २०११ रोजी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक नि प्रआ-१११९/प्र.क्र.८६/११-अ,मंत्रालयय,मुंबई ३२ दि.१४ ऑक्टो २०११ नुसार निलंबीत शासकीय सेवकांच्या प्रकरणांचा आढावा घेण्याच्या सूचना सर्व विभागांना प्राप्त झालेल्या आहेत.या शासन निर्णयाच्या अनुषंगाने निलंबीत शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची कारणे व त्याचे गांभीर्य या विषयावर त्यांच्या प्रकरणाचा आढावा घेण्यासंबंधी वेळोवेळी शासनाने निर्देश दिलेले आहेत. जे की, निर्देश १९९५ पासून उपलब्ध झालेले आहेत या विविध प्रकरणांचा त्या त्या विभागामध्ये एक समिती स्थापन करुन वेळोवेळी आढावा घेणे अपेक्षित करण्यात आले आहे. आणि गुन्हयाचे गांभीर्य आणि त्याच्या तपासाची स्थिती, त्याच्या भोवती होत असलेला खर्च, आणि कर्मचा-याची आवश्यकता याचा एकत्रित साधक बाधक विचार करुन, निलंबनाचा आढावा घेण्याच्या सूचना या शासन निर्णयात निर्गमीत करण्यात आले आहेत. या अनुषंगाने विविध स्तरावरती विविध प्रकारच्या कर्मचा-यांच्या निलंबनाचा आढावा घेण्यासाठी समित्या स्थापन केलेल्या असून महानगरपालिका स्तरावर देखील आयुक्तांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे आणि या समितीच्या समोर विविध निलंबीत कर्मचा-यांच्या प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन केली गेली होती. याअनुषंगाने ९/१/२०१९ रोजी या समितीची गठण,बैठक झाली त्या दिवशी लाचलुचत प्रकरणात निलंबीत असलेल्या एकुण ९ कर्मचा-यांच, फौजदारी प्रकरणातील १३ कमचा-यांच आणि इतर प्रकरणातील २ अशा २४ कर्मचा-यांचा आढावा घेण्यात आला होता.सदर बैठकीमध्ये विविध प्रकरणावर साधक बाधक चर्चा करण्यात आली सुप्रिम कोर्टाचे विविध प्राप्त आदेशाचा विचार करण्यात आला. शासनाच्या अन्य विभागामध्ये या प्रकरणामध्ये काय कारवाई केली गेली आहे.त्याठिकाणी लाचलुचपत प्रकरणांमध्ये निलंबीत असलेल्या कर्मचा-यांना शासनाने रिसेट केलेले आहे का, याचे इव्हीडन्स घेण्यात आले. पुणे महापालिका असेल किंवा अन्य महानगरपालिका असेल किंवा अन्य शासकीय विभागामध्ये काय केले जाते याची माहिती घेण्यात आली त्याचे इव्हीडन्स पाहिले गेले आणि त्यानंतर आपल्या ठिकाणी एकच धोरण लावण्यात आलं ज्या प्रकरणांमध्ये अॅन्टी करप्शनची केस असेल त्याचा प्राथमीक तपास पूर्ण करण्यात आला आहे प्राथमिक तपास पूर्ण केल्यानंतर त्याची चार्जसिट तयार करण्याची परवानगी या प्राधिकरणांकडुन देण्यात आली आहे. आणि त्याच्यासाठी चार्जसिट फाईल तयार होऊन गुन्हयाचा तपास आता न्यायीक प्रकरणांमध्ये समाविष्ठ

,

आहे. आहे अशा प्रकरणांचा आपण आढावा घेतला ज्या प्रकरणांमध्ये मोठा कालावधी झाला होता.आणि तिथे चार्जशिट फाईल तयार होऊन आणि आता केवळ न्यायीक प्रक्रिया करणं बाकी होत अशा प्रकरणांमध्ये त्या कर्मचा-यांना रिसेट करण्याचा समितीचा निर्णय घेतलेला आहे. ज्या प्रकरणांमध्ये गुन्हयाच गांभीर्य की ज्याच्यमध्ये आयपीसी सेक्शन अंतर्गत गंभीर स्वरुपाचे शासन संबंधित कर्मचा-यास होऊ शकतं. जसं की, खुनाचा प्रयत्न असेल,खुन असेल किंवा बलात्कारासंबंधीचे असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे त्या कर्मचा-यांवरती खाजगी आयुष्यांमध्ये घडलेले आहेत अशा स्वरुपाच्या गुन्हयांना मात्र त्याचे गांर्भीय ओळखून त्यांचा रिसेट न केलेला आहे. मात्र विविध ठिकाणच्या कार्यालयामध्ये ज्या ज्या ठिकाणी औपचारीक ॲन्टी करप्शन केसेसमध्ये अडकले होते त्यांना शासन स्तरावरती देखील रिसेट केले गेलेले आहे. अनेक अन्य महापालिकांमध्ये त्याना रिसेट केलेले आहे. हे पाहता या कर्मचा-यांना पुन्हा पुर्नस्थापित करण्याचा निर्णय या समितीने घेतला आणि शासन निर्णयानुसार त्यांच्याकडे कुठल्याही स्वरुपाचा वित्तीय कामकाज देण्यात येणार नाही या प्रकारची संपुर्ण खबरदारी देखील या शासन निर्णयाच्या अनुषंगाने घेण्यात आली आहे.आणि या अनुषंगाने शासन निर्णयानुसार समितीने सविस्तर निर्णय घेऊन २४ प्रकरणांपैकी १६ प्रकरणांमध्ये रिसेट स्टेटमेंट केलेले असुन ७ प्रकरणांमध्ये त्यांचे निलंबन कायम ठेवण्यात आलेलं आहे. तरी वरीलप्रमाणे ही कारवाई संपुर्ण प्रशासकीय पध्दतीची असून कायदेशीर कारवाई आहे.शासन निर्णयानुसार कारवाई झालेली आहे. यामध्ये जर आपल्याला कुठल्या स्वरुपाच्या वेगळया उपाययोजना नियमावली करावयाची असल्यास सभागृहास तशी नियमावली तयार करता येईल. तशी नियमावली केल्यानंतर ती नियमावली शासनास सादर करुन जर आपल्याला असा संदेश द्यायचा असेल की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका MCSR च्या अनुषंगाने त्यात काही सुधारणा करुन त्यात काही ॲडीशन ॲन्टी करप्शन मॅटर असेल किंवा अन्य कुठलही मॅटरमध्ये किती कालावधीपर्यत निलंबन कायम ठेवायचं असेल तसंच ते कायम ठेवायचा असेल तर तशी त्याची नियमावली तयार करुन शासनास सादर करुन शासनाकडुन मान्यता मिळाल्यास तसा बदल करुन त्यानुसार अंमलबजावणी आपण करु शकतो. मात्र सध्या तरी ही कारवाई कुठल्याही स्वत:च्या मनाने केली नसून केवळ शासन निर्णयाच्या फॉलोपसाठी केलेली आहे. आणि त्यानुसार मी कारवाई केल्याचे सन्मानपुर्वक सभागृहासमोर सादर करतो आहे.

,

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आयुक्तांनी जो खुलासा केलेला आहे त्यामध्ये गुन्हयाचं गांर्भीर्य ओळखून समिती नेमली होती. त्यामध्ये २४ लोकं होती. २४ जणांच्या प्रकरणांमध्ये ७ जणांच्या प्रकरण काय आहेत ती आम्हांला समजली नाहीत. २४ पैकी ७ काय किंवा १६ काय याचा विषय आम्हांला काय समजला नाही. पण ज्यावेळेस समिती गठीत केली होती ती समिती कोणाची होती. त्या समितीमध्ये लाचलुचपत मध्ये पकडलेल्या लोकांनाच कामावर घेतलं आहे. बाकीच्या गंभीर गुन्हे काय आहेत याचा कुठे खुलासा दिसत नाही. २४ पैकी लाचलुचपतचेच जास्त गुन्हे दाखल होते. लाचलुचपत प्रकरणांतील ९ लोकांना कामावर घेतले आणि ७ प्रकरण पेंडीग आहेत. संदीप वाघेरे यांनी ज्या काळे नावाच्या अधिका-यांचे नांव घेतले त्या काळेला ९ रु. गुन्हयासाठी आजपर्यंत वेठीस का धरलं जात आहे. याला तो नियम लागू आहे की नाही. काळे हे महापालिकेमध्ये ८/९ वर्षापुर्वी त्याला ९ रु. साठी गफला केला म्हणुन त्याला काढला आणि एका बाजुला एक न्याय आणि दुस-या बाजुला या महापालिकेच्या प्रिमायसेस मध्ये १०/१२ लाख रु. पकडले जातात त्यांना एक न्याय मला वाटतं या २४ लोकांच्या प्रकरणांमध्ये काळेचं नाव का आलेलं नाही. या काळेला निलंबीत का केलं होतं आणि त्याल या प्रकरणांमध्ये का घेतल नाही. आयुक्त सो., महापौर सो. यांना विनंती आहे की, सभागृहाला जर काही नियम करावयाचे असतील तर ते करावे. पण उद्या जाणारा जो संदेश आहे तो प्रामाणिकपणे काम करणारा अधिकारी / कर्मचारी आहे त्याचे खच्चीकरण करण्याचे काम आहे या माध्यमातून करणार आहोत तर मला वाटत आपण एक नियमावली बनवावी आणि त्यांना कुठे तरी ठोस निर्णय घ्यावा. आम्हांला असे दिसते आहे की, यामध्ये १०० टक्के प्रशासन सहभागी आहे. महापौर साहेब आपल्याला विनंती आहे की, हा विषय कुठल्या नियमात बसविणेत आला आहे तो नियम आम्हांला सांगा त्याला उपसूचना देऊन हा विषय थांबवावा आणि कोर्टाचा जो काही निर्णय व्हायचा आहे त्याप्रमाणे त्याला सजा होऊ द्या.पण महानगरपालिकेमध्ये या लोकांना पुन्हा घेऊ नये अशी आमची सभागृहाच्या वतीने आग्रहाची मागणी असेल. आणि काळे ची केस काय आहे ते सांगा. याला ९ रु.चा कागदोपत्री काही तरी फाल्ट आहे. आणि १२ लाख रु. घेतलेले पैसे आणि कागदावरचा फाल्ट यामध्ये जमीन आसमानचा फरक आहे.आणि मग तो काळे कामावर का आला नाही. या काळेचं या समितीमध्ये काही चहापाणी झालं नाही का? असही आम्हांला याठिकाणी

,

दिसतय की, काही आर्थीक व्यवहाराशी काही संबंध झाला का याठिकाणी मोठ मोठे महाभाग सापडले असतील तर मला वाटते, यामध्ये काही तरी झाल आहे. काळेच्या संदर्भात प्रशासनाने माहिती द्यावी आणि लाचलुचपत प्रकरणात ज्या ९ लोकांना घेतलेल आहे त्यांना आमचा विरोध आहे.

**मा.राहूल कलाटे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आयुक्त साहेबांनी जो खुलासा केलेला आहे. १४ ऑक्टोबर च्या शासन निर्णयानुसार समिती गठीत करुन आपण यामधुन मार्ग काढला आणि आपल्या अधिकारात निर्णय घेतलेला आहे. तसे आपणही एक समिती गठीत करुन त्यावर निर्णय घेऊन शासनाकडे पाठविणेत यावा. परंतु हे सगळं करीत असताना आमची अशी मानसिकता होती की, या कर्मचा-यांचा तपास पूर्ण करुन कामावर घेतल असतं तर काही वाटल नसत शेवटी कायद्याच्या पुढं कोणालाही जाता येणार नाही. यामध्ये ९ रु. चा भ्रष्टाचार असो की, १२ लाख रु. भ्रष्टाचार असो जे वाईट कृत्य केले आहे त्याची सजा संबंधित माणसाला मिळाली पाहिजे. जेणेकरुन नागरीकांमध्ये आपल्या सगळयाबद्दल विश्वासहर्ता निर्माण होईल की, आपले प्रतिनिधी त्याठिकाणी पाठविल्यानंतर ते काही तरी बोलतात,प्रशासनावर अंकुश ठेवतात. पण आपण हे सगळं करीत असताना अॅन्टी करप्श्नमध्ये पकडलेले ९ कर्मचा-याना घेतलेले आहे आणि ७ लोकांना बाजुला ठेवलेले आहे. त्यांना का बाजुला ठेवलं, आपल्या सर्वांना माझी विनंती आहे की, आपण एक कायदा करा आणि तो मंजुर करुन पाठवा शासनाकडे जेणेकरुन आज आपण प्रशासनावर बोलतोय त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या कायद्या वाचून दाखविला. म्हणजे त्यांनी जे केल आहे ते कायद्याप्रमाणे केल आहे आणि आपण जे म्हणणार की, अशा लोकांना धडा शिकवला पाहिजे**.** शहरातील नागरीकांना एक संदेश गेला पाहिजे. मी विरोधी पक्षनेता म्हणुन विनंती करतो की, आपण तसा ठराव आणावा आपल्या सर्वांच्या संमतीने तो पास करुन शासनाकडे पाठवू या, आयुक्त सो.सत्ताधारी पक्षनेते एकनाथ पवार सो., आपण याचा पाठपुरावा करतील. परंतु आयुक्त सो.आपण हे करीत असताना खूप घाई केली असे आज सर्व वर्तमानपत्रामध्ये आणि सभागृहामध्ये आणि आज आपण जो खुलासा केला आहे त्यामध्ये आपण समिती गठण केली आणि निर्णय घेतला. त्यामुळे आमच्या मनामध्ये कुठे तरी शंकेची पाल चुकचुकते आहे. आयुक्त सो.आपण देखील यामध्ये बारकाईने लक्ष घालून यामध्ये शासनाकडुन चांगल्या प्रकारे मंजुरी घेता येईल भविष्यकाळात या अधिका-यांकडुन चुकीचे काम

,

करणा-या अधिका-यांवर जरब बसेल अशा प्रकारे आपण सर्वांनी एक कायदा करुन शासनाकडुन त्यांस मंजुरी मिळवून घ्यावी अशी मी विनंती करतो.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, ज्यावेळेस या सभागृहामध्ये उपसूचना वाचली गेली त्यावेळेला वेगळी नांव जेंव्हा ऐकली तेंव्हाच थोडशं मनाला वाटलं की,कशा प्रकारची पारदर्शकता आहे किंवा नाही याच्यामध्येच मनामध्ये शंका आली. आयुक्त सो. ना शासनाच्या सूचना आहेत त्याप्रमाणे त्यांनी मिटींग लावून त्याप्रमाणे तुम्ही काम केलं. आयुक्त सो. तुम्ही तर आता म्हणताय परंतु आम्ही त्याचवेळेला म्हणत होतो की, १२ लाख रु. कॉर्पोरेशनच्या प्रिमायसेस मध्ये एखादया पीए ला कोण देवु शकतो का, हे त्याचवेळेला आमच्या मनामध्ये पाल चुकचुकत होती की,हे पैसे कोणाचे होते मग ते कमिशनरांचे होते का, कमिशनरांकडे पोहचवायचे होते म्हणुन त्या पीए कडे दिले किंवा काय शेवटी भरडला गेला असेल तर तो कर्मचारी भरडला गेला. कारण नगरसेवकांच्या पीए कडं कोण १२ लाख रु.देवु शकतो का ? नाही देवु शकत साहेब, म्हणजे कॉर्पोरेशनच्या प्रिमायसेस मध्ये ज्या ज्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले आहेत.आणि आता हा विषय आला दोन/तीन वर्षापुर्वी शासनाने काढलेल्या शासन निर्णयानुसार त्यांना कामावर परत घ्या अस म्हणता. शिर्के हे पुर्वीपासून कमिशनरचे पीए होते.आम्हाला असे वाटत होते की, शिर्केच्या हातून एवढी मोठी चूक कशी काय घडली. आणि मग याच्या पाठीमागं कोण होतं.हे त्यावेळेला वाटत होतं. आयुक्त साहेब,तुम्ही एक मिटींग घ्यायला पाहिजे होतं. याच्यामध्ये पारदर्शकता नाही. तर तुम्ही सगळयांना बोलवून सांगायला पाहिजे होतं की, शासनाने अशी कमिटी आणली आहे,शासनाने असे,असे सांगितलेले आहे की, या लोकांना परत कामावर घ्या, काही केसेस अशा आहेत की, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल आहेत, त्यांचे निकाल अजुन आलेले नाहीत. म्हणुन त्यांना ठेवलेले आहे. उदा. किरण गायकवाड आहेत यामध्ये ते अधिकारी खूप सुंदर काम करीत होते.आणि त्यांच्याबद्दल आम्हांला ज्यावेळेला ऐकायला आलं त्यावेळेस आम्हांला सुध्दा शॉक बसला.असं त्यांच्याबद्दल त्यांच्या गावाकड घडल आणि कुणी तरी त्यांच्यावर अशी कंम्पलेट केली.हे त्यांच पर्सनली कामाशी आम्हांला काही घेणं / देणं नाही.आयुक्त सो.तुम्ही काय केलं मी ज्या खुर्चीवर बसलो आहे त्यावर मी सांगकाम्या आहे हे तुम्ही सिध्द केल. तुम्ही सांगताना सांगितलं की, तुमचं सभागृह काहीही निर्णय घेऊ शकतो. तुम्ही काहीही निर्णय घ्या मी परत शासनाला

,

पाठविन तुमच्याकडे ज्यावेळेस शासनाची लोकं आली होती त्यावेळेस पदाधिका-यांना बोलावयला पाहिजे होते. त्यांना सांगायला पाहिजे होत की,असे असे आहे त्यामुळे महापौर, पक्षनेता, विरोधी पक्षनेत्यांना बोलवायला पाहिजे होतं. हा मोठा निर्णय आहे तो सभागृहासमोर येणारच,हे त्याच वेळेला हे केलं असत तर शंकेला वाव मिळाला नसता. म्हणुन मी सभागृहाच्या मतांमध्ये जसं आज आहे ती सगळी कमीटी तयार करा आणि त्या कमीटीमध्ये जितक्या लोकांना घ्यायचा आहे तो निर्णय घ्या.निर्णय काय घेणार आहात हे आम्हांला माहितच आहे. कारण याच्यामध्ये मी उदा.यासाठीच दिलं होत की, कोण कुणाकडे पैसे कसे काय देऊ शकतो किंवा काय नाही देवु शकतं. परंतु याच्यामध्ये ती व्यक्ती भरडली जाऊ शकते. तुम्ही पुर्वीपासूनची माहिती काढा पुर्वी पीएमपीएमलच्या भरण्यामध्ये १० रु. जास्त असले तरी त्यांच्यावर कारवाई व्हायची. पीएमपीएमला पैसे जास्त असले तरी पैसे जास्त कसे आले. म्हणुन त्या कंडक्टरवर कारवाई व्हायची. आज काळेसारखी खूप मंडळी असतील ती सगळी काढा आणि या कमीटीपुढे ठेवुन शासनाकडे पाठवावी की, आमच्याकडे पहिल्यापासूनची इतकी लोकं आहेत आणि मग त्यावर निर्णय घेता येईल.काही लोकांना न्याय देता काही लोकांना न्याय देत नाही.लोणकर एकदा तरी साहेबांना समजुन सांगा नाही तर आम्ही सगळे जण थांबतो. माझी सभागृहाला विनंती आहे की, अशा प्रकारच्या कारवाया कोणा कोणावर झालेल्या आहेत. हे सगळं सांगा म्हणजे काळे सारख्या गरीब कर्मचा-यांवर ९ रु. साठी कारवाई केली असेल तर आज त्याची मानसिकता, त्याचे कुटूंब, त्याच्या घराकडे लोकांचा बघण्याचा दृष्टीकोन कसा असेल या सगळया गोष्टीचा विचार करुन या सगळया कर्मचा-यांना जसे सामावून घेणार आहोत तसे आजपर्यंत किती लोक आहेत या सगळयाचा ऊहापोह या कमीटीमध्ये करावा असाच विषय या ठिकाणी मंजुर करु नये,अशी सभागृहाला विनंती आहे.

**मा.सिमा सावळे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह मुळात या कर्मचा-यांचा विषय या विषय पत्रिकेवर नाही. विषयपत्रिकेवर विषय आल्यानंतर निश्चितपणे त्यावर गहण चर्चा करता येईल आणि विषय ज्यावेळेस तुम्ही आणाल त्यावेळेस आमच्या अखत्यारीत असेल, आम्ही नगरसदस्य म्हणुन सभागृहात मांडता त्यामध्ये आमचा काही सहभाग येत असेल, शासनाच्या प्रक्रीयेमध्ये सहभाग येत असेल तर तो विषय आमच्यापुढे आणा आणि नसेल आणायचा तर जी काही कमीटी नेमायची आहे त्यामध्ये महापौर,पक्षनेता यांना घ्या.आम्ही म्हणणार नाही की,ज्यांनी चोरी केली

,

त्यांच्या पाठीशी उभे राहतो, अजिबात नाही परंतु हे सगळं करीत असताना २४ लोकांपैकी ज्या काही लोकांच्या ॲन्टी करप्शनकडे, कोर्टाकडे केसेस असतील मंगलाताईच्या मताशी मी सहमत आहे किरण गायकवाडच्या बाबतीत जेंव्हा पहिल्यांदा जेंव्हा वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचली तेंव्हा विश्वासच बसत नव्हता. असा एवढा चांगला अधिकारी अस काही कृत्य करु शकतो. असेही नाही स्पष्टपणे सांगते. याठिकाणी काही कोर्ट नाही, कोणी न्यायाधिश नाही,कोणी इथं काही चोर नाही, कोणी इथ साव नाही कोण,कोण कुठं शेण खातं हे आख्या शहराला माहित आहे जो पकडला गेला तो चोर, आणि त्यामुळे किरण गायकवाडला त्याची याठिकाणी बाजु मांडण्याची संधी मिळाली नाही कोर्टामध्ये त्यांची केस चालू आहे.ते सत्य होतं की, असत्य होतं हे काळानुरुप ठरणारच आहे. त्याच बरोबर आता मंगलाताईंनी शिर्केच्या बाबतीत उल्लेख केला आहे. शिर्केच्या केसमध्ये आपल्याकडे वारंवार सीसीटीव्ही फुटेजची मागणी केलेली आहे. ते सीसीटीव्ही फुटेज मला असं वाटत जरी कायद्याची बाजु असली तरी सत्ताधारी म्हणुन ते जे काही बोट आमच्याकडे दाखविलं जातं. शिर्के सकाळी ऑफिस मध्ये आल्यापासून एसीबीने कारवाई करुन खाली नेऊन नाही सोडलं ऍक्च्युएली खाली नेऊन कारवाई केली. एसीबीने जी काही कारवाई केली ती सुध्दा आपण त्यात लिहीली. विषय असा आहे की, एखादया अधिका-यांकडुन चुकीच काही घडलं असेल, मी खात नाही, पण चुक होऊ शकते.आणि ती जर केली नसेल तर कोणी गोवलंय का? त्याला त्याच्यामध्ये, त्यांच्या कुटूंबाच काय होतं, मंगलाताईनी विचारलेला प्रश्न रास्त आहे पीए एवढे पैसे घेऊ शकतो का,आमच्या पुढे सुध्दा प्रश्न आहे. अनेक वर्षाची सवय आहे की, तुमच्या बरोबर काम करताना तुमच्याशी संपर्क खुप कमी येतो. पण तुमच्या हाताखाली काम करणा-या कर्मचा-यांशी आमचा संपर्क खूप जास्त असतो. आणि त्या माणसाची नियत कशी आहे हे ओळखायला जास्त वेळ लागत नाही.म्हणुन आमच्या मनामध्ये शंका आहे. आणि त्या शिर्केसाठी अनेक लोकांनी प्रयत्न केलेले आहेत आणि एसीबीने जी कारवाई केली त्याचे सीसीटीव्ही फुटेज लोकांना दाखवा. त्याच्या पाठीशी कोण आहे हे ठामपणे काही सांगता येत नाही. या सगळया अधिका-यावरती जे छोटे,छोटे गुन्हे आहेत त्यांच्यावरती तुमच्या कायद्याच्या चौकटीत राहून तुम्हांला जो काही निर्णय घ्यायचा आहे तो निश्चितपणे घ्या परंतु चुकीचे केले असेल, चोरी केली असेल, भ्रष्टाचार केला असेल अशी लोकं जर का त्या खुर्चीवर बसली तर मात्र काम करण कठीण आहे. आणि या महापालिकेची प्रतिमा

,

डागाळेल आणि संशयाचे वातावरणामध्ये काम होणार नाही. या केसेस मला वाटत ६ महिन्यांपासून ते १० वर्षापर्यंतच्या पेंडीग आहेत. यामध्ये २ वर्षाच्या जास्त पेंडीग आहेत. ॲन्टी करप्श्न हे महानगरपालिकेमध्ये येऊन बसत याचा आम्हांला अभिमान आहे. जो चोरी करील त्याला भिती आणि जो करणार नाही त्याला कशाची भिती. परंतु अशा प्रकारच्या ज्या काही केसेस असतील एक तर त्यांच्यावर गुन्हा सिध्द झाला असेल किंवा नसेल झाला तर त्यामध्ये कायद्याची काय प्रोसेस आहे आणि ती किती लवकर व्हावी त्या खटल्यावरती आणता येतो. आपल्याकडे शासनाचे आणि सुप्रिम कोर्टाचे काय नियम आहेत ३ महिन्याच्या आत त्याची चौकशी करुन त्याच्यावरती जो गुन्हा आहे तो तसाच ठेवुन त्याची चौकशी करायची त्याची सुनावणी घ्यायची आणि त्याला तिथच रुजू करुन घ्यायचं. कारण याच्यावरती आतापर्यंत १.२५ कोटी रु. खर्च केलेले आहेत. तर या सगळयातून आपल्याला सुटका व्हावी असे वाटते. आणि मला अस वाटतंय की तुम्ही त्यांना कुठलेही आर्थीक स्वरुपाचे काम देणार नाही. असं तुमच मत आहे. दुसरी बाजु अशी आहे की, नाही केलं तरी परत येतंच . बांधकाम परवानगी, नगररचना विभाग असेल कुठला विभाग सांगू तुम्हांला.विषय असा आहे की, आम्हांला त्याच्यामध्ये जायच नाही.आमच्याकडे विषयच आणु नका आमच्या सर्वानुमते ती प्रशासनाने याची संपुर्ण जबाबदारी उचलावी आणि तुमच्या स्तरावरती निर्णय घ्यावा. हा विषय मंजुर की नामंजुर घ्यावा की नाही घ्यावा याच्यावर निर्णयच होऊ शकत नाही कारण हा विषय सभागृहाच्या पटलावर विषयच नाही.चर्चा होऊ शकते परंतु निर्णय होऊ शकत नाही. आपण जो निर्णय घ्यावयाचा असेल तर तो पारदर्शी व्हावा. आणि पारदर्शी निर्णय होऊ शकत नाही हे दुर्दैव आहे. प्रशासनाने त्यांनी त्यांचे काम करावे आपण त्यामध्ये सहभागी होऊ नये आणि पुढील विषयाला सुरुवात करावी.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक-३९६ विषय क्रमांक- २
दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा. राजेंद्र लांडगे, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.९० दि.१/३/२०१९

,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर शासन मंजूर असलेले रिक्त पदांवर अथवा नव्याने शासन मंजूर होणा-या आकृतीबंधानुसार उपायुक्त अभिनामाची पदे शासन मंजूर होणार असल्याने व सदरची पदे महापालिका सभेने निर्माण केली असल्याने त्या मंजूर होणा-या सहाय्यक आयुक्त/उपायुक्त या पदावर नियमानुसार सेवाजेष्ठता शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण करणारे पात्रताधारक, पदोन्नती पूर्व प्रशासन अधिकारी या पदावरील सेवाजेष्ठ अधिकारी श्री.श्रीनिवास रामचंद्र दांगट, श्री.राजेश अंकुश आगळे व श्री. सिताराम देवचंद बहुरे यांना नियमानुसार पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच श्री.उल्हास बबनराव जगताप (नगरसचिव) यांची 'सहाय्यक आयुक्त' पदावर नेमणूक करण्यास तसेच त्यांचा महापालिकेतील गट 'ब' पदावरील सेवा कालावधी विचारात घेवून 'सहाय्यक आयुक्त' पदाचे सेवाज्येष्ठतेकामी त्यांना मानीव तारीख निश्चित करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे आणि शासन निर्णयानुसार आणि महापालिकेच्या प्रस्तावित आकृतीबंधानुसार महापालिकेच्या आस्थापनेवर महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम ४५ अन्वये मंजूर गट 'अ' मधील वैधानिक पदावर काम करणा-या अधिका-यांकरीता "अतिरिक्त आयुक्त" अभिनामाचे एक पद शासन मंजूर असून रिक्त आहे. सदर पदावर महापालिका अस्थापनेवरील MMC Act.Sec.45 अन्वये वैधानिक (गट-अ) पदावरील काम करणा-या अधिका-याची नेमणूक करणे आवश्यक असल्याने "अतिरिक्त आयुक्त (२)" या पदाचा अतिरिक्त पदभार श्री.उल्हास बबनराव जगताप यांच्याकडे सोपविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच डॉ. फिरके राजेंद्र प्रल्हाद व डॉ. गोफणे लक्ष्मण पांडुरंग ह्या दोन वैद्यकीय अधिकारी यांना प्रशासन विभागाकडील आदेश क्र. प्रशा/१/कावि/२३५/२०१८ दिनांक ०७/०३/२०१८ अन्वये ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या (Ad-hoc) स्वरुपात दिनांक ०७/०३/२०१८ पासून ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी या वर्ग १ चे पदावर पदोन्नतीची सर्व विहित कार्यपध्दती अनुसरुन मा. विधी व मा. महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्यात आली होती. सदर ११ महिन्याचा कालावधी दिनांक ०७/०२/२०१९ रोजी संपुष्टात आलेला असल्याने ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी या वर्ग १ चे पदावर नियमित पदोन्नतीसाठी वरील दोन अधिकारी सेवाज्येष्ठता व इतर निकषानुसार पात्र ठरत असल्याने त्यांना दिनांक ०७/०२/२०१९ पासून वर्ग १ चे ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी या पदावर नियमित पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच श्री.विजय ज्ञानदेव भोजने, उपअभियंता (स्थापत्य) यांना कार्यकारी अभियंता

'

(स्थापत्य) (वेतन श्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००) या अभिनामाच्या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकुल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सागर गवळी –** मा.महापौर साहेब विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ३९७ विषय क्रमांक- ३
दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.राजेंद्र लांडगे , मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.९१ दि.१/३/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थपनेवरील उप अभियंता (स्थापत्य) पदावर दिनांक ०१/०१/२०१६ रोजी काम करणा-या अधिका-यांची अंतिम सेवाजेष्ठतासूची दिनांक २४/०३/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर अंतिम सेवाजेष्ठतासूचीमधील तीन सेवाजेष्ठ पदविधारक कार्यकारी अभियंता हे नजीकच्या काळात सेवानिवृत्त होत असून सदर रिक्त होणा-या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) अभिनामाच्या मंजूर पदावर (वेतनश्रेणी १५६०० - ३९१०० ग्रेड पे ६६००) खालीलप्रमाणे उपअभियंता पदोन्नतीस पात्र आहेत. त्यामुळे सेवाजेष्ठतेनुसार १) श्रीम.वाघ संध्या नितीन - उप अभियंता, २) श्री.चौरे शिवाजी राजाराम - उप अभियंता ३) श्री.देसले विलास नामदेव - उप अभियंता यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. राजेंद्र लांडगे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

,

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अश्विनी जाधव –** मा.महापौर साहेब विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३९८ | विषय क्रमांक- ४
दिनांक - ६/६/२०१९ | विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/१६/१५२०/२०१८, दि.०६/१२/२०१८
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.४६ दि.२७/२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र.क्रपीसीसी।३०९६।१८०१।सीआर-२६१।नवि-२२, दि.११।०९।१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र.टिमपीएस-१८०५/१०५०/सीआर-७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजुर आहे. तसेच दि.१८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुन:प्रसिद्ध केलेला भाग वगळता उर्वरीत विकास योजना मंजुर असुन शासन निर्णय क्र.टीपीएस-१८१२/१६०/प्र.क्र.५८/१२/पुनर्बांधनी क्र.२७/१२/ईपी मंजुरी/नवि-१३ दि.०२/०३/२०१५ अन्वये उर्वरीत भागच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. सदर मंजुर विकास योजनेत मौजे चोविसावाडी येथील स.नं.१७ व १८ पैकी मध्ये आ.क्र.२/११ अग्निशमन केंद्र (Fire Station) हे ४० आर क्षेत्राचे आरक्षण आरक्षित केलेले आहे. संदर्भीय पत्रान्वये कार्यकारी अभियंता स्थापत्य इ प्रभाग यांनी मौजे चोविसावाडी येथील सदर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील स.नं.१७ पै व १८ पै मधील प्रस्तावित आ.क्र.२/११ अग्निशमन केंद्र (Fire Station) या आरक्षणाकरिता मनपाचे ताब्यात न आलेले उर्वरित सुमारे २० आर क्षेत्राचे भुसंपादन करुन जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेबाबत कळविले आहे. सबब सदरचे आरक्षणाकरिता खाजगी जमिनीचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी मौजे चोविसावाडी येथील स.नं.१७ पै व १८ पै मधील प्रस्तावित आ.क्र.२/११ अग्निशमन केंद्र (Fire Station) या प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव

,

मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम– २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.योगीता नागरगोजे** –मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.संगीता भोंडवे** – मा.महापौर साहेब, विषय क्र. ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३९९ विषय क्रमांक- ५
दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/१८/१७३/२०१७, दि.२५/०९/२०१७
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.४७ दि.२७/२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचा वाहतुकीचे दृष्टीकोनातून विकास करणे आवश्यक आहे. मौजे किवळे येथील स.नं.३९ ते ७१ येथील १८.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा.नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगररसदस्य व नागरिकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे वाहतूकीच्या हितार्थ मौजे किवळे स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी.रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुनिता तापकीर-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

,

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.संगीता भोंडवे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ६

दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/१८/१७४/२०१७, दि.२५/०९/२०१७
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.४८ दि.२७/२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचा वाहतुकीचे दृष्टीकोनातून विकास करणे आवश्यक आहे. मौजे किवळे येथील स.नं. ७३, ७४, ७५ व ७६ येथील १२.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा. नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगरररसदस्य व नागरिकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे वाहतूकीच्या हितार्थ मौजे किवळे स.नं.७३ ते ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत यावी..

**मा.सुनिता तापकीर**- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, ठरावास मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचा मंजूर विकास योजनेमध्ये मौजे चोविसावाडी हे गाव आहे सदर गावामध्ये कॉलनी नं. ५ मध्ये, पुणे-आळंदी ६०.०० मी.रस्त्यापासून संस्कार रेसिडन्सी पर्यंत जाण्यासाठी सुमारे ९.०० मी.रुंदीचा वहिवाटीचा रस्ता आहे. परंतु सदर रस्ता काही ठिकाणी कमी रुंदीचा आहे. तरी या रस्त्याची रुंदी पुर्णपणे ९.०० मी. ने वाढवण्यास मान्यता देणेत यावी. तसेच मौजे थेरगाव येथील वाढती लोकसंख्या लक्षात घेता, नागरिकांच्या सुविधेसाठी खालील आरक्षणे –

१) आ. क्र. ६२३ - उद्यान

,

२) आ. क्र. ६२६ – खेळाचे मैदान
३) आ. क्र. ६२७ क – बस टर्मिनस

व वरील आरक्षणा खालील क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह भूसंपादन अधिनियम १९८४ अन्वये मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यास व संपादन करणेकामी येणा-या खर्चास (भूसंपादन अधिकारी यांनी कळविलेल्या खर्चानुसार) मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश भोईर-** मा.महापौर साहेब,उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा संगीता भोंडवे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- ४०० विषय क्रमांक- ६
दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/१८/१७४/२०१७, दि.२५/०९/२०१७
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.४८ दि.२७/२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचा वाहतुकीचे दृष्टीकोनातून विकास करणे आवश्यक आहे. मौजे किवळे येथील स.नं. ७३, ७४, ७५ व ७६ येथील १२.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा. नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगररसदस्य व नागरिकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे वाहतूकीच्या हितार्थ मौजे किवळे स.नं.७३ ते ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचा मंजूर विकास योजनेमध्ये मौजे चोविसावाडी हे गाव आहे सदर गावामध्ये कॉलनी नं. ५ मध्ये, पुणे-आळंदी ६०.०० मी.रस्त्यापासून संस्कार रेसिडन्सी पर्यंत जाण्यासाठी सुमारे ९.०० मी.रुंदीचा वहिवाटीचा रस्ता आहे. परंतु सदर रस्ता काही ठिकाणी कमी रुंदीचा आहे. तरी या रस्त्याची रुंदी पुर्णपणे ९.०० मी. ने

,

वाढवण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे थेरगाव येथील वाढती लोकसंख्या लक्षात घेता, नागरिकांच्या सुविधेसाठी खालील आरक्षणे –

१) आ. क्र. ६२३ - उद्यान

२) आ. क्र. ६२६ – खेळाचे मैदान

३) आ. क्र. ६२७ क – बस टर्मिनस

व वरील आरक्षणा खालील क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह भूसंपादन अधिनियम १९८४ अन्वये मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यास व संपादन करणेकामी येणा-या खर्चास (भूसंपादन अधिकारी यांनी कळविलेल्या खर्चानुसार) मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.आरती चोंधे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ७

दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०९/२२४/२०१८, दि.१६/१०/२०१८

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.४९ दि.२७/२/२०१९

मौजे वाकड येथील प्राधिकरणाचे मंजुर विकास योजनेनुसार व पिंपरी महानगरपालिकेचे नियोजन नियंत्रण कक्षामध्ये सन १९९८ मध्ये समाविष्ट झालेल्या स.नं. २१० पैकी यामध्ये २४ मी. रूंद रस्ता प्रस्तावित आहे. सदरच्या २४ मी. रस्ता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत स.नं.२१०/३ वाकड येथे सुमारे ९५ मी. लाबींचा असून उर्वरित रस्ता प्राधिकरणाचे हद्दीत आहे. मौजे वाकड येथील स.नं.२१०/३ पैकी १५९६० चौ.मी. क्षेत्रामध्ये म्हातोबानगर ही घोषित झोपडपट्टी असून त्याचे पुनर्वसन करणेचे काम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, सेनापती बापट मार्ग, पुणे यांचे निर्देशनाखाली चालु

,

आहे. म्हातोबानगर झोपडपट्टी, वाकड–डांगे चौक २४ मी. रूंद रस्त्यावर असून पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकास योजना नकाशानुसार २४ मी. रस्ता प्रस्तावित दाखविला आहे. सदरचा रस्ता वेणुनगर इमारतीच्या बांधकामामुळे बाधित होत असल्यामुळे प्रत्यक्षात भविष्यात अस्तित्वात येऊ शकणार नाही. त्यामुळे वाकड-डांगे चौक २४ मी. रुंद रस्ता यावरून स.नं. २१०/३ मधील २४ मी. रूंद रस्ता रद्द करणे उचित होईल. आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे विधानभवन पुणे – ४११ ००१ यांचे पत्र क्र.सआ/भु.सं./तीन ५५०/१९९५ पुणे दि.१४/१०/१९९५ रोजीचे आदेशान्वये मौजे वाकड येथील स.नं.२१०/३ पैकी मधील २४ मी. बाधित सुमारे ९५ मी. ने बाधित क्षेत्र प्राधिकरणाचे नियंत्रण कक्षेतून वगळून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण हद्दीत येत असून सदर रस्ता वगळणेकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून कार्यवाही करावी लागेल. उपरोक्त बाबी पहाता प्राधिकरणाच्या नियंत्रण कक्षेतून वगळून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण हद्दीमध्ये ९५ मी. लाबींचा रस्ता महानगरपालिकेच्या हद्दीत येत आहे. सदर रस्त्याचे जागेमध्ये म्हातोबानगर झोपडपट्टी आहे व त्याचे पुनर्वसन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सेनापती बापट मार्ग, पुणे यांच्या नियोजनाद्वारे चालु आहे. प्राधिकरणाने त्यांच्या सेक्टर ४० च्या मंजूर रेखांकन नकाशा (लेआऊट) मध्ये सदर ९५ मी. लांबीचा स.नं.२१० वाकड मधील प्रस्तावित रस्ता दाखविल्याचे दिसून येत नाही.तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना पाठविलेले पत्र दि. ०८/०५/२०१८ द्वारे “प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील अर्जदार यांनी नमूद केलेला २४ मी. रूंदीचा रस्ता हा मौजे वाकड स.नं.१७८ व स.नं.२१० मध्ये दर्शविलेला असून स.नं.१७८ मध्ये प्राधिकरणाने राबविलेल्या गृहयोजनेमुळे सदर रस्त्याची आखणी ही विकास योजनेनुसार करणे शक्य नाही. स.नं.१७८ मधील सदर २४ मी. रूंद रस्ता हा कॅनॉलच्या दोन्ही बाजुंनी १२ मी. रूंद दर्शविलेला आहे व तो विकसित आहे. प्राधिकरण हद्दी बाहेरील मौजे वाकड स.नं.२१० भाग मधील मंजूर विकास योजनेतील २४ मी. रूंद रस्त्याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.” असे कळविले आहे. तरी सदरचा प्रस्तावित २४ मी. रस्ता रद्द करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करावा लागेल. उपरोक्त विषयांकित प्रकरणी सदरचा २४.० मी. रस्ता रद्द

,

करणेबाबतचा फेरबदल प्रस्ताव म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.निर्मला कुटे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके**- मा.महापौर साहेब, ठरावास मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील मौजे किवळे येथील स.न. ९१ व स.न. ९२ पैकी मधुन जाणारा १२.० मी. रुंद रस्ता स.न. ९१ मध्ये स्थलांतर करणेसाठी म. प्रा. व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाची आखणीस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र शासनास सन २०१७ साली सादर करणेत आला होता. परंतु महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय क्र. – टीपीएस -१८१७/१९६३/प्र.क्र. ५/१८/नवि १३ दि. २६/०२/२०१८ नुसार सदरचा फेरबदलाचा प्रस्ताव नामंजुर करणेत आलेला आहे.

मंजुर विकास योजनेतील रस्त्याचे आखणीमुळे ग्रामपंचायत काळापासुन आस्तित्वात असलेल्या स.न. ९२ मधील घरांना बाधा पोहोचत असल्याने सदरचा रस्ता प्रारुप विकास योजनेत प्रस्तावित केलेप्रमाणे स.न. ९१ मधील मोकळ्या जागेत स्थलांतरीत करणेबाबतचा कलम ३७ चा प्रस्ताव प्रस्तावित करणेत आला होता.

सदर मंजुर विकास योजनेतील रस्त्याच्या आखणीमुळे ग्रामपंचायतीचे काळातील घरे बाधित होत असल्याने स्थानिक नागरीक बेघर होणार आहेत. महानगरपालिकेने प्रस्तावित केलेप्रमाणे कलम ३७ चा प्रस्ताव पुनश्च: शासनाकडे पाठविणेचे प्रस्तावास व सदर कलम ३७ चे प्रस्तावाचे अधिकार मा. आयुक्तांना देणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजनेमध्ये मौजे पिंपरी वाघेरे येथील सि.स.नं.१४४ पै. या मिळकती मधील ६८०० चौ.मी.क्षेत्र आ.क्र.१६६ उद्यान या प्रयोजनार्थ आरक्षित करण्यात आलेले आहे. सदरच्या आरक्षणालगत पश्चिम बाजूस अस्तित्वातील अत्यंत जुनी स्मशानभूमी आहे. वाढत्या शहरीकरणामुळे सदरची स्मशानभूमी अपुरी पडत असल्याने अस्तित्वातील स्मशानभूमी लगतच्या आ.क्र.१६६ उद्यान या प्रयोजनार्थ आरक्षित जागेमध्ये आधुनिक स्मशानभूमी बांधणे व अस्तित्वातील स्मशानभूमीची जागा सलगच्या आ.क्र.१६६ उद्यान या प्रयोजनार्थ आरक्षित जागेमध्ये समाविष्ठ करणे याप्रमाणे फेरबदलाची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

,

वरील बाबीचा विचार करून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजनेमधील मौजे पिंपरी वाघेरे येथील सि.स.नं.१४४ पै. या मिळकतीतील आ.क्र.१६६ उद्यान या प्रयोजनार्थ आरक्षित जागेपैकी दक्षिणेकडील २००० चौ.मी.क्षेत्र स्मशानभूमी या प्रयोजनार्थ आरक्षित करणे व अस्तित्वातील स्मशानभूमीचे क्षेत्र आ.क्र.१६६ उद्यान या प्रयोजनार्थ आरक्षित जागेमध्ये समाविष्ठ करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास आणि फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करणेकामी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत मौजे सांगवी येथील स. न. ७१ व ७२ येथील मिळकतीमध्ये आ. क्र. ३४० “खेळाचे मैदान” क्षेत्र १०००० चौ.मी. प्रस्तावित केलेले आहे. सदर आरक्षणाच्या क्षेत्रात स. न. ७१ मध्ये २५० चौ.मी. क्षेत्रात शाळा बांधलेली आहे. सदर शाळेत मध्यमवर्गीय मुलेमुली शिकत आहेत. सदरची शाळा २० वर्षे जुनी आहे. त्यामुळे सदरची अस्तित्वातील शाळेचे २५० चौ.मी. क्षेत्र आ.क्र. ३४० “खेळाचे मैदान” मधुन वगळण्याच्या फेरबदलाची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९३३ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करणेकामी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात यावी.

तसेच बो-हाडेवाडी गट नं 757 मधील 12 मी. रस्ता रद्द करावा कारण या 12 मी रस्ता मध्ये काही घरे जात आहे. घराच्या शेजारी जागेवर डांबरी रस्ता आहे. तसेच २) पुणे नाशिक हायवे व जाधववाडी पुर्व पश्चिम १८ मी. रस्त्यापासून दक्षिण उत्तर रस्ता रद्द करणे बाबत, बो-हाडेवाडी गट नं 632 ते 653 पर्यंत चा 18 मी. रस्ता रद्द करावा या रस्त्या मध्ये स्थानिक शेतक-यांच्या जमिन मध्ये 35 वर्षे जुनी चिकूची 60 झाडे आहे. 40 नारळ ची झाडे, 10 आब्यांची झाडे आहेत. हा रस्ता जागेवर पाहणी न करता हा रस्ता टाकण्यात आला आहे. या रस्त्यामुळे शेतक-यांचे नुकसान होत आहे. तसेच या रस्त्याची आवश्यकता नाही त्यामुळे हा रस्ता रद्द करणेस मान्यता देणेत यावी. ३) बो-हाडेवाडी गट नं जुने 1388,1389,1375 या मधील आरक्षण क्र. G1/166 रद्द करणेस मान्यता देणेत यावी. ४) त्याचप्रमाणे मोशी गट नं जुना 467 नविन ४६९ या गटातील

,

आरक्षण क्र. MP1/192A,MP1/192 B रद्द करावे कारण या जागेवर स्थानिक शेतकरी 1984 सालापासून येथे राहत आहे. त्यांना बेघर होण्याची वेळ येईल.

सबब वरील नमुद केलेल्या रस्ता व अरक्षण रद्द करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना कलम ३७ अन्वये फेरबदल करावा लागेल. उपरोक्त विषयांकित प्रकरणी सदरचा १८ मी. व १२ मी तसेच सदरील भागातील आरक्षणे रद्द करणेस मान्यता देणेत यावी. व तद्अनुषंगाने सदरचे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत यावी. तरी वरील प्रमाणे प्रस्तावास शासन मान्यता घेणेकामी मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश भोईर** – मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.आरती चोंधे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- ४०१ विषय क्रमांक- ७
दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०९/२२४/२०१८, दि.१६/१०/२०१८
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.४९ दि.२७/२/२०१९

मौजे वाकड येथील प्राधिकरणाचे मंजुर विकास योजनेनुसार व पिंपरी महानगरपालिकेचे नियोजन नियंत्रण कक्षामध्ये सन १९९८ मध्ये समाविष्ट झालेल्या स.नं. २१० पैकी यामध्ये २४ मी. रूंद रस्ता प्रस्तावित आहे. सदरच्या २४ मी. रस्ता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत स.नं.२१०/३ वाकड येथे सुमारे ९५ मी. लाबींचा असून उर्वरित रस्ता प्राधिकरणाचे हद्दीत आहे. मौजे वाकड येथील स.नं.२१०/३ पैकी १५९६० चौ.मी. क्षेत्रामध्ये म्हातोबानगर ही घोषित झोपडपट्टी असून त्याचे पुनर्वसन करणेचे काम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, सेनापती बापट मार्ग, पुणे यांचे निर्देशनाखाली चालु आहे. म्हातोबानगर झोपडपट्टी, वाकड–डांगे चौक २४ मी. रूंद रस्त्यावर असून पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकास योजना नकाशानुसार २४ मी. रस्ता प्रस्तावित दाखविला आहे. सदरचा रस्ता वेणुनगर इमारतीच्या बांधकामामुळे बाधित होत असल्यामुळे प्रत्यक्षात भविष्यात अस्तित्वात येऊ शकणार नाही. त्यामुळे वाकड-डांगे

,

चौक २४ मी. रुंद रस्ता यावरून स.नं. २१०/३ मधील २४ मी. रूंद रस्ता रद्द करणे उचित होईल. आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे विधानभवन पुणे – ४११ ००१ यांचे पत्र क्र.सआ/भु.सं./तीन ५५०/१९९५ पुणे दि.१४/१०/१९९५ रोजीचे आदेशान्वये मौजे वाकड येथील स.नं.२१०/३ पैकी मधील २४ मी. बाधित सुमारे ९५ मी. ने बाधित क्षेत्र प्राधिकरणाचे नियंत्रण कक्षेतून वगळून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण हद्दीत येत असून सदर रस्ता वगळणेकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून कार्यवाही करावी लागेल. उपरोक्त बाबी पहाता प्राधिकरणाच्या नियंत्रण कक्षेतून वगळून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण हद्दीमध्ये ९५ मी. लाबींचा रस्ता महानगरपालिकेच्या हद्दीत येत आहे. सदर रस्त्याचे जागेमध्ये म्हातोबानगर झोपडपट्टी आहे व त्याचे पुनर्वसन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सेनापती बापट मार्ग, पुणे यांच्या नियोजनाद्वारे चालु आहे. प्राधिकरणाने त्यांच्या सेक्टर ४० च्या मंजूर रेखांकन नकाशा (लेआऊट) मध्ये सदर ९५ मी. लांबीचा स.नं.२१० वाकड मधील प्रस्तावित रस्ता दाखविल्याचे दिसून येत नाही. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना पाठविलेले पत्र दि. ०८/०५/२०१८ द्वारे “प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील अर्जदार यांनी नमूद केलेला २४ मी. रूंदीचा रस्ता हा मौजे वाकड स.नं.१७८ व स.नं.२१० मध्ये दर्शविलेला असून स.नं.१७८ मध्ये प्राधिकरणाने राबविलेल्या गृहयोजनेमुळे सदर रस्त्याची आखणी ही विकास योजनेनुसार करणे शक्य नाही. स.नं.१७८ मधील सदर २४ मी. रूंद रस्ता हा कॅनॉलच्या दोन्ही बाजुंनी १२ मी. रूंद दर्शविलेला आहे व तो विकसित आहे. प्राधिकरण हद्दी बाहेरील मौजे वाकड स.नं.२१० भाग मधील मंजूर विकास योजनेतील २४ मी. रूंद रस्त्याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.” असे कळविले आहे. तरी सदरचा प्रस्तावित २४ मी. रस्ता रद्द करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करावा लागेल. उपरोक्त विषयांकित प्रकरणी सदरचा २४.० मी. रस्ता रद्द करणेबाबतचा फेरबदल प्रस्ताव म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील मौजे किवळे येथील स.न. ९१ व स.न. ९२ पैकी मधुन जाणारा १२.० मी. रुंद रस्ता स.न. ९१ मध्ये स्थलांतर करणेसाठी म. प्रा. व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाची आखणीस मान्यता मिळणेबाबतचा

,

प्रस्ताव महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र शासनास सन २०१७ साली सादर करणेत आला होता. परंतु महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय क्र. – टीपीएस -१८१७/१९६३/प्र.क्र. ५/१८/नवि १३ दि. २६/०२/२०१८ नुसार सदरचा फेरबदलाचा प्रस्ताव नामंजुर करणेत आलेला आहे.

मंजुर विकास योजनेतील रस्त्याचे आखणीमुळे ग्रामपंचायत काळापासुन आस्तित्वात असलेल्या स.न. ९२ मधील घरांना बाधा पोहोचत असल्याने सदरचा रस्ता प्रारुप विकास योजनेत प्रस्तावित केलेप्रमाणे स.न. ९१ मधील मोकळ्या जागेत स्थलांतरीत करणेबाबतचा कलम ३७ चा प्रस्ताव प्रस्तावित करणेत आला होता.

सदर मंजुर विकास योजनेतील रस्त्याच्या आखणीमुळे ग्रामपंचायतीचे काळातील घरे बाधित होत असल्याने स्थानिक नागरीक बेघर होणार आहेत. महानगरपालिकेने प्रस्तावित केलेप्रमाणे कलम ३७ चा प्रस्ताव पुनश्च: शासनाकडे पाठविणेचे प्रस्तावास व सदर कलम ३७ चे प्रस्तावाचे अधिकार मा. आयुक्तांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजनेमध्ये मौजे पिंपरी वाघेरे येथील सि.स.नं.१४४ पै. या मिळकती मधील ६८०० चौ.मी.क्षेत्र आ.क्र.१६६ उद्यान या प्रयोजनार्थ आरक्षित करण्यात आलेले आहे. सदरच्या आरक्षणालगत पश्चिम बाजूस अस्तित्वातील अत्यंत जुनी स्मशानभूमी आहे. वाढत्या शहरीकरणामुळे सदरची स्मशानभूमी अपुरी पडत असल्याने अस्तित्वातील स्मशानभूमी लगतच्या आ.क्र.१६६ उद्यान या प्रयोजनार्थ आरक्षित जागेमध्ये आधुनिक स्मशानभूमी बांधणे व अस्तित्वातील स्मशानभूमीची जागा सलगच्या आ.क्र.१६६ उद्यान या प्रयोजनार्थ आरक्षित जागेमध्ये समाविष्ठ करणे याप्रमाणे फेरबदलाची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

वरील बाबीचा विचार करून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजनेमधील मौजे पिंपरी वाघेरे येथील सि.स.नं.१४४ पै. या मिळकतीतील आ.क्र.१६६ उद्यान या प्रयोजनार्थ आरक्षित जागेपैकी दक्षिणेकडील २००० चौ.मी.क्षेत्र स्मशानभूमी या प्रयोजनार्थ आरक्षित करणे व अस्तित्वातील स्मशानभूमीचे क्षेत्र आ.क्र.१६६ उद्यान या प्रयोजनार्थ आरक्षित जागेमध्ये समाविष्ठ करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास आणि फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करणेकामी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

,

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत मौजे सांगवी येथील स. न. ७१ व ७२ येथील मिळकतीमध्ये आ. क्र. ३४० “खेळाचे मैदान” क्षेत्र १०००० चौ.मी. प्रस्तावित केलेले आहे. सदर आरक्षणाच्या क्षेत्रात स. न. ७१ मध्ये २५० चौ.मी. क्षेत्रात शाळा बांधलेली आहे. सदर शाळेत मध्यमवर्गीय मुलेमुली शिकत आहेत. सदरची शाळा २० वर्षे जुनी आहे. त्यामुळे सदरची अस्तित्वातील शाळेचे २५० चौ.मी. क्षेत्र आ.क्र. ३४० “खेळाचे मैदान” मधुन वगळण्याच्या फेरबदलाची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९३३ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करणेकामी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच बो-हाडेवाडी गट नं 757 मधील 12 मी. रस्ता रद्द करावा कारण या 12 मी रस्ता मध्ये काही घरे जात आहे. घराच्या शेजारी जागेवर डांबरी रस्ता आहे. तसेच २) पुणे नाशिक हायवे व जाधववाडी पुर्व पश्चिम १८ मी. रस्त्यापासून दक्षिण उत्तर रस्ता रद्द करणे बाबत, बो-हाडेवाडी गट नं 632 ते 653 पर्यंत चा 18 मी. रस्ता रद्द करावा या रस्त्या मध्ये स्थानिक शेतक-यांच्या जमिन मध्ये 35 वर्षे जुनी चिकूची 60 झाडे आहे. 40 नारळ ची झाडे, 10 आब्यांची झाडे आहेत. हा रस्ता जागेवर पाहणी न करता हा रस्ता टाकण्यात आला आहे. या रस्त्यामुळे शेतक-यांचे नुकसान होत आहे. तसेच या रस्त्याची आवश्यकता नाही त्यामुळे हा रस्ता रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. ३) बो-हाडेवाडी गट नं जुने 1388,1389,1375 या मधील आरक्षण क्र. G1/166 रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. ४) त्याचप्रमाणे मोशी गट नं जुना 467 नविन ४६९ या गटातील आरक्षण क्र. MP1/192A,MP1/192 B रद्द करावे कारण या जागेवर स्थानिक शेतकरी 1984 सालापासून येथे राहत आहे. त्यांना बेघर होण्याची वेळ येईल.

सबब वरील नमुद केलेल्या रस्ता व अरक्षण रद्द करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना कलम ३७ अन्वये फेरबदल करावा लागेल. उपरोक्त विषयांकित प्रकरणी सदरचा १८ मी. व १२ मी तसेच सदरील भागातील आरक्षणे रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. व तद्अनुषंगाने सदरचे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे. तरी वरील प्रमाणे प्रस्तावास शासन मान्यता घेणेकामी मान्यता देणेत येत आहे.

,

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.लक्ष्मण उंडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ४०२ विषय क्रमांक- ८
दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था.उद्यान/कावि/०५/२०१९, दि.०४/०१/२०१९
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.५० दि.२७/२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात भिमसृष्टी तयार करण्याचे काम सध्या सुरु आहे. सदर भिमसृष्टीचे काम सुरु असताना स्थानिक नगरसदस्य व नगरसदस्या, धम्मदीप प्रतिष्टान, पिंपरी व डॉ.बी.आर. आंबेडकर ग्रुप निगडी या संघटनेने सदर ठिकाणी माता रमाई आंबेडकर यांचा पुतळा व उद्यान विकसित करण्याची मागणी केलेली आहे. या मागणीचा विचार करून मा.महापौर यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. तरी पिंपरी चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात माता रमाई आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. राजेंद्र लांडगे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, या विषयाला अनुसरुन विषय आहे. कमिशनरांना मी गेली ६ महिने झाले पत्र देत आहे. शाहू सृष्टीसमोर, कमिशनरांच्या घरासमोर आहे. आणि गेल्या ४ वर्षापुर्वीचं टेंडर प्रोसीजर टेंडर मंजुर झाल्यानंतर एक वर्षाची मुदत होती. आज ती मुदत ३ वर्ष मला वाटत परवाच्या ४ दिवसांपुर्वी तुम्हांला स्मरणपत्र सुध्दा दिलेलं आहे. मला वाटतं पत्राला उत्तर न देणारे पहिले कमिशनर असाल. ६ महिन्यापुर्वी तुम्हाला या सगळया गोष्टीची आठवण करुन दिली की,जे प्रलंबीत विषय आहेत त्या विषयांवर पुढे काय प्रोसीजर करणार आहात, या विषयांबद्दल आम्हांला काही नाही , पिंपरी चिंचवड चांगल व्हायला पाहिजे, आंबेडकर पुतळयाच्या ठिकाणी भीमसृष्टी चांगली झाली पाहिजे. पण शाहू सृष्टीच्या संदर्भात

,

सभागृहात खुलासा करुन दाखववा. २६ जुनला शाहू महाराजांना माननारे सगळे लोक याठिकाणी आहेत. आज गेली ३ वर्ष म्हणजे त्या माणसाची टेंडरची मुदत संपुण झाली आहे आज त्या माणसांवर काय कारवाई केलेली आहे.आज तुम्ही एखादी गोष्ट आणणार असं एखादं मोठ स्वप्न दाखवून तुम्ही किती वर्ष पुढ जाणार. बाकीच्या प्रोसेस करुन ते काम पुर्ण करायला पाहिजे होतं. आणि बाकीचं तुम्हांला भव्य - दिव्य सुंदर काय करावयाचं होत त्यासाठी काय केल असत तर बरं वाटल असतं. परंतु काम जैसे थे आहे मला असं वाटत की, तुम्ही घरातुन बाहेर पडलं की, डाव्या हातान न जाता कधी तरी शाहू महाराजांच्या उजव्या हातान या आणि शाहू सृष्टीचे जे कामकाज आहे त्याची ३ वर्षाची मुदत संपलेली आहे. आम्हांला शाहू सृष्टी करायची नाही असं सांगून टाका. माझे सर्व सहकारी शाहू महाराजांना माननारे आहेत अशा प्रकारे प्रत्येकाच्या वॉर्डामध्ये कुठले ना कुठले तरी विषय असतील की, ३/४ वर्षापूवीचे पेंडींग आहेत. पत्र दिलं तरी आपण त्या विषयाकडे लक्ष देत नाही. यासंबंधी चौकशी केली असता नितीन देसाईना काही लेबल लावल आहे का? आपल्या सगळया प्रोजेक्टला नितीन देसाईच पाहिजे का, नितीन देसाईच्या वरती कोणी तरी असतील ना त्यांच्यापेक्षा कोणी तरी चांगले करणारे असतील ना, का नाहीत. का फक्त नितीन देसाईच, मी कोल्हापूरची आहे म्हणुन मला सारख नितीन देसाई सांगता का, मी चौकशी केली तेंव्हा कमिशनर साहेबांनी सांगीतल की या प्रोजेक्टसाठी नितीन देसाईला बोलवणार मग तुमची इतकी कॅपॅसिटी नाही का ? हे योग्य नाही. शहर आज ना उद्या याची १०० टक्के दखल घेईल,२६ जुलै हा परत शाहू महाराजांच्या जयंतीचा दिवस आलेला आहे. मी गेली ६ महिन्यापासून तुमच्याकडे पाठपुरावा करीत आहे की, जयंतीच्या आगोदर त्याठिकाणी असणारे जे काही कामकाज करुन घ्यावे आणि तो ठेकेदार काम करीत नसेल तर त्याच्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहात. का, त्या ठेकेदारावर तुम्हांला काही कारवाई करावयाची नाही.आम्हांला काहीच कळत नाही, कामकाज काय करायचे आहे हेच तुम्हांला कळत नाही.या निवडणुकीच्या आधी एक वर्षापुर्वी टेंडर झालेले आहे त्याला काम करण्याची १२ महिन्याची मुदत आहे असे असतांनाही त्या ठेकेदारांने काम का केलेले नाही त्यांनी ते काम पेंडींग ठेवलेले आहे. असे का केलं तर म्हणे कमिशनरांना त्या प्रोजेक्टसाठी नितीन देसाईनाच ठेवायचे आहे असे त्या अधिका-यांनी सांगितले आहे. मी जाहीर नांव घेते मी कधीही मनाने बोलत नाही. तुम्ही हे विषय करणार आहात का ? भीमसृष्टी सारखंच करणार आहात का ? २६ जुन तुम्ही जयंती साजरी करु नका कोल्हापुरवाले शाहू

,

महाराजांना कसा हार घालायचा ते घालतील आणि कार्यक्रम करतील. महापौर साहेब तुम्ही तिकडे फिरकू नका. त्या प्रोजेक्टला ३/४ वर्ष लागत असतील तर अजिबात करु नका. भीमसृष्टीचा प्रोजेक्ट करा, यासाठी जो काही खर्च येईल तो करा त्याच बरोबर रमाताई आंबेडकर यांची सृष्टी सुध्दा खूप सुंदर करा, आमच काही म्हणणं नाही. परंतु मागच काय करताय ते बघा ना. पत्र देऊन सुध्दा त्या पत्राकडे साधं बघत सुध्दा नाही. ४/४ वर्ष होऊन सुध्दा काम होत नाहीत म्हणजे तुम्हांला शासनाच्या लोकांचेच फोन आले पाहिजेत का ? असे सांगा, असे काही नाही की, आमचे त्याठिकाणी काही चालणार नाही. आम्ही सुध्दा मुख्यमंत्र्यांना सांगू शकतो.तुम्ही आम्हांला कळवा की, तिकडुन फोन आला पाहिजे तसं कळवा, आम्ही पत्र देऊन सुध्दा तुम्हांला काही फरक पडत नसेल तर या सभागृहामध्ये त्याचा खुलासा झाला पाहिजे. महापौर साहेब, याचा खुलासा करण्यास सांगा नाही तर तुम्हांला सुध्दा कार्यक्रमाला येऊ देणार नाही.

**मा.महापौर –** मी तुमच्या गाडीमध्ये बसुन येईन.

**मा.एकनाथ पवार –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, खरं तर विषय माता रमाईच्या पुतळयाचा आहे आणि तो आंबेडकर पुतळयाच्या इथं करायचा आहे. ताई तुम्ही या शहराच्या खुप मोठया सन्मा.नेत्या आहात तुम्हांला या महापालिकेच्या कामाचा खूप गाढा अभ्यास आहे. ताई तुम्ही बोलता,बोलता खुप अक्रास्ताळेपणा कमिशनरवर होता.कारण ज्या पध्दतीने तुम्ही याच्याकडुन फोन आला पाहिजे, त्याच्याकडन फोन आला पाहिजे, नितीन देसाईच का असं तुम्हांला वाटतय, पण कधी कधी आपण भान ठेवलं पाहिजे की, आपण विरोधी पक्षाचे आहोत.एखादया कामाचा टेंडर निघाल्यानंतर चांगल आहे,वाईट आहे, चांगल दिसलं पाहिजे. आणि छत्रपती शाहू महाराजांच्या बद्दल महाराष्ट्रातील सगळया माणसांना यांचा अभिमान आहे. आणि तुम्ही म्हणताय की, कोण हार घालणार आहे बघते, शाहू महाराजांवरच प्रेम हे या महाराष्ट्रातील दलीतांना सर्व गांजलेल्या सर्व समाजाच्या माणसांना आहे असं चॅलेंज नका करु कोण हार घालायला येतंय आणि अशा पध्दतीचं तुमचं एखादं काम आडल, तुमच्या मनासारखं नाही झालं तर कमीशनर काम करीत नाहीत असे वाटते ताई आपण या महापालिकेचे सर्वोच्च असं महापौर पद आपण उपभोगलेले आहे, सत्ताधारी पक्षाचे नेते होता तरी आपण ऊठ सुठ महापौरांना चॅलेंज द्यायचं, कमीशनरला चॅंलेज द्यायचं हे चुकीचे आहे. माता रमाईचा पुर्णाकृती पुतळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात उभारणेत यावा व

,

उदयान विकसीत करणेचा विषय आहे.नितीन देसाई हे खरं तर चांगले आर्टीस्ट आहेत तुम्ही एखादं चांगल डिझाईन केल असेल त्यापेक्षा चांगल डिझाईन केल खरं तर आम्हांला त्याठिकाणी शाहू महाराजांची सृष्टी त्याठिकाणी साकारायची आहे लोकांना या शहरामध्ये बघावस वाटतय की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून शाहू महाराजांची सृष्टी साकारतोय एक प्रेक्षणीय स्थळ झालं पाहिजे, शाहू महाराजांकडे बघुन लोकांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे. या भावनेतून छोटासा प्रयत्न करतोय एखादं काम सुचवल की, त्याच इस्टीमेट तयार करणे, टेंडर काढणे, टेंडर प्रसिध्दीस देणे,यासाठी वेळ लागतो. आणि हे आपल्यालाही माहिती आहे. आपले मंत्रालयामध्ये खुप चांगले संबंध आहेत मंत्रालयातून तुम्ही मा.मुख्यमंत्री,मा.पंतप्रधानाशी तुम्ही डायरेक्ट बोलता याची मला कल्पना आहे परंतु या महापालिकेमध्ये एखादा अधिकारी जेंव्हा चांगले काम करतो त्याला मोटीवेट करा आणि त्यांनी चांगलं काम करीत असताना आयुक्त सो. आपल्याला विनंती आहे की, सर्व सन्माननीयांच्या पत्राला उत्तर देण्यासाठी एका क्लार्कची आपण नेमणुक करावी. एखादया सन्मा.सदस्याला त्याला त्याच्या पत्राच उत्तरामधुन समाधान होत असेल तर आम्ही निश्चितच आम्हांला समाधान आहे. आणि मी मनापासून सांगतो की, २६ तारखेला आपण छत्रपती शाहु महाराजांची जयंती आपण साजरी करणार आहोत. आणि पुढच्या छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती पर्यंत निश्चितच शाहू सृष्टीचं काम झालं पाहिजे. आणि सत्ताधारी म्हणुन आमचा मनोदय आहे. आणि माझी तुम्हांला विनंती आहे की, तुम्ही कोल्हापुरकर,कोल्हापुरकर म्हणताय, पण आम्हीही कोल्हापुरकरांचे नातेवाईक आहोत आणि आपल्याला विनंती करतो की, शाहू महाराजांना मर्यादीत ठेवू नका आणि हा विषय मंजुर करणेत यावा आणि पुढील विषयाला सुरुवात करावी.

**मा.सचिन चिखले –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, खरं तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या परीसरामध्ये माता रमाई आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यात यावा अशी सर्वात पहिली मागणी कोणी केली असेल तर ती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनी केली आहे. आपण गेली ३/४ वर्षापासून सतत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सर्व सामाजिक संस्था असतील,सामाजिक कार्यकर्ते असतील, महापालिकेचे नगरसेवक असतील,नगरसेविका असतील आपण सर्वच जणांनी सांगीतल की, त्या परिसरामध्ये माता रमाई आंबेडकर यांचा पुतळा पाहिजे.आज आपण पाहतो की,ज्यावेळेस डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती असते त्यावेळेस आपण पिंपरी चौकामध्ये येतो

,

आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना नतमस्तक होऊन पुन्हा आपआपल्या घरी जातात. आणि सर्वांचीच पिंपरीतील सर्व नगरवासियांची इच्छा होती की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या परीसरामध्ये माता रमाई आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यात यावा. आणि हा विषय सर्व नगरसेवकांच्या मागणीनुसार जीबी समोर आलेला आहे. त्यामुळे सर्व नगरसेवकांचे आणि आयुक्तांचे मी अभिनंदन करतो. सदर परीसराचे लवकरात लवकर सुशोभिकरण करुन त्याठिकाणी माता रमाई आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यात यावा आणि तो परीसर लोकांना खुला करण्यात यावा.त्याचप्रमाणे काही महिन्यांपुर्वी भक्ती-शक्तीचाही पुतळयाच्या संदर्भात नितीन देसाई यांनी सकाळी,सकाळी जाऊन त्याठिकाणी व्हीजीट केली आणि आपण सर्वांनी त्याठिकाणी पहाणी केली. भक्ती-शक्तीच्या पुतळयाच्या ठिकाणी आपण नेमकं काय करणार आहात, आपल्या डोक्यांमध्ये काय कल्पना आहेत याचं लवकरात लवकर सादरीकरण करण्यात यावं. आणि भक्ती-शक्तीच्या शिल्पाचं काम लवकरात लवकर पुर्ण करण्यात यावं जेणेकरुन उड्डाणपुलाचं काम आणि भक्ती-शक्तीच्या शिल्पाचं काम या दोन्ही कामाच उद्धघाटन एकाच वेळी होईल असा प्रयत्न करावा अशी विनंती करतो.

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, खरं तर माता रमाई आंबेडकर यांच्या पुतळयाच्या संदर्भातील विषय आहे. मी सभागृहाला आणि आयुक्त सो.यांच्या निदर्शनास काही गोष्टी आणु इच्छितो की, ज्यावेळेस इथं भीमसृष्टीची स्थापना करण्यासाठी आपल्या सर्वांची बैठक होऊन त्यांना आपण एक डेट दिली होती की, मागच्या आंबेडकर जयंतीच्या आतमध्ये आपण तो परिसरांचे सुशोभिकरण करुन आतमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जे काही शिल्प बसवायचे होते ते जयंती साजरी करण्याच्या आतमध्ये बसवुन देऊ. एकनाथराव आपल्याला काही गोष्टींचा राग आलेला असेल पण वस्तुस्थिती समजुन घेतली तर बरे होईल. जी,जी कामे अर्धवट आहेत ती कामं जर आपल्याला निदर्शनास आणुन देत असु तर आपल्याला एका मोठया मनाने तो स्विकारलं पाहिजे, ही कामं आपली अर्धवट आहेत ती आपल्या शहराची किंवा मंगलाताईच्या किंवा आमच्या घरची कामं नाहीत आणि शहरामध्ये जी काही अर्धवट कामं आहेत मॅग्झीन चौकात जे पुतळे आहेत जे पुर्वी कोणी तरी येऊन त्याचे स्टॅच्यु सुध्दा बसले होते, त्याचे फोटो पण बसले होते.

,

**मा.महापौर –** यासाठी सिमाताईंनी सांगितल होतं की,थोडी चौकशी करुन आणि माहिती घेऊन बोलत जावा. ज्याठिकाणी पुतळे बसविले होते ते फायबरचे होते.

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, मी काय म्हणतोय, मी काय त्यांच्यावर आरोप करीत नाही. आजच्या पेपरला जे फोटो आलेले आहेत,पुर्वीची जी कामे आहेत ती आपल्याला सांगतो आहे. जे पुतळे बसवायचे आहेत ते पुतळे अजुन बसवलेले नाहीत. आम्ही काही तुमच्यावर आरोप करीत नाही. या शहरामध्ये पुर्णाकृती पुतळे बसवायचे अर्धवट कामे आहेत जसं भीमसृष्टीचा विषय किती वर्ष मागे पडलेला आहे हा विषय किती वेळा ती लोक आपल्याकडं आलेली आहेत, माझ्याकडे आलेली आहेत,सत्तारुढ पक्षनेत्याकडे आलेली आहेत.गेल्यावर्षी आपण त्यांना शब्द दिलेला होता की, या आंबेडकर जयंतीच्या कार्यक्रमाच्या आगोदर सर्व सुविधा पूर्ण करुन देऊ असं सांगितल होत.आजही तिथे २० ते ३० टक्के काम झालेले आहे आणि अजुनही ७० टक्के काम बाकी आहे. त्यानंतर तुम्ही रमाबाई पुतळयाच्या संदर्भात चर्चा चालू आहे ही गेल्या अनेक वर्षापासून चालू आहे जिथे आंबेडकरांचा पुतळा आहे तिथे रमाबाईचा पुतळा बसविणेत यावा. याला विलंब लागु नये. समाजाच्या माध्यमातून जी मागणी आहे ती पुर्ण व्हावी. तसेच मंगलाताईंनी सांगितलं की, शाहु महाराजांच्या सृष्टीचे काम किती वर्षापासून पेंडींग आहे. अनेक वर्षापासून पेंडीग असलेल्या कामावर मार्ग काढला पाहिजे. काम कोण करणार,काम कोणाला द्यायचं यातून मार्ग काढला पाहि जे पण शाहू महाराजांच्या स्मारकाचं काम झालं पाहिजे.अशी सत्तारुढ पक्षनेत्यांना आमची मागणी आहे. आमच्या काळात काही कामं अर्धवट राहीलेली असतील ती आपल्या काळात पूर्ण व्हावी अशी आमची मागणी आहे. भीमसृष्टीचं काम ढीले चाललेलं आहे त्याठिकाणच्या कामाकडे आपण ६/६ महिने तोंड बघत नाही. जी अर्धवट कामे राहीलेली असतील ती चांगल्या पध्दतीने त्याला आणखी वेगळया पध्दतीने डेव्हलपमेंट करुन पूर्ण करण्यात यावी अशी ताईंची मागणी होती आणि ती मागणी पूर्ण करावी अशी विनंती करतो.

**मा.राहूल कलाटे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, खरं तर आज याठिकाणी जो विषय आलेला आहे माता रमाई आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यास मान्यता देणेत यावी.आणि त्याची कार्यवाही त्वरीत करणेत यावी. महापौरांना आम्ही धन्यवाद देतो की,आयुक्तांनी हा विषय लवकरात लवकर विषयपत्रिकेवर आणल्याबद्दल धन्यवाद देतो आणि या विषयाची अंमलबजावणी त्वरीत करणेत यावी.

,

आम्हां सर्व सदस्यांना आपण ही बाजु उपलब्ध करुन दिली की, आपण सर्वांच्या संमतीने हा पुतळा पुर्ण करण्यात यावा आणि इतरही काही सदस्यांच्या मागण्या असतील मंगलाताईच्या असतील,काकांच्या असतील खरं तर या विषयांवर पक्षनेत्यांनी बाजुला एक मिटींग घेऊन त्याच्यावर कार्यवाही करणेत यावी. तुम्ही त्यांच्या पाठीमागच्या भावना समजून घ्या. जसा हा विषय महत्वाचा आहे तसेच इतरही महत्वाचे विषय आहेत या विषयावर आपण जास्त चर्चा न करता मंजुर करणेत यावा अशी विनंती करतो.

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, महापौर साहेब या सभागृहामध्ये एक प्रोटोकॉल पाळला गेला पाहिजे की, विषयांतर होऊन अनेक विषयांवर चर्चा होते मागील एका विषयावर सुध्दा चर्चा झाली आणि या विषयावर सुध्दा विषयांतर होऊन चर्चा होते.सभागृहाचा नेता हा नेता असतो,एकदा सभागृह नेता बोलल्यानंतर माझी नम्रपुर्वक महापौरांना विनंती आहे की, त्यानंतर कोणालाही बोलता कामा नये सभागृह नेत्यांना विनंती आहे की, सर्व पक्षाच्या नेत्यांना बोलू द्या. बोलण्यापासून कोणाला वंचित करु नका पण एकदा सभागृह नेता बोलला की,कोणीही बोलणार नाही याची काळजी,दक्षता आपण घेतली पाहिजे. सर्व सदस्यांना आधी बोलू द्या त्यानंतर कोणीही बोलणार नाही याची दक्षता घ्यावी धन्यवाद.

**मा.विकास डोळस** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह माता रमाई आंबेडकर यांचा पुतळा भीमसृष्टीमध्ये उभारण्यात यावा असा विषय आहे. खरंच अभि मानाची गोष्ट आहे या सभागृहातून हा विषय मंजुर होत आहे. पण आता ब-याच सदस्यांनी सांगितलं की, आयुक्त कार्यालयात सन्मा.सदस्यांची पत्रं जातात पण त्या पत्राच उत्तर मिळालं पाहिजे पण ते मिळत नाही. यानिमीत्तानं माझा एक छोटाशा अनुभव या सभागृहाला सांगायचा आहे म्हणुन उठलो. मी संविधान जनजागृतीच काम युवा मंचच्या माध्यमातून शाळेमध्ये जाऊन संविधान जनजागृतीच काम करतो.नगरसेवक झाल्यानंतर संविधान युवा मंचच एक स्वप्न होतं की,एक संविधान भवन बांधण्यात यावं. संविधान युवा मंचच्या माध्यमातून आयुक्त सो. ना एक पत्र दिलं होत, नगरसेवक झाल्यानंतर कस काम करायचं,कस नाही हे माहित नसते, नवीन होतो. त्याच्यानंतर मी आपल्याला परत पत्र दिल त्याचाही रिप्लाय आलेला नाही. मुळात संविधान भवन ही संकल्पना भारतातील पहिलं संविधान भवन जिथं संविधान विषयी प्रशिक्षण दिलं जाईल, संविधानचा प्रचार कसा केला जाईल. ही जागा युपीएससी,एमपीसी परीक्षेच्या तयारीचं

,

केंद्र असेल, यासंबंधीच पत्र होतं परंतु आपल्या महापालिकेने याची काहीच दखल घेतलेली नाही.यासंदर्भात मी दादांना सांगितलं तर त्यांनी मला थेट मुख्यमंत्र्यांकडे नेलं आणि मुख्यमंत्र्यांनी त्याची दखल घेऊन आपल्या प्राधिकरणाचे अध्यक्ष मा.सदाशिव खाडे यांना सांगितलं. २६ नोव्हेंबर २०१८ ला आम्ही सर्व नगरसेवक,महापौर साहेब आणि आमदार साहेब, खाडे साहेबांकडे गेलो आणि खाडे साहेबांनी त्याच दिवशी डिक्लेअर केलं की,संविधान भवन प्राधिकरणामध्ये होईल आणि त्यासाठी ५ एकर जागा अलॉट केली. आज जर ते संविधान भवन पालिकेच्या माध्यमातून झालं असतं तर नगरसेवक म्हणुन मला पण अभिमान वाटला असता पण आमच्या पालिकेने आमच्या पत्राला केराची टोपली दाखवली हे पण सत्य आहे. मंगलाताईंनी सांगितल ते बरोबर आहे बरेचसे धोरणं आपण करतो पण प्रशासनाने त्याची अंमलबजावणी करण्याचे काम आहे. आज शाहू शिल्प समुहाच्या कामाला विलंब का होतो याचेही उत्तर प्रशासनाने दिले पाहिजे. भीमसृष्टीचं काम आज नगरसेवक झाल्यापासून बघतोय प्रत्येक मिटींगला सांगितले जाते की, ३ महिन्यांनी होईल, ४ महिन्यांनी होईल. आतापर्यंत भीमसृष्टीच काम झालेल नाही.आता आपण याठिकाणी ठराव करतो आहे त्याला ठरावीक वेळ द्या आणि त्या वेळेमध्ये काम करा अशी मी सभागृहाला विनंती करतो जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आजचा विषय माता रमाई आंबेडकर यांच्या पुर्णाकृतीच्या पुतळा बसविणे आणि त्याठिकाणी सुशोभिकरण करण्याचा आहे.यासंदर्भातील सभागृहाच्या पटलावर आलेला विषय आहे. विकासनी सांगितलं त्यामध्ये तथ्य आहे. मी २०१६ ला भीमसृष्टीची निवीदा प्रसिध्द झाली खरं तर १२ महिन्यामध्ये काम पुर्ण करुन द्यायला पाहिजे. मी चेअरमन असताना त्या कॉन्ट्रॅक्टर बरोबर जितक्या बैठका घेतल्या त्यामध्ये त्याला म्हणले की, तु पुतळे दाखव,काय करायचं ते दाखव,तो आज येतो,उद्या येतो ,परवा येतो,तेरवा येतो आणि ज्या ज्या वेळेस येतो त्या त्या वेळेस त्याचे सर्व काम अर्धवट असायचं, हो नाही,हो नाही म्हणता,म्हणता मी अगदी या मतावर आले होते की, त्याला ब्लॅक लिस्टला टाकावं या मताशी आले होते. परत विचार केला,ज्या विचाराने प्रेरीत होऊन या सभागृहात आहे मी, नाही तर माझी काय औकात होती या सभागृहात यायची. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सृष्टीला एखादा माणुस हो म्हणुन त्याला हेलपाटे मारायला लावल्याच्या नंतर ऑक्टोबर / नोव्हेंबरच्या दरम्यान हातापाया पडून त्याने कामाला सुरुवात केली. आताही विचारल

,

किती टक्के काम बाकी आहे ते सांगतात की, ३० टक्के काम बाकी आहे. टेंडरची मुदत १२ महिन्याची होती तिथे २४ महिने केली, आणि नंतर ६ महिने मुदतवाढ दिली. आपण त्याच्यावर दबाव का आणत नाही. वैयक्तीक स्तरावरती या पुतळयासाठी शासनाकडुन आग्रह केलेला होता. माजी महापौर नितीन काळजे हे सुध्दा माझ्या बरोबर साक्षीदार म्हणुन होते. या पुतळयासाठी आम्ही खुप आग्रह केलेला होता. आणि त्याला साडे तीन ते ४ वर्ष होत आहेत माता रमाईचा पुतळा त्याठिकाणी झाला पाहिजे, १०० टक्के झाला पाहिजे. त्यावेळेस आम्हांला डिझाईन दाखविलं होत की, बाबासाहेब आणि माता रमाई यांचा पुतळा एकाच लेव्हलला ठेवणार आणि त्यामध्ये भूमीगत लिफ्ट लावणार आणि बटन दाबलं की, लोक हळु हळु वर येतील आणि पुतळयाला हार अर्पण करतील आम्ही त्यालाही मान्यता दिली. त्यांना काय नाही सांगितलं त्या सगळया गोष्टीला मान्यता दिली. आणि पैसेही वाढवून दिले. मग कुठे माशी शिंकली. काम अजुन पूर्ण होत नाही. आतलं काम झालं नसल्यामुळे बाहेरचं काम करु शकत नाही आणि बाहेरचा काम करणारा म्हणतो की, आतील काम झालं नसल्यामुळे मी काम करु शकत नाही. रोज इकडून तिकडे आणि तिकडून इकडे असे चालले आहे. एकदा का आंबेडकरी हिसका दाखवला तर सगळे जागेवर येतील. आपल्याला विनंती आहे की, ही वेळ येऊ देऊ नका. फुले, शाहू, आंबेडकर, माता रमाई, अहिल्यादेवी होळकर असतील यांच्या बाबतीत असलेले विषय सेंन्सेटीव्हने घ्या. आयुक्तांना सदस्यांनी दिलेलं पत्र आहे त्या पत्राला दोन ओळीचे उत्तर द्या या,या दिवशी आपलं पत्र मिळालं आहे लवकरच कार्यवाही करुन याबाबतीत आपल्याला कळविले जाईल. अन्यथा संबंधित नगरसेवकाला बोलवून घ्या.जितकं काम आपण बोलून करु शकतो तितक आपण पाठीमागं ठेवून करु शकत नाही.आणि ज्येष्ठ नगरसेवकांचा सन्मान राखला पाहिजे. त्याच बरोबर या सभागृहात महापौरांचा सन्मान राखला पाहिजे. मंगलाताई मगाशी बोलल्या की, एखाद्या कामासाठी नगरसेवकाने पाठपुरावा केल्यानंतर किती वर्ष पाठीमागे लागायचे याला एक मर्यादा आहे. जशी मी निवडुन आले तशी मी पाठपुरावा करीत आहे. त्यामुळे चीड आणि संताप येतो.विकासनी मगाशी सांगितलं की, संविधान भवन करायचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे किंवा कुठलेही महापुरुष असतील हे कुठल्याही एका जातीय समाजाचे,व्यवस्थेचे होते असे अजिबात नाही. ते संपुर्ण देशाचे आहेत. आणि यांच्या माध्यमातून आपण त्यांना प्रायोरीटी देऊन काम करुन घ्यायला पाहिजे पण ते आपल्याकडुन होत नाही. म्हणुन आमची विनंती आहे की,त्याठिकाणी आंबेडकर सृष्टी ही भारतीय जनता पार्टीच्या काळात

,

मार्गी लागली पाहिजे. अत्यंत चांगल्या प्रकारचं काम त्याठिकाणी झालेलं आहे. त्याठिकाणी आंबेडकरी जनता जास्त येतच आहे आता आपण त्याठिकाणी गेलो तर त्याठिकाणी पाय ठेवायला जागा नसते त्या मैदानामध्ये आमची खुप दिवसाची मागणी आहे की, त्याठिकाणी आंबेडकर सृष्टीच्यासाठी म्हणुन जाहीर करावे. तिथे प्रदर्शन लावलं पाहिजे, आंबेडकरांचे विचार लावले पाहिजेत. कोण आंबेडकर आहेत, त्यांनी काय काम केलं आहे, कसं केलं आहे,किती हलाखीच्या परिस्थितीमधुन ते वर आहे याच्या संदर्भात आपण काही तरी सांगितलं पाहिजे. आपण आंबेडकर जयंती साजरी करतो, गायनाचा कार्यक्रम करतो, नाटक करतो सगळं करतो पण आपण बाराही महिने त्यांची ख्याती सांगितली पाहिजे. साहेब तुम्ही फॉरेनला जाता त्याठिकाणी गेल्यानंतर आपण त्यांचा इतिहास स्वतः लिहीतात त्यांची काय,काय वाक्ये आहेत ते लिहीतात. हे सगळं एकाच ठिकाणी करतात. शहराच्या नावलौकीकात भर पडेल असे एक काम करावे. साहेब तुम्ही खुप हुशार आहात, चांगले आहात कारण सदस्यांच्या पत्राला उत्तर देणं तुम्ही टाळता. वाईट वाटलं, कारण की, असं कधी झालं नाही साहेब, कमिशनर म्हणुन निश्चितपणे आम्हांलाही कुठल्याह कमिशनरच्या पत्रांना उत्तर द्या हा भाग वेगळा आहे. भारतीय जनता पार्टीचे आम्ही जनसेवक आहोत. आम्ही जनसेवक असलो तरी लोकांचे प्रतिनिधी असुन तर मला वाटते या शहरामध्ये , या देशामध्ये लोकशाही प्रत्येकाला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे आणि तो प्रश्न योग्य वेळी, योग्य व्यक्तीला पुराव्यानिशी विचारण्याचा अधिकार आहे. या कमीटीमध्ये जे सदस्य आहेत त्यांनी या आंबेडकर सृष्टीसाठी जी काही मदत केलेली आहे या सगळयाचं मी अभिनंदन करते, आभार मानते. महापौर साहेब तुमचं देखील आभार मानते, आणि शाहू महाराजांची २६ जुनला असलेल्या जयंतीला मंगलाताईच्या गाडीत जाऊन हार घालायचा, ताईच्याच गाडीत जायचं आणि त्यांनी जे सांगितलं की, फुले,शाहू, आंबेडकर यांचा सन्मान राखावा. आणि महापौर साहेब, आयुक्त साहेबांना विनंती करते की, सदस्यांनी जे कांही पत्र दिले असेल त्याला उत्तर द्या. भले काही असो. महापौर साहेब, मगाशी विलास मडिगेरी यांनी विषय काढला की, प्रोटोकॉल पाळला गेला पाहिजे. आमची पण मनापासून इच्छा असते की, प्रोटोकॉल पाळला गेला पाहिजे. आणि या प्रोटोकॉलच्या संदर्भात आपण सत्तारुढ पक्षनेत्यांना सांगा की, बाकीच्यांना बोलू द्या, नंतर तुम्ही बोला. कारण त्यांनी बोलल्यानंतर मग एकदा का आपण ठरवलं कोणाला बोलू दिलं नाही तर परत लोकशाहीची पायमल्ली होते. आणि मग आपण एकीकडे प्रोटोकॉल लावायचा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच नांव घ्यायचं आणि

,

लोकांची गळचेपी करायची. ते सुध्दा योग्य होणार नाही. जे काही निर्णय होतील ते सभागृहाला विश्वासात घेऊन करावे एवढंच मी सांगते आणि परत एकदा अभिनंदन करते. आणि शाहू महाराजांच्या सृष्टीच्या संदर्भात परत एकदा कमीटी बसवा आणि काय ते ठरवून निर्णय घ्या. पण त्याच खापर मात्र सत्ताधारी म्हणुन आमच्यावर फोडता कामा नये. आणि त्यांच्या पापात आम्हांला अजिबात सहभागी व्हायचं नाही. कुठल्याही थोर पुरुषाचा अवमान होता कामा नये. येथून पुढे लक्षात ठेवायचं आणि कमिशनर साहेब त्या विषयांवर तातडीने बैठक घेऊन् त्या विषयांवर निर्णय घ्यावा. आणि त्याठिकाणी जो निर्णय होईल त्यामध्ये आपले तुषार हिंगे असतील, आपल्या मातोश्री आहेत या सगळयांना त्याठिकाणी बोलवा आणि आपल्याला जे काही चांगल करता येईल ते करावे आणि नगरसेवकांना दोन ओळीचं पत्र निश्चितपणे आपल्याकडून गेलं पाहिजे. धन्यवाद.

**मा.वाघुंडे ( कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, राजर्षी छत्रपती महाराज पुतळा सृष्टीच्या कामाची वर्कऑर्डर मार्च २०१७ मध्ये दिलेली आहे. १ कोटी ८५ लाखाचे काम होतं. याचं ड्रॉईंग लवकरात लवकर फायनल करुन कामाला सुरुवात करण्यात येईल.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब,टेंडरची मुदत संपली आहे का

**मा.वाघुंडे ( कार्यकारी अभियंता)** - मा.महापौर साहेब, मुदत संपलेली आहे पण मुदतवाढ देता येईल.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, मार्च २०१७ रोजी वर्कऑर्डर दिलेली होती त्याची मुदत संपलेली आहे.त्यास मुदतवाढ दिली का.

**मा.वाघुंडे ( कार्यकारी अभियंता)**- मा.महापौर साहेब, मुदतवाढ दिलेली नाही असंच पेंडीग आहे.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, बघा कमिशनर साहेब, १ कोटी ८५ लाख म्हणजे काही कमी झाले का? मला स्पीकर दिला नाही तरी परमेश्वराच्या कृपेने माझा आवाज चांगला आहे.

**मा.महापौर –** स्पीकर चालू करा. ताई परवानगीने बोलले पाहिजे.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, हां ते सांगा नां, महापौर जोपर्यंत सांगत नाहीत तोपर्यंत स्पीकर चालू करणार नाहीत. हीच का लोकशाही. आयुक्त साहेब ज्यावेळेस तुम्ही जॉईन झालात त्यावेळेस आम्ही तुम्हांला सांगितल की, आमची जी प्रोजेक्ट तयार आहेत

,

तेवढी तुम्ही मार्गी लावा. शाहू सृष्टीच्या प्रोजेक्टला १२ महिन्याची मुदत असताना आजपर्यंत काय केलं म्हणजे तुम्ही त्याकडे पुन्हा ढुंकुनही बघत नाही. आणि आमचे पक्षनेते आहेत ते नगरसेवकाची बाजु ऐकुण घेतात पण ते तुमच्याच नगरसेवकांची बाजु ऐकुण घेतात. नगरसेवकांनी दिलेल्या पत्राला उत्तर दिलं पाहिजे. त्यांना वाटत असेल की, नाही दिलं तरी चालेल त्यांना नका देऊ. आमची इच्छा आहे म्हणुन आम्ही सभागृहात सांगितल ना की, आम्हांला उत्तर दिलं पाहिजे. याच्यावर तुम्ही मिटींग लावली पाहिजे. हे काही आमच्या घरचं काम आहे का? आता डिझाईन फायनल करणार, टेंडर कुठल्या बेसवर काढलं, आयुक्त सो. तुम्ही आता डिझाईन बघुन सांगितलं की, पुतळयाच लोकेशन थोडसं वेगळया पध्दतीने करावे लागेल हे तुम्ही माझ्याशी बोलले आहेत की नाही. मी नाही म्हणले का, तुम्हांला जे योग्य वाटते ते करा जे छान दिसेल, शहराच्या दृष्टीने चांगले दिसेल ते करा. हे पण मी तुमच्याशी बोलले की नाही. आणि अजुनही त्याच डिझाईनच फायनल व्हायचय मग काय करायचं जे प्रलंबीत विषय आहेत त्या विषयावर तुम्ही मिटींग लावली पाहिजे. आता तर तुमची बजेटची मिटींग आहे. मग बजेट कसे मांडणार आहात तुम्ही दरवर्षीचे बजेट कशावर जात आहे. कमिशनर साहेब हे योग्य नाही, तुम्हीच यावर काय करणार ते सांगा. महापौर साहेब मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, भक्ती शक्ती, आणि अहिल्यादेवींना या सर्वांना जाऊन हार घालते. आणि हे सगळीकडे सर्वांनीच गेले पाहिजे. ही आपली प्रेरणास्थाने आहेत आपण त्यांच्याकडन रोज काही तरी प्रेरणा घेऊन शिकत असतो. जाता, येता उगाच उभं केल नाही त्यांना रस्त्यांवर , काही तरी चांगलं केल पाहिजे,लोकांनी काही तरी शिकलं पाहिजे, लोकांना चांगल समजल पाहिजे. कमिशनर साहेब २०१७ टेंडर आहे आणि ते अजुन बघीतलंच नाही. त्याचं डिझाईन काय आहे ते माहित नाही. हे सभागृहाला तरी पटतंय का, आणि मग महापौर सो. तुम्ही माझ्या गाडीत कुठल्या हक्कांनी येणार सांगा बरं

**मा.महापौर –** माझ्या ताईची गाडी म्हणुन येणार .

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, ताईची गाडी म्हणताय पण हक्क तरी पाहिजे ना.

**मा.महापौर -** आपण काय करु भीमसृष्टी, रमाई माता आंबेडकर, भोसरीची कमान, ज्ञानेश्वर महाराज, नामदेव महाराज भेट आणि भक्ती-शक्ती जे,जे काही प्रलंबीत पुतळयाचे विषय आहेत या संदर्भात आपण संघटनेचे सर्व ज्येष्ठ नगरसेवक, नगरसेवीका आणि

,

आयुक्त, अति.आयुक्त आणि सर्व संबंधित अधिकारी या सर्वांच्या बरोबर एक बैठक लावू आणि त्यावर निर्णय घेऊ.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आपलं अभिनंदन असेच महापौर पाहिजेत. जे,जे विषय पेंडींग पडलेले आहेत त्याची मिटींग लावा. ही आमची तुमच्याकडुन अपेक्षा आहे. तुम्ही आर्कीटेक्ट फॉरेनचा आणा नाही तर दिल्लीचा आणा पण काम करा.

**मा.महापौर –** बैठक घेऊन विषय मार्गी लावू.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.प्रियांका बारसे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ९

दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.झोनिपु/८/कावि/१३९/२०१९, दि.१२/०२/२०१९
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.५१ दि.२७/२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम १९७१ (सुधारणा, पुर्नवसन व पुर्नविकास इ.) नुसार संरक्षणपात्र झोपडीधारक यांना JNNURM/BSUP अंतर्गत सदनिका वाटप करणेत येतात त्याचप्रमाणे चिखली प्राधिकरण से.नं.१७ व १९ मध्ये EWS धारकांसाठी पात्रता व अटी शर्तीनुसार म्हाडा आरक्षण प्रमाणे सदर सदनिका वाटप करणेत येतात. तथापि अनाथ असणारे पती/पत्नी हे समाजाचे घटक असताना त्यांना BSUP अंतर्गत सदनिका देणेसंबंधी कोणतेही धोरण निश्चीत नाही. मनपा BSUP विभाग मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाने महिला व बाल विकास विभाग शासन

,

निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक-२/४/२०१८ अन्वये अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातुन १% समांतर आरक्षण लागु करणेस मान्यता दिली आहे. यास्तव पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत अनाथ असणारे पती/पत्नी यांचेकरीता महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक २/४/२०१८ नुसारचे धर्तीवर अनाथ पती/पत्नी यांना BSUP अंतर्गत मनपामार्फत सदनिका वाटप संबंधीचे खालील अटी शर्तीनुसारचे धोरण मा.महापालिका सभा मान्यतेनुसार निश्चीत करणे आवश्यक आहे.

१) महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक-०२/०४/२०१८ नुसार व वेळोवेळी शासनाचे यासंबंधी निर्गमीत होणारे शासन निर्णयानुसार BSUP अंतर्गत उपलब्ध असणारे सदनिकामध्ये अनाथ पती/पत्नी यांना खुल्या प्रवर्गातुन १% रक्कम समांतर आरक्षण ठेवणेत येईल.

२) महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.संदर्भ २०१३/प्र.क्र.१०९/य३ दि. /६/२०१३ नुसार अनाथ असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

३) अनाथ असणा-या पती किंवा पत्नी यांचे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत कमीत कमी तीन वर्ष वास्तव्य असणे आवश्यक आहे. भाडयाने राहत असलेस नोंदणीकृत भाडेकरार(लिव्ह ऍन्ड लायसन्स) आवश्यक आहे.

४) शासनाचे व पिंपरी चिंचवड मनपा योजनाअंतर्गत सदनिका मिळालेली नसावी.(हरकत घेतलेली नसावी) तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत घर/जागा/सदनिका नसावी. याबाबत प्रतिज्ञापत्र आवश्यक असेल.

५) मनपाचे सदनिका उपलब्ध नसलेस अनाथ पती/पत्नी यांना सदनिका उपलब्ध करुन देणेसंबंधी मनपावर कोणतेही बंधन असणार नाही.

६) मनपा निश्चीत करतील त्या सदनिका किमतीच्या प्रमाणात(GST लागु असल्यास त्यासह) नियमानुसारची स्वहिस्सा रक्कम खुला प्रवर्गनुसार भरणे आवश्यक राहील.

७) अनाथ पती/पत्नी यांचे मतदार यादीत नाव असणे आवश्यक असेल तसेच रेशन कार्ड,पॅनकॉर्ड, आधार कार्ड आवश्यक असेल.

८) रहिवासी दाखला आवश्यक असेल.

,

९)     मा.आयुक्त वेळोवेळी निश्चीत करतील त्या अटी/शर्ती बंधनकारक असतील तसेच सदर धोरणानुसार पात्र करणे सदनिका वाटप करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील आणि कोणतीही अटी/शर्ती,शासन निर्णय तरतुदींचा भंग केलेस दिलेली सदनिका कोणतेही कारण न देता रद्द करणे,स्वहिस्सा रक्कम जप्त करुन मनपा कोषागारात जमा करुन घेणेत येईल व त्यासंबंधीचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना असतील.

मनपा हददीतील श्री.सुजीत कुमार नाईक हे पती/पत्नी अनाथ असुन त्यांनीही BSUP अंतर्गत विशेष बाब म्हणुन सदनिका मिळणेस शासनास विनंती अर्ज केला होता. शासन नगर विकास विभाग यानी पत्र क्र.पीसीसी - ३०१८/प्र.क्र.२७८/नवि-२२, दिनांक १२/११/२०१८ नुसार मनपा सभा मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करावी असे कळविले आहे. त्याप्रमाणे वरील प्रमाणे धोरण निश्चीत झालेनंतर श्री.सुजीत कुमार नाईक यांना BSUP अंतर्गत नियमानुसार सदनिका देणेत येईल. तरी वरील प्रमाणेचे अनाथ पती/पत्नी यांना BSUP अंतर्गत सदनिका देणेकामीचे धोरण निश्चीती करणेस मान्यता देणेत यावी.

**मा अनुराधा.गोफणे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, मा.कमिशनर साहेब, याठिकाणी अनाथांसाठी १ टक्का आरक्षण मा.देवेंद्रजी फडणवीस सरकारने जाहीर केलं, ते जाहीर करत असताना ख-या अर्थानं ते जाहीर करण्यासाठी ज्यांनी अभ्यासपूर्ण अभ्यास करुन अनाथांचे दु:ख समजुन घेतले आणि त्यानुसार मा.मुख्यमंत्र्यांना विनंती केली की, यांच्या पाठीमागं कोणच उभं रहात नाही हे समजुन सांगणारे मुख्यमंत्र्यांचे खातेप्रमुख मा.श्रीकांतजी भारतीय यांनी या विषयाला सुरुवात केलेली आहे. त्यामुळे त्यांचे आणि मा.मुख्यमंत्र्यांचेही याठिकाणी अभिनंदन करते. गेल्या अनेक वर्षापासून जसा देश अस्तित्वात आला आणि देशाला स्वातंत्र्य मिळालं त्यामध्ये महानगरपालिका असेल किंवा इतर स्वायत्त संस्था असतील त्यावेळेस पासून कोणीही आजपर्यंत त्यांच्यासाठी आरक्षण द्यावं अस कधीच लक्षात आल नाही.श्रीकांतजी भारतीय यांनी हा विषय मा.मुख्यमंत्र्याच्या निदर्शनास आणुन दिलं आणि मा.मुख्यमंत्री सुध्दा तितकेच संवेदनशिल आहेत आणि त्यांनी १ टक्का आरक्षण जाहीर करण्यास वेळ सुध्दा लावला नाही. हे जाहीर केल त्यामुळे मा.मुख्यमंत्री आणि मा.श्रीकांतजी भारतीय यांचे मनापासून अभिनंदन करते पण यामध्ये एक अट आहे ८ नं.ची रहीवाशी दाखल्याची आवश्यकता

,

आहे. या दाखल्या विषयी आपल्याला विचार करावा लागेल.कारण अनाथांना कुठला रहिवास असतो कोणी पण आणतो आणि एखादया आश्रमाच्या बाहेर सोडून जातो. बापाचं नांव माहित नाही, आईचं नांव माहित नाही आश्रम हेच आईचे नांव, आश्रम हाच बाप आणि तेच बापाचे नांव अनाथांना कुठल गांव असत, अनाथांना याठिकाणच्या आश्रमात येऊन १८ वर्ष झाल्यानंतर त्याला कुठलेही काही रहात नाही. रहीवाशी दाखला किती वर्षानंतर मिळतो. रहिवाशी दाखला हा कमीत कमी याठिकाणी १० वर्ष राहिला पाहिजे अशी अट आहे. त्याठिकाणी १८ वर्ष झाल्यानंतर अनाथ आश्रम सोडावं लागत आणि मग तेथून पुढं जिथं कुठ काम मिळेल, जिथं रहायची व्यवस्था होईल. जे काही होईल तिथ राहून, त्यांच्यासारखा जोडीदार मिळाला तर बघु. मा.महापौर,मा.पक्षनेते यांना विनंती करते की, कमिशनर साहेबांना अटी शर्ती कमी करण्याचे अधिकार देणेत यावेत. आणि जर कमिशनर साहेबांनी विचार केला नाही तर निश्चितपणे सभागृहाने विचार केला पाहिजे. कारण या लोकांना रहिवाशी दाखल्याची अट लागू करु नये. रेशनकार्ड असेल तर मतदार यादीत नांव येते आणि मतदार यादीत नांव नसेल तर रेशनकार्ड मिळत नाही. आणि मतदार यादीत नांव असेल तर रेशनकार्ड मिळते. आणि दोन्ही नाही म्हणुन मतदार यादीत नाव येत नाही. मला वाटतं यांच्या संदर्भात तुम्ही त्या लोकांना बोलवून घ्या. तुम्ही जर त्या लोकांच म्हणणं ऐकुण घेतलं तर झोप लागत नाही. अनेक तरुण मुलं आहेत त्यांनी एमपीसी केलेली आहेत. सिलेक्शन झालेलं आहे पण अशा प्रकारच्या कागदपत्रांमुळे ते सिलेक्ट होऊ शकत नाहीत,नोकरीवर ते हजर होऊ शकत नाहीत,आणि म्हणुन या विषयांमध्ये आपण अत्यंत संवेदनशिलपणे आपण जे काही पावले उचलली आहेत त्यावर पुर्नविचार करावा. तुमचे अधिकार तुम्ही अबाधित ठेवा. आपणच या मुलांचे आई-बाप व्हावे आणि पुन्हा एकदा मा.मुख्यमंत्री, मा.श्रीकांत भारतीय यांचे अभिनंदन करते.

मा.महापौर साहेब, ठरावास मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- सदर विषया मधील अटी शर्तीमध्ये आवश्यक व योग्य बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त साहेब यांना देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.प्रियांका** बारसे **–** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, सेक्टर १९ मध्ये जी घरे बांधलेली आहेत मला या संदर्भात अशी माहिती पाहिजे की, जी घरे बांधलेली

,

आहेत त्याच वाटप किती आहे, शिल्लक किती आहे आणि याबाबतीत पुढे काय निर्णय घेणार आहात कारण ब-याच बिल्डींगच स्ट्रक्चर पुर्ण झालेलं आहे आणि काही बिल्डींग तशाच थाबलेल्या आहेत. अनाथांना आपण घरं देणार आहात आणि घरं देणार असाल तर नक्की कुठली देणार आहात. ज्या बिल्डींग अजुन अर्धवट आहेत त्यासाठी आलेला निधी सुध्दा परत गेलेला आहे. १३७०० घरांचा जो प्रकल्प होता त्यामधील फार तर ३ ते ४ हजार घरे बांधुन तयार आहेत बाकीच्या घरांच काय, ती घरे पूर्ण होणार आहेत का, त्या लोकांचे पैसे घेतलेले आहेत त्याबाबतीत काय निर्णय घेणार आहात, कोणाचे ५० हजार,कोणाचे १ लाख रु.आपण घेतलेले आहेत. ती लोक प्रत्येकवेळेस तुम्हाला विचारायला येत असतात. त्याबाबतीत आपण काय निर्णय घेणार आहात. जी घरे बनवली आहेत त्यासंदर्भात काय निर्णय घेणार आहात. हा विषय महत्वाचा आहे. त्याठिकाणी अर्धवट स्ट्रक्चर होऊन तसेच पडलेले आहे काही बिल्डींगचे दोन स्लॅब झालेले आहेत,काहींचे तीन झालेले आहेत, काहीचे पाच स्लॅब झालेले आहेत. त्याठिकाणी १ वर्षामध्ये जी गुन्हेगारी निर्माण झालेली आहे त्यामुळे बांधकाम थांबलेले आहे का. त्याच्यावरचा निर्णय थांबलेला आहे का. त्याच्यावर प्रशासनाची काय प्रतिक्रीया आहे त्यावर आयुक्तांनी निर्णय द्यावा.

**मा.संदीप वाघेरे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, घरकुल योजना, एसआरए योजना आहेत या माध्यमातून आपल्याला पिंपरी चिंचवड शहर झोपडपट्टीमुक्त शहर करायचं आहे. किंवा जे अनाथ लोक आहेत त्यांनाही घरं दिली पाहिजे. चिखली मध्ये घरकुल योजना राबविली आहे त्यामध्ये १३५०० लोकांना घरे देणार होतो तो प्रोजेक्ट अर्धवट पडलेला आहे. यामध्ये ७ हजार घरे बांधलेली आहेत अजुन ६५०० घरे बांधावयाची आहेत. ती जागा प्राधिकरणाने आपल्याला दिली आणि महापालिकेने तिथे बिल्डींग बांधलेल्या आहेत परंतु त्या जागेवर आज सुध्दा स्टे आहे. महापालिकेचे जे लिगल डिपार्टमेंट आहे त्यांनी आजपर्यंत काय केलेले आहे बाकीच्या इमारतीची परमिशन घेतलेली आहे का, बाकीची घरे बांधुन कधी कम्पलीट होणार आहेत उर्वरित ७ हजार लोकांना कधी पर्यंत न्याय देणार आहात.मिलींदनगर, पिंपरीमध्ये २ बिल्डींग बांधुन रेडी आहेत २२४ फ्लॅट बांधुन पडून आहेत. आयुक्त साहेब यासंबंधी आपल्याकडे वारंवार मिटींग झाल्या आहेत परंतु आजपर्यंत त्याच्यावर कारवाई झालेली नाही. तसेच भाटनगर येथील गार्डनच्या जागी एक प्रोजेक्ट उभा केला तिथेही स्टे आहे. त्या प्रोजेक्टचं मॉडीफिकेशन केलं म्हणजे बौध्दनगर असेल, आंबेडकरनगर असेल जे झोपडपट्टीबाधीत

,

लोक आहेत त्यांना फ्लॅट मिळाले असते. वेताळनगरलाही बिल्डींग बांधुन तयार आहेत पण त्याठिकाणच्या लोकांना आपण अजुन ताबा दिलेला नाही. काही लोकांनी त्यांचा स्वहिस्सा भरलेला आहे. त्या माणसांवर आपण अजुन किती वर्ष अन्याय करणार आहात हे कुठं तरी सिस्टीम सुधारली पाहिजे. आयुक्त सो. महापालिकेकडे पैसे आहेत म्हणुन कुठेही घालवायचे आणि कसेही घालवायचे त्या माणसाला त्याच्या शेवटच्या घटकापर्यंत त्याचा उपयोग झाला पाहिजे. आज आपण पीएमओ च्या अंतर्गत ९५०० घरे बांधत आहोत. आपण ४० हजार लोकांचे अर्ज घेतलेले आहेत त्या माणसाचे भारतात कुठेही घर असता कामा नये. समजा त्याच्या नावाने घर नसेल पण आई-वडीलांच्या नावाने घर असेल तर वारसा हक्काने  हिंदु कुटूंबाचा कायदा असा आहे की, आई-वडीलांच्या नावाने असलेली जागा मुलांच्या नावाने दिली असेल तर मग त्या लोकांना आपण घरं देणार आहात की नाही. याचा कुठं तरी विचार झाला  पाहिजे. आणि ज्या बिल्डींग बांधुन अर्धवट अवस्थेत आहेत  आणि नवीन एसआरए चे नवीन प्रोजेक्ट करणार आहेत आणि टीडीएसच्या बदल्यात खाजगी विकसक जे काम करणार आहेत आणि आपण हे धोरण जर सुटसुटीत केलं तर   येणा-या ५ वर्षामध्ये या शहरामध्ये एकही झोपडपट्टी राहणार नाही. पिंपरी चिंचवड झोपडपट्टीमुक्त शहर जर करणार असाल तर थोडयाशा सुधारणा केल्या आणि जे विकसक येणार आहेत त्यांचे विचार जुळवून घेतले तर दापोडी सारखी मोठी झोपडपट्टी आहे त्याठिकाणी ६ हजार लोक आहेत त्यांची पण इच्छा आहे की, आमचं पण रहाणीमान सुधरावं,आमची पण मुलं  चांगल्या शाळेत गेली पाहिजेत, आज आपण ३५० स्के.फुटाचा घर देत आहोत त्याच्यामध्ये वाढ करुन वन बीएचके फ्लॅट दिले आणि टीडीआरचे धोरण सुधारले,आपण आपले धोरण सुधारले तर या लोकांना  लाभ देता येईल त्या अनुषंगाने आयुक्त साहेब आपण विचार करावा.  आणि जे अनाथ लोकांना १ टक्का आरक्षण आहे ते ही त्यांना द्या.  आणि त्यामध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, इलेक्शन कार्ड या ज्या अटी ठेवलेल्या आहेत त्या शिथील करता आल्या तर बघा एवढं बोलून थांबतो जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.उषा मुंढे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, आता जो विषय चालू आहे मी घरकुला संदर्भातच बोलणार आहे. ज्यावेळेस २०१२ ला घरकुल योजना होती आणि सोडत झाली त्यावेळेस मागासवर्गीयासाठी एसटी साठी ११० घरकुलाच नियोजन होतं त्यामध्ये ज्या लोकांनी अर्ज केले त्या अर्जामध्ये काही कारण नसताना त्यावेळेस

,

१०/१२ लोकांचे अर्ज बाद करुन इतर बोगस लोकांना घरकुल देण्यात आली आहेत. आयुक्त सो. या संदर्भात मी आपल्याला पत्र दिले होते त्यावर आपला रिप्लाय दिला,कमिटी नेमली परंतु जे काही २०१२ मध्ये घरकुला संदर्भात झालं ते पूर्णपणे चुकीचं झालेलं आहे हे आयुक्त सो. तुम्हांला माहित आहे. पण त्यानंतर आता ज्या लोकांना घरकुल दिली, ज्या नावांने घरकुलं दिली त्या नावाची लोक तिथं रहातात का किंवा भाडयाने दिलेली आहेत यासंदर्भात प्रशासनाने कुठलीही चौकशी केलेली नाही. आता जर तिथे पाहिले तर एकाच नावाने तीन, तीन घरकुलं आहेत आणि हे एकाच्या नावाने तीन घरकुलं देत असताना जे मागासवर्गीयांसाठी कोटा ठेवण्यात आला होता त्यामध्ये एसटी साठीच्या लोकांवर अन्याय करण्यात आला. आयुक्त सो. आपण सांगि तलं होतं की, यासंदर्भात आपण एक मिटींग घेऊन निर्णय घेऊ.पण असा चुकीचा कारभार महापालिकेकडून होत असेल तर हे चुकीचं आहे आणि आता ज्या तुम्ही अटी टाकत आहात. तशाच अटी २०१२ च्या घरकुल योजनेमध्ये टाकलेल्या होत्या मग त्या अटीचं पालन का पालन केलं गेल नाही. त्यावेळेस मागासवर्गीय लोकांवर अन्याय का केला ती घरकुलं त्या लोकांना का दिली गेली नाही. आता आपण ज्या अटी टाकलेल्या आहेत त्या अटींसाठी आपण पात्र आहोत का याचीही चौकशी करावी. घरकुलासंबंधी चौकशी केली असता ज्या घरकुलांमध्ये लोक राहतात ती ज्याच्या नावावर घरकुल आहे ती न रहाता तिसरीच व्यक्ती रहाते. ज्या लोकांनी ५० हजार रु.भरलेली आहेत त्या लोकांना ४/४ वर्ष वेटींगवर ठेवता आणि जे वेटींगला नाहीत त्यांचे डायरेक्ट लक्की ड्रॉ ला नांव येत. आणि मग इथं आपलं काही तरी कुठं चुकतय का हे बघुन घ्यावे. घरकुलांच्या संदर्भात मी जे पत्र दिलेलं होतं त्याची माहिती देणेत यावी.

**मा.राहूल कलाटे –** मा.महापौर, मा.आयुक्त,सन्मा.सभागृह हा विषय अतिशय चांगला आहे जेणेकरुन आपण अनाथांना कुठे तरी न्याय देण्याचं काम आपली महापालिका करील. परंतु आता सीमाताईंनी सांगितलं की, रहीवाशी दाखला आवश्यक आहे असे आपण ८ नंबर अटी मध्ये असे म्हणतो आणि ३ नंबर अटीमध्ये असे म्हणतो की, अनाथ असणा-या पती-पत्नीचे ३ वर्ष वास्तव्य असणे आवश्यक आहे. भाडयाने रहात असेल तर लिव्ह ॲण्ड लायसेंन्स असणे आवश्यक आहे. हे अतिशय चांगलं काम करीत असताना जेणेकरुन या अटी / शर्ती या चांगल्या कराव्यात. आताच मुंढेताईंनी सांगितले की, घरकुल योजनेमध्ये आपण अटी/शर्ती केल्या होत्या त्याच काय झालं. असं काही तरी चुकीचं

,

करुन त्या चांगल्या माणसाला घरापासून वंचित रहाता आलं नाही पाहिजे. आपण याठिकाणी म्हणता पती-पत्नी पण तो अविवाहीत असेल तर त्याच काय ? म्हणजे तो अविवाहीत असेल तर त्याला घर मिळणार नाही किंवा फक्त घर घेण्यापुरत फक्त पती-पत्नी आणि नंतर नाही असा चुकीचा फायदा घेतला नाही पाहिजे. मा.महापौर साहेब, आपण प्रशासनाला सूचना देण्यात याव्यात की, या अटी/शर्ती मंजुर करीत असताना परत त्यासाठी बसुन त्यामध्ये काही कमतरता असेल तर पूर्ण करणे, नसेल तर त्यावर पुढे सविस्तर अभ्यास करुन जेणेकरुन त्या लोकांना लाभ मिळावा. पुरावा पाहिजेच पण ज्या संस्था आहेत त्या या शहराच्या आहेत की बाहेरच्या आहेत हे पहा. मॅरेज सर्टीफिकेट पाहिजे असेल तर ते किती कालावधीच पाहिजे. आणि अविवाहीत असेल तर त्याच काय अशा ब-याचशा गोष्टी आहेत की, त्या अंतर्भूत करणे आवश्यक आहेत त्या आपण अंतर्भूत कराव्यात या लोकांना आपण आधार देत आहोत. शासनाच्या नियमानुसार आपण लगेच मान्यता देत आहोत. मान्यता देत असताना या गोष्टीचा अंतर्भूत करावा अशी मी विनंती करतो.

**मा.एकनाथ पवार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरं तर या महापालिकेतील सर्व सन्मा.सदस्यांना अभिमान वाटावा अशा पध्दतीचं अनाथांच्या बाबतीत धोरण आहे. आपल्या सगळयांना कल्पना आहे की, मागच्या काही दिवसापूर्वी अपंगाच्या बद्दलचे धोरण आणि अपंगांना एक चांगल्या प्रकारची २००० रु. ची पेन्शन देण्याचं काम या सभागृहानं केल.खरं तर विकासाची काम होतच राहतात एखादा रस्ता, बिल्डींग झाली, दवाखाना झाला परंतु ख-या अर्थानं ज्या पध्दतीने छत्रपती शाहू महाराजांच, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव घेतो आणि त्यांना अभिप्रेत असलेले काम काय आहे रंजल्या गांजल्याच्या मागं उभं राहीलो. फक्त नांव घेऊन खरं तर या राज्यामध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता आली. तर आम्ही भाषण करुन, एखादी गोष्ट करीत नाही. सिमाताई या बोलता,बोलता बोलल्या कारण मी मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाला होतो. आणि जेंव्हा अनाथांना १ टक्का आरक्षण मिळालं पाहिजे.हे खरं तर मा.मुख्यमंत्र्यांनी केलं. ख-या अर्थांनी शाहू महाराजांनी, बाबासाहेबांनी जो पायंडा घालून विचार दिला. त्या विचाराला मा.मुख्यमंत्री साहेबांनी या पध्दतीचं म्हणजे वर्षानुवर्ष ५०/६० वर्षापासून काम करतोय,कैंद्रात काम करतोय अनाथांच्या संदर्भात कोणी विचार केला असेल तर तो मा. देवेंद्रजी फडणवीसांनी केला आहे. श्रीकांत भारतीय अनाथांच्या

,

बाजुने उभे राहीले. त्यांना कोणी तरी वाली पाहिजे, त्यांना सांभाळलं पाहिजे. कारण या संदर्भात काम करणारी माणसही तीच आहेत खरं तर या महापालिकेच्या माध्यमातून अभिमानानं सांगावस वाटतंय सुजितकुमार नायक नावाचा ग्रहस्थ जेंव्हा महापालिकेमध्ये सत्ता बदल झाला चेअरमन असतील, सिमाताई असेल, नितीन अप्पा असतील त्या काळामध्ये तो बिचारा दारोदार यायचा आणि तो विनंती करायचा. कारण आज ज्यावेळेस मी सभागृहामध्ये यायला निघालो त्यावेळेस त्याच्या चेह-यावरच हासु बघीतलं तेंव्हा त्यालाही वाटलं की, आमच्याही पाठीमागं भारतीय जनता पार्टीचे लोक आहेत. अनाथांच्या बाबतीत अनेक अडचणी आहेत. तुम्ही सांगितलं आहे की, रहीवाशी दाखला, कधी,कधी रहीवाशी दाखला आपण एखादया अनाथ आश्रमामध्ये तो रहातो की नाही हे एवढं जरी बघीतलं तरी पुरेसे आहे. काल जेंव्हा मी मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाला होतो तिथली परिस्थिती बघीतली आणि अनाथांच दु:ख जर जाणुन घेतलं असत तर, त्यांच्या संवेदना जाणुन घेण्याचा प्रयत्न केला तर सगळयांना वाटल की, खरंच अनाथांच्या पाठीमागे आपण तेवढया ताकदीने उभा राहण्याची गरज आहे. या विषयाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले पाहिजे.आणि या पुढच्या काळामध्ये अनाथांच्या संदर्भात कित्येक वेळा अशी परिस्थिती असते की, एक अनाथ मुलगी होती आणि ती एमपीसीची परीक्षा पास झालेली होती आणि तिला कुठल्या आरक्षणामध्ये बसवायचं अशा पध्दतीने त्यावेळेस मा.मुख्यमंत्री असतील,श्रीकांतजी यांनी मा.मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणुन दिल आणि त्या मुलीच्या माध्यमातून अनाथाच्या बाबतीत वाचा फुटायला लागली आणि त्यांना १ टक्क्याच आरक्षण दिलं गेलं. घराच्या संदर्भात आरक्षण मिळालं पाहिजे, आणि आपण या महापालिकेमध्ये आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की, एखादं आरक्षण आपण टाकतो आणि त्या आरक्षणाच्या माध्यमातून सगळेजण विचार करतात की, आरक्षणाच्या माणसालाच त्याचा फायदा झाला पाहिजे. दुर्देवाने मागच्या वेळेस आमची उषाताई पोटतिडकीने सांगत होती की, भटक्या विमुक्तांच्या जागेवर आरक्षीत नसलेल्या लोकांना घरकुल दिलं गेल. आयुक्त साहेब आपल्याला यानिमीत्ताने विनंती करतो की, एखादी गोष्ट चुकीची झाली जी घरकुल आरक्षीत आहेत जे रंजले-गांजलेले आहेत जिथं छत्रपती शाहू महाराजांचा, बाबासाहेबांचा वारसा चालवणारे याच्यामध्ये आरक्षीत लोकांच्या जागेवर ज्यांना घरकुल दिलेली आहेत ती कोणाच्या सांगण्यावरुन केल आहे याची चौकशी झाली पाहिजे आणि त्या चौकशीमधुन

,

जे सत्य येईल म्हणजे नोकरीच्या माध्यमातून सत्य बाहेर आलं की नाही हे माहित नाही. परंतु घरकुलच्या संदर्भात माझ्या आगोदरच्या वक्त्यांनी सांगि तलं आहे की, घरकुलचा जो प्रकल्प आहे, मी त्या प्रभागाचा नगरसेवक आहे. आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती आहे की, चुकीच्या पध्दतीने काम करणा-याची चौकशी करुन तो जर दोषी असेल, म्हणजे त्याला असं म्हणायचं असेल की,सभागृहामध्ये कायदा करा, महापालिका आपली स्वायत्त संस्था आहे आणि त्या माध्यमातून आपल्याला काही बदल करता आला तर ते केलं पाहिजे. हा विषय अभिनंदनास पात्र आहे अनाथांच्या संदर्भामध्ये कायदा करुन १ टक्का आरक्षण देणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही पहिली महापालिका होते याचा सार्थ अभिमान आपल्या सगळयांना वाटला पाहिजे. आणि ख-या अर्थाने आपण शाहू महाराजांचा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आणि महात्मा फुले यांचा वारसा चालविण्याचा प्रयत्न करतो आहे. या सभागृहामध्ये काम करणारे आम्ही सर्व नगरसेवक आहोत. या विषयाच्या संदर्भात काही कमी/जास्त झालं तर सोडून द्या साहेब,आपण अनाथांच्या संदर्भामध्ये संवेदनशिल राहीले पाहिजे. अनाथांच्या संदर्भात एखादा कागदपत्र मिळाला नाही तर त्याला आपल्या महापालिकेच्या दारामध्ये आपण शासनाकडे त्याचे पाय झिजवायची वेळ येणार नाही अनाथांना आपल्याला जेवढया चांगल्या सुविधा देता येतील, आपल्याला एक पाऊल पुढं टाकून जेवढं काय करता येईल यासाठी आपल्याला कुठल्या कायद्यात बदल करायचा असेल तर मा.आयुक्त साहेब, मा.महापौर आपल्याला विनंती करतील यापुढच्या काळामध्ये या संदर्भामध्ये चांगले निर्णय करण्यासाठी निश्चितच आपण प्रयत्नशिल राहू, हा विषय तर खूप चांगला आहे, अभिनंदनास पात्र आहे. आणि या महापालिकेच्या माध्यमातून आपण अपंगाच्या मागे उभा राहीलो, पुढच्या काळामध्ये आपण अनाथांच्या मागे तेवढयाच ताकदीने उभे राहू. एवढंच याप्रसंगी सांगतो धन्यवाद.

**मा.चंद्रकांत इंदलकर ( सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं गरीबांना स्वस्तात घरे उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीनं केंद्र शासन,राज्य शासन आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि ज्यांना घर मिळणार आहे त्या लाभार्थ्यांच्या स्वहिश्यातून १३२५० घरे बांधण्याचा प्रोजेक्ट चिखली सेक्टर १७ आणि १९ या दोन ठिकाणी बांधण्याचा संकल्प केलेला होता. परंतु या पहिल्या टप्प्यामध्ये ६७२० सदनिका बांधण्यासाठी जागा उपलब्ध झालेली होती. आणि दुस-या जागेचे

,

नियोजन अद्याप नाही. आजपर्यंत जी काही घरे बांधलेली आहेत त्यामध्ये १५८ इमारती बांधण्याचे नियोजन आहे यामध्ये आपल्याला ६६३६ सदनिका उपलब्ध होतील. यापैकी १२९ इमारती मधील ५४१८ घरांच वाटप झालेलं आहे. आणि यामधील ५०४९ सदनिकांचा प्रत्यक्ष ताबा देण्यात आलेला आहे. प्रत्यक्ष ताबा न दिलेल्या सदनिकांची संख्या ३६९ आहे यासाठी पुढील प्रक्रीया चालू आहे पुढील ज्या काही २९ इमारती आहेत त्या इमारती ज्याप्रमाणे बांधुन पूर्ण होतील त्याचा ताबा प्राप्त होईल त्याप्रमाणामध्ये प्रतिक्षा यादीतील आरक्षणाप्रमाणे त्याचे वाटप करण्यात येईल.

**मा.दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, १३२५० घरांपैकी ६७२० घरे बांधलेली आहेत बाकीच्या घराचं काय झालं आणि आपण १३२५० घरांचे लाभार्थीकडुन त्यांचा स्वहिस्सा घेतलेला आहे. उरलेल्या घरांचे काय करणार आहात याचा खुलासा देणेत यावा. त्याठिकाणी अर्धवट काम आहे त्याच्या पुढील कामासाठी निधी बंद केलेला आहे का असं काही आहे का? त्याठिकाणी ५/६ बिल्डींग अर्धवट आहेत.

**मा.चंद्रकांत इंदलकर (सहा.आयुक्त)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, याठिकाणी २ टप्प्यामध्ये घरे बांधण्याचे नियोजन होतं. पहिल्या टप्प्यामध्ये जे लोक होते ज्यांना घरे देणार होतो त्यांचेच पैसे याठिकाणी भरुन घेतलेले आहेत. आणि दुसरा टप्पा रद्द केल्यामुळे त्यांचे पैसे भरुन घेतलेले नाहीत. पहिल्या टप्प्यामध्ये ज्या नागरीकांनी पैसे भरलेले नाहीत, किंवा ज्यांचा संपर्क झालेला नाही अशा नागरीकांचा हक्क आपण रद्दबादल केलेला आहे.आणि मग पुढचे जे नागरीक आहेत दुस-या टप्प्यामधील त्यांना आपण प्रतिक्षा यादीप्रमाणे त्यांना घर उपलब्ध करुन देण्याची संधी देत आहोत.यामध्ये आपण सुरुवातीला ८७५ लोकांचा स्वहिश्याची रक्कम जमा केलेली नाही त्यामुळे आपण त्यांना घर देत नाही तर पुढची जी यादी आहे ८६४ लोकांची नवीन प्रतिक्षा यादी आरक्षणनिहाय तयार करण्यात आलेली आहे.आणि त्यांना पहिले ५० हजार रु. भरण्याबाबत आपण ते भरुन घेतलेले आहेत, त्यांना पत्र दिलेले आहेत त्याच्यानंतर दुसरा जो स्वहिस्सा आहे ३ लाख २६ हजारांचा तो ही आपण त्याठिकाणी जर ते स्वत: भरत नसतील तर त्यांना बँकेच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न आपण याठिकाणी करत आहोत. दुसरा मुद्दा जे बिल्डींग अपूर्ण आहेत त्यामध्ये २० बिल्डींगचं काम पूर्ण व्हायचे आहे. ते ज्याप्रमाणे पूर्ण होईल त्याप्रमाणे आपण सोडती काढत असतो आणि सोडती काढल्यानंतर त्याच वाटप करीत असतो.

,

**मा.दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, माझा प्रश्न सोपा आहे. १३२५० घरांचा प्रकल्प होता त्यापैकी ६७२० घरकुल बांधलेली आहेत.

**मा.महापौर** – पिंपरी चिंचवड शहरामध्ये जेवढया घरकुल योजना चालू आहेत याची सर्व डिटेल्स प्रत्येक नगरसेवकाला पोहोच करावी .

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ४०३ विषय क्रमांक- ९
दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.झोनिपु/८/कावि/१३९/२०१९, दि.१२/०२/२०१९
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.५१ दि.२७/२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम १९७१ (सुधारणा, पुर्नवसन व पुर्नविकास इ.) नुसार संरक्षणपात्र झोपडीधारक यांना JNNURM/BSUP अंतर्गत सदनिका वाटप करणेत येतात त्याचप्रमाणे चिखली प्राधिकरण से.नं.१७ व १९ मध्ये EWS धारकांसाठी पात्रता व अटी शर्तीनुसार म्हाडा आरक्षण प्रमाणे सदर सदनिका वाटप करणेत येतात. तथापि अनाथ असणारे पती/पत्नी हे समाजाचे घटक असताना त्यांना BSUP अंतर्गत सदनिका देणेसंबंधी कोणतेही धोरण निश्चीत नाही. मनपा BSUP विभाग मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाने महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक-२/४/२०१८ अन्वये अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातुन १% समांतर आरक्षण लागु करणेस मान्यता दिली आहे. यास्तव पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत अनाथ असणारे पती/पत्नी यांचेकरीता महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक २/४/२०१८ नुसारचे धर्तीवर अनाथ पती/पत्नी यांना BSUP अंतर्गत मनपामार्फत सदनिका वाटप संबंधीचे खालील अटी शर्तीनुसारचे धोरण मा.महापालिका सभा मान्यतेनुसार निश्चीत करणे आवश्यक आहे.

१) महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक-०२/०४/२०१८ नुसार व वेळोवेळी शासनाचे यासंबंधी

,

निर्गमीत होणारे शासन निर्णयानुसार BSUP अंतर्गत उपलब्ध असणारे सदनिकामध्ये अनाथ पती/पत्नी यांना खुल्या प्रवर्गातुन १% रक्कम समांतर आरक्षण ठेवणेत येईल.

२) महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.संदर्भ २०१३/प्र.क्र.१०९/य३ दि. /६/२०१३ नुसार अनाथ असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

३) अनाथ असणा-या पती किंवा पत्नी यांचे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत कमीत कमी तीन वर्ष वास्तव्य असणे आवश्यक आहे. भाडयाने राहत असलेस नोंदणीकृत भाडेकरार(लिव्ह ऍन्ड लायसन्स) आवश्यक आहे.

४) शासनाचे व पिंपरी चिंचवड मनपा योजनाअंतर्गत सदनिका मिळालेली नसावी.(हरकत घेतलेली नसावी) तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत घर/जागा/सदनिका नसावी. याबाबत प्रतिज्ञापत्र आवश्यक असेल.

५) मनपाचे सदनिका उपलब्ध नसलेस अनाथ पती/पत्नी यांना सदनिका उपलब्ध करुन देणेसंबंधी मनपावर कोणतेही बंधन असणार नाही.

६) मनपा निश्चीत करतील त्या सदनिका किमतीच्या प्रमाणात (GST) लागु असल्यास त्यासह) नियमानुसारची स्वहिस्सा रक्कम खुला प्रवर्गनुसार भरणे आवश्यक राहील.

७) अनाथ पती/पत्नी यांचे मतदार यादीत नाव असणे आवश्यक असेल तसेच रेशन कार्ड,पॅनकॉर्ड, आधार कार्ड आवश्यक असेल.

८) रहिवासी दाखला आवश्यक असेल.

९) मा.आयुक्त वेळोवेळी निश्चीत करतील त्या अटी/शर्ती बंधनकारक असतील तसेच सदर धोरणानुसार पात्र करणे सदनिका वाटप करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील आणि कोणतीही अटी/शर्ती,शासन निर्णय तरतुदींचा भंग केलेस दिलेली सदनिका कोणतेही कारण न देता रद्द करणे,स्वहिस्सा रक्कम जप्त करुन मनपा कोषागारात जमा करुन घेणेत येईल व त्यासंबंधीचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना असतील.

मनपा हददीतील श्री.सुजीत कुमार नाईक हे पती/पत्नी अनाथ असुन त्यांनीही BSUP अंतर्गत विशेष बाब म्हणुन सदनिका मिळणेस शासनास विनंती अर्ज केला होता. शासन नगर विकास विभाग यानी पत्र क्र.पीसीसी - ३०१८/प्र.क्र.२७८/नवि-२२, दिनांक १२/११/२०१८ नुसार मनपा सभा मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करावी असे कळविले आहे. त्याप्रमाणे वरील प्रमाणे धोरण निश्चीत झालेनंतर श्री.सुजीत कुमार नाईक यांना

,

BSUP अंतर्गत नियमानुसार सदनिका देणेत येईल. तरी वरील प्रमाणेचे अनाथ पती/पत्नी यांना BSUP अंतर्गत सदनिका देणेकामीचे धोरण निश्चीती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर विषया मधील अटी शर्तीमध्ये आवश्यक व योग्य बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त साहेब यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा. विकास डोळस** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- १०

दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सुवर्णा बुर्डे, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव.
२) मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.४७ दि. ७/२/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.३८६ दि.२२/२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथिमक शिक्षण विभागाच्या १०५ शाळा कार्यरत असून या शाळांमध्ये अंदाजे ११५० मुख्याध्यापक/शिक्षक कार्यरत असून ३८,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तरी शिक्षण विभागावर नियंत्रण राखणेची संपूर्ण जबाबदारी प्रशासन अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना शिंदे यांच्यावर आहे. तरी शिक्षण विभागात सद्यस्थितीत त्यांचे कामकाज चांगले नसून याबाबत मनपाच्या नगरसेवकांच्या व नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. तसेच त्यांना सोपविललेल्या कामाची प्रशासन अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना शिंदे या टाळाटाळ करीत आहेत. तरी यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्रतिमा समाजात मलीन होत आहे. प्रशासन अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना शिंदे यांच्या अशा कामकाजामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील पट नक्कीच कमी होणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्रतिमा खराब होणार आहे. तरी त्यांना महाराष्ट्र शासनाकडे परत पाठविणेस मान्यता देणेत यावी.

,

**मा.लक्ष्मण ठंडे**- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.राजेंद्र गावडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- ४०४ विषय क्रमांक- १०
दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सुवर्णा बुर्डे, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव.
२) मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.४७ दि. ७/२/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.३८६ दि.२२/२/२०१९

विषय क्रमांक १० दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकुल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.योगीता नागरगोजे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ११
दिनांक - ६/६/२०१९ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. नरवि/कावि/६/२५३७/२०१८ दि.२४/१२/२०१८
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.३५३ दि.४/२/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.३८७ दि.२२/२/२०१९

,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये नगररचना योजना TP Scheme राबविण्यासाठी M/s HCP Consultant यांची विहीत प्रकीया पार पाडून सल्लागार म्हणुन नेमणुक झालेली आहे. त्या अनुषंगाने दिं. २७-११-२०१८ रोजी M/s HCP Consultant यांचे प्रतिनिधीं समवेत उपसंचालक, नगररचना यांची चर्चा झाली असुन खालील तक्त्यात नमुद गावांच्या भागांमध्ये एकुण १५ नगररचना योजना (TP Scheme) राबविणे शक्य आहे.

| अ. क्र. | गावाचे नाव | नगररचना योजना (TP Scheme) राबविण्याचे क्षेत्राचा तपशील | अंदाजे क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| १ | थेरगाव | स.नं. - १,२,३, ३४,३५, ३६,३७ | ३९.०० |
| २ | चिखली | गट.नं. - १०३ ते २०८, २१० ते २१२, २१९, २२१ ते २४७ ,२५६ ते २७४, २८४, २७६ ते २७८, ३५० ते ३५७, ३९७, ४१८ ते ४२०, ४४५ ते ४६०, ५०१ ते ५१५, ५२१ ते ५२४, ४९६ ते ५००, ४२१, ४४४, ४६१, ४६२, ४१३, ५१६, ४९६, ४९४, ४७६, ४७४, ४६३ ते ४६९ , ४४३, ४२२ ते ४३०, ४४१, ४६९, ४७०, ४३१, ४३२, ४३३, ४२६, ४४२, ४७१, ४७३, ४७२, ४१२, ४११, ४१०, ४०९, ४०८, ४१४, ४१६, ४१७, ४०४, ४०६, ३९८, ४०७, ४०३, ४०५, ३९६, ३५८ ते ३८४, ४०२, ३२५ ते ३२९, ३८५ ते ३९७, ४००, ४०१, ४३६ ते ४४०, ४७७ ते ४९७, ५१८, ५१९, ५३०, ५२६, ५२७, ५३३, ५१७, ५२९, ५२०, ५२८, ५२५, ५३२, ५३४, ५३५, ५३३, ५३६ ते ५३८, ३४३, ३४६ ते ३४९, २७९, २७५, २८०, ३४५, ३४२, ३४४, २८१, ३४१, ३४०, ३३६, ३३०, ३३२, ३३३, ३२२, ३२४, ३२३, ३३४, ३३५, ३००ते ३२१, २८२, २९७, २९८, २९९, २९५, २९३, २८८, २८६, २८४, २८३ ,२८५, २८७, २८९, २९१, २९१, २९०, २९६, २९२, २९४, २५५, २५१, २५०, २५४, २५३, २५२, २४८, २४९. | १२८.०० |
| ३ | चिंचवड | स.नं. - ८, १३, १७, १८, १९, २०, २१, २२, ४१, ४२, ४३, ४४, ४५ , ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ७०, ७१, ७२, ७३, ३६, ८१, ८२, ८३ ,८४, ८५, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९२, ९३, ९४, ९५, ९६, ९७, ९८, ९९, १००, १०१, १०२, १०३, १०४, १०५, १०६, १०७, १०८, १०९, ११०, १११, ११२, ११३, ११४, ११५, ११६, ११७, ११८, ११९ ,१२०, १२१, १२२. | ११४.०० |
| ४ | च-होली | न.र.यो. क्र. १ - स.नं. - १२ ते २७ ,१६० ते १६९, १७२ ते १८२ , १८४ ते १९१ , १९३ ते १९७ , १९९ ते २००, २११ ते २००,२२१ ते २३२, २३३ ते २४८, २५०, २५० ते २५८ , २६० ते २६२, २६४ ते २८३ | २०६.०० |

,

| | | | |
|---|---|---|---|
| | | न.र.यो. क्र. २ - स.नं. ४३१, ४८३ ते ४८९ , ४४६ , ४४८ पै , ४४९ पै , ४५० पै, ४५१ ते ४५८ , ४६१ , ४६४ ते ४६८ , ३८० ते ३८४ , ३८५ ते ३९१, ३९३ ते ३९५ , ३९६ पै, ३९६ पै , ३९२ पै , ३७९ पै , ३७९ पै , ३५८ ते ३६१ , ३६३ ते ३६४ , ३६७ ते ३६८ . | ११७.०० |
| | | न.र.यो. क्र. ३ - स.नं. ४३२ ते ४३५ , ४२५ ते ४२८ , ४४१ , ४४३ ते ४४५ , ४४७ , ४४८पै , ४४९ पै ४५०पै , ३९९ ते ४१० , ३५२ ते ३५७ , ३७० ते ३७८ , ३९७ पै , ३९६ पै, ३९२ पै , ३७९ पै , ३६९ पै , ३४७, ३९२ पै , ३७९ पै , ३६९ पै , ३४७ | १७९.०० |
| ५ | रावेत | न.र.यो. क्र. १ – स.नं. - ३२, ३४, ३१, ४१, ४२,४८ ,४९, ५०, ५१, ५२, ५३, ५९, ५४, ५६, ५५, ५७, ५८, ६३, ६२, ६४, ६५, ६०. | ५०.०० |
| | | न.र.यो. क्र. २ – स.नं.- ७३, ७२, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ८२, ८१, ८०, ७९, ८३, ३८, ८४, ८५, ७८, ७७, ९५, ९४, ९३, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९२, ९७, ९८, ९९, १००, १०१, १०३, १५०, १५१, १५३, १४९, १४८, १५२, १४५, १४६, १४३, १४२, १४०, १३९, ११३, ११४, ११७, ११८, १२१, १२२, ११०, १०५, १०४, १०९, ११६, ११९, १२०, १०६, १०७, १३७, १३८, १३६, १३४, १३५, १३३, १३२, १२३. | २५०.०० |
| ६ | किवळे | स.नं. - १ ते ६ , ८ ते २२ , ३७ , ७९ ते ८३ , ८५ , ८८ ते १०२, ११० | २८७.०० |
| ७ | पुनावळे | स.नं. - ११ ते १४ , १६ ते २७ , २८ ते ४० , ४१ ते ४८ , ५० ते ५३ | ३९१.०० |
| ८ | ताथवडे | न.र.यो. क्र. १ - स.नं. - २८ ते ४१ , ४२ पै , ६२ ते ८० , १२६ , १२९ पै , १३३ ते १७१, | १९०.०० |
| | | न.र.यो. क्र. २ - स.नं. - ८६ , ८९ ते १०० , १०१ ते ११५ , ११६ ते १२७ | १५६.०० |
| ९ | मामुर्डी | स.नं. - १ ते ४ , ६ ते १२ , १३ पै , १९ पै , ३२ पै , ३३ ते ३५ | १०४.०० |
| १० | डुडुळगाव | न.र.यो. क्र. १ - गट. नं. - १९१ पै ते १९६पै, १९७ ते २००, २०१पै ते २०२ पै, ३०५, २०६, २१०, २११, २१२पै ते २१६पै, २१७, २१८, २२३ ते २४०, २४३ पै, २४१पै, २४२, २०४पै. | १३०.०० |
| | | न.र.यो. क्र. २ - गट. नं. - ५० , ५१ पै, ५४ ते ६४, ६५पै ते ६६ पै, ६९ ते १०३, १७५ ते १८२, १८३ पै ते १८६ पै, १८८पै, १८९ पै. | ५९.०० |
| ११ | मोशी | न.र.यो. क्र. १ – गट नं - ५२६, ५२७, ५३०, ५२५, ५२३, ५२१, ५१९, ५१५, ५१४, ५१३, ५१२, ५१०, ५०९, ५०६, ५०७, ५३१, ५३२, ५३३, ५३४, ५३५, ५३६, ५३७, ५३८, ५३९, ५४०, ५१८, ५१७, ५१६, ५०८, ५०४, ५०३, ५०२, ५०१, ४९५, ४९४, ४९२, ४९३, ४९७, ४९८, ४८८, ४८९, ४८७, ४८६, ४९०, | १०२.६९ |

,

| | | | |
|---|---|---|---|
| | | ४९१, ४८३, ४८५, ४८४, ४७८, ४७७, ४८२, ४७७, ४८१, ४८०, ४७९, ४७६, ४७५, ४७३, ४७४, ४७२, ४७१, ४७०, ४६९, ४६७, ४६८, ४६६, ४६५, ४५१, ४५०, ४५३, ४५४, ४५५, ४५६, ४५७, ४५९, ४५८, ४४२, ४४१, ४४३ ( सर्व जुने ) | |
| | | न.र.यो. क्र. २ – गट नं - ४३५, ४३४, ४३३, ४३२, ४३९, ४१८, ४१९, ४३०, ४२९, ४२८, ४१७, ४१६, ४१८, ४२७, ४१५, ४१४, ४१३, ४१२, ४२६, ४२५, ४२३, ४२४, ४२१, ४२२, ४०२, ४०४, ४०७, ४०५, ४०३, ४०१, ४०८, ४०९, ४१०, ३८८,, ३८९, ३९६, ३९७, ३९१, ३९०, ३९३, ३९२, ३९४, ३९५, ३९६, ३८१, ३८२, ३८३, ३८४, ३८५, ३८०, ३७९, ३३९, ३३८, ३३७, ३३६, ३३४, ३३५, ३३३, ३३१, ३३०, ३२९, ३२८, ३२७, ३२६, ३२४, ३१७, ३१८, ३१९, ३२०, ३२२, ३२१, ३२४, ३२३, ३१६, ३१५, ३१४, ३१३, ३१२, ३११, २४९, २४७, २४६ ( सर्व जुने ) | ९३.५१ |
| १२ | बो-हाडेवाडी | न.र.यो. क्र. १ मौजे बो-हाडेवाडी मधील शेती विभागातील जमीन रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतच्या म. प्रा. न. र. व अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करावयाचे क्षेत्र. | ७८.२२ |

सबब वरील तक्त्यात नमुद केलेल्या गावांमधील क्षेत्रात तसेच मा. आयुक्त वेळोवेळी तातडीनुसार सुचवतील त्या क्षेत्रासाठी तसेच सोबतच्या नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नगररचना योजना (TP Scheme) राबविण्यास मान्यता देणेस, व मा.महापालिका सभेच्या मान्यतेने महानगरपालिका क्षेत्रात नगररचना योजना (TP Scheme) राबविण्याचे निश्चित होणा-या क्षेत्रात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतुदी नुसार सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास उदा. नगररचना योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे, प्रारूप नगररचना योजना मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सल्लामसलतीने तयार करून प्रसिध्द करणे, हरकती/सुचनांचा विचार करणे, तदनंतर प्रारूप नगररचना योजना शासनास मान्यतेसाठी सादर करणे इत्यादी प्रकीया करण्यास मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास देखील मान्यता देणेत यावी.

**मा. भिमाबाई फुगे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नितीन काळजे**- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह हा विषय करीत असताना ज्यावेळेस १९९७ साली काही गावं महापालिकेमध्ये समाविष्ठ झाली त्यावेळेस

,

टीपी तयार होत असताना अनेक शेतक-यांच्या आमच्या खूप जमीनी गेल्या, रस्त्यामध्ये गेल्या, माझ्या पण जमीन गेल्या होत्या.परंतु आमच्या काही शेतक-यांचा विरोध असल्यामुळे या टीपी स्कीमला माझ्या प्रभागामधील च-होली भाग असेल,डुडुळगांव असेल तसेच मोशी भागातील प्रभाग क्रमांक ३ मध्ये समाविष्ठ असलेला भाग टीपी स्कीम राबविण्यातून वगळण्यात यावा. अशी विनंती करतो तसेच ज्यावेळेस नवीन टीपी तयार होत असताना काही रोड मधील असतील,आरक्षणामध्ये असतील आमच्या समाविष्ठ भागातील शेतक-यांच्या विहीरी होत्या त्या विहीरी या रस्त्यामध्ये गेलेल्या आहेत वारंवार पाठपुरावा करुन देखील या विहीरीच्या बाबतीत आजपर्यंत कुठलंही धोरण तयार झालं नाही. यापुर्वी पण मी पत्र दिली होती. परंतु या विहीरी जात असताना त्या शेतक-याचं क्षेत्र ब-यापैकी शिल्लक असत परंतु या चांगल्या प्रकारे माझ्या गावामधील जवळ,जवळ १५/२० विहीरी या रस्त्यांमध्ये जातात पण या विहीरीसाठी त्याच योग्य ते मुल्यांकन करुन त्या विहीरीची टीडीआर सोडून त्या विहीरीचं व्हॅल्युशन काढून त्या विहीरीची भरपाई मिळाली याच्यामध्ये मी पण उपसूचना देतो आणि ही उपसूचना स्विकारावी तसेच मोशी भागामध्ये आपलं एक आरक्षण असुन त्या आरक्षणामध्ये पुणे महापालिकेच्या कचरा डेपोसाठी आपली ती जागा घेण्यासाठीचा आजही प्रयत्न कलेक्टर ऑफिसनी सुरु केलेला आहे त्या गोष्टीला आपल्या महापालिकेतर्फे सुध्दा आणि आम्ही नगरसेवक म्हणुन सुध्दा विरोध करतो. कारण तसं पाहिलं तर आपलाच कचरा आपल्या मोशी डेपोमध्ये त्याची विल्हेवाट लावू शकत नाही त्यामुळे दुसरा कचरा आपल्या महापालिकेच्या वतीने तुम्ही त्याचा पाठपुरावा करुन हा कचरा आपल्या इथं न आणण्याचा आपण त्यांना एक पत्र द्यावं आणि आमचा या गोष्टीला पूर्ण विरोध आहे.थांबतो जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.नामदेव ढाके** –मा.महापौर साहेब ठरावास मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपळे निलख येथील स.नं.६५,६२, ६४, ६६, ६, ७, ८, ९, १०, १२, २०, २१, २२, २४, २५, २७ इ. मधील क्षेत्र मंजूर विकास योजनेत शेती विभागात दर्शविण्यात आलेला आहे. मनपा नदी सुधार प्रकल्प राबविणार असल्याने सदर क्षेत्रातील निळी पुररेषेमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वरील स.नं.६५, ६२, ६४, ६६, ६, ७, ८, ९, १०, १२, २०, २१, २२, २४, २५, २७ इ.नदी कडील हरित क्षेत्रात नगररचना योजना (TP Scheme) राबविण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये नगररचना योजना TP Scheme राबविण्यासाठी M/s. HCP

,

Consultant यांची विहीत प्रक्रिया पार पाडून सल्लागार म्हणून नेमणूक झालेली आहे. त्या अनुषंगाने दि.२७/११/२०१८ रोजी M/s. HCP Consultant यांचे प्रतिनिधी समवेत उपसंचालक, नगररचना यांची चर्चा झाली असून खालील तक्त्यात नमूद गावांच्या भागांमध्ये एकुण १५ नगररचना योजना TP Scheme राबविणेस मान्यता देणेत यावी.

वरील विषयांत नमूद केलेल्या गावा व्यतिरीक्त खालील प्रमाणे क्षेत्राचा समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | गावाचे नाव | नगररचना योजना (TP Scheme) राबविण्याचे क्षेत्राचा तपशील | अंदाजे क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | स.नं. ३११ पै., ३१४ पै., ३१५ पै., ३१६ पै., ३१७ पै., ३१८ पै.,३१९ पै., ३२० पै., ३२१ पै., ३२२ पै. | ६.० |
| २ | पिंपळे सौदागर | स.नं. २ पै., १९ पै., २३ पै., २४ पै. | १४.४० |
| ३ | चिंचवड | स.नं. २८५ पै., २८६ पै.,२८७ पै.,२८८ पै.,२८९ पै., २९० पै., २९१ पै., २९२ पै., २९३ पै., २९४ पै., २९५ पै., २९६ | १३.५० |
| ४ | वाकड | २६० पै., २६१ पै., २६२ पै., २६३ पै.,२६४ पै., २६५ पै., २६६ पै., २६७ पै., २६८ पै.,२६९ पै.,२७९ पै.,२७० पै.,२७१ पै., २७२ पै., २७३ पै., २७४ पै., २७५ पै., २७७ पै., २७८ पै., २७९ पै., १४,१८,१९,२२ पै., २३ पै.,२५ पै.,२८ पै.,२७ पै.,३२ पै.,३४ पै.,३५ पै. | २५.० |

वरील प्रमाणे नमूद केलेल्या क्षेत्राचा नगररचना योजना TP Scheme राबविण्यासाठी समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये नगररचना योजना TP Scheme राबविण्यासाठी M/s HCP Consultant यांची विहीत प्रकीया पार पाडून सल्लागार म्हणून नेमणूक झालेली आहे. त्याअनुषगाने दि. २७/११/२०१८ रोजी M/s HCP Consultant यांची

,

प्रतिनिधी समवेत उप संचालक, नगररचना यांची चर्चा झालेली आहे. खालील तक्त्यात नमुद गावांच्या भागामध्ये नगररचना योजना (TP Scheme) राबविणे शक्य आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | नगररचना योजना (TP Scheme) राबविण्याचे क्षेत्राचा तपशिल | अंदाजे क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | बो-हाडेवाडी | प्रभाग क्र. 2 बो-हाडेवाडी नगररचना योजना क्र. १ बो-हाडेवाडी नविन गट नंबर 657 / 658 / 659 / 660 / 697 / 710 / 713 / 714 / 715 / 717 / 718 / 719 / 720 / 661 / 662 / 663 / 664 / 665 / 666 / 676 / 677 / 678 / 679 / 680 / 681 / 682 / 683 / 684 / 685 / 686 / 687 / 689 / 691 / 692 / 693 / 694 / 695 / 696 / 651 / 652 / 653 / 654 / 650 / 632 / 633 / 634 / 635 / 636 / 637 / 638 / 639 / 640 / 641 / 642 / 643 / 644 / 646 / 647 / 648 / 649 / 727 / 728 /167 पै. / 166 पै / 165 पै /164 पै /163 पै/162 पै./159 पै/ 158पै / 631 /630 /602 /601 /603 /600 /598 /567 /593 /626 /628 /629/670/543 | ५० | |
| | | प्रभाग क्र. 2 बो-हाडेवाडी नगररचना योजना क्र. २ बो-हाडेवाडी नविन गट नंबर 2 / 3 / 4 / 5 / 6 / 7 / 8 / 9 / 10 / 11 / 12 / 13 / 14 / 15 / 16 / 17 / 18 / 19 / 20 / 21 / 22 / 23 / 24 / 25 / 26 / 27 / 28 / 29 / 30 / 31 / 32 /33 / 34 / 35 / 63 / 64 / 65 / 67 / 82 / 83 / 84 / 85 / 86 / 87 / 88 / 89 / 90 / 91 / 92 / 93 / 94 / 99 / 100 / 740 / 741 / 743 / 745 / 749 / 750 / 746 / 752 पै / 753 / 754 / 755 / 756 / 757 / 721 / 722 / 723 / 724 | ५० | |

,

सबब वरील तक्त्यात नमुद केलेल्या गावांमधील क्षेत्रात तसेच मा. आयुक्त वेळोवेळी तातडी नुसार सुचवतील त्या क्षेत्रासाठी तसेच सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे प्रमाणे नगररचना योजना (TP Scheme) राबविण्यास मान्यता देणेत यावी व मा. महापालिका सभेच्या मान्यतेने महानगरपालिका क्षेत्रात नगररचना योजना (TP Scheme) राबविण्याचे निश्चित होणा-या क्षेत्रात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतुद नुसार सर्व वैद्यानिक कार्यवाही करण्यास उदा- नगररचना योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे, प्रारूप नगररचना योजना मा. संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सलामसलतीने तयार करून प्रसिध्द करणे, हरकती / सुचनांचा विचार करून तद्रंतर प्रारूप नगररचना योजना शासनास मान्यतेसाठी सादर करणे इत्यादी प्रक्रीया करणेस मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रधिकृत करणेस देखील मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | गावाचे नाव | नगररचना योजना (TP Scheme) राबविण्याचे क्षेत्राचा तपशील | अंदाजे क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | स.नं. ३११ पै., ३१४ पै., ३१५ पै., ३१६ पै., ३१७ पै., ३१८ पै.,३१९ पै., ३२० पै., ३२१ पै., ३२२ पै. | ६.० |
| २ | पिंपळे सौदागर | स.नं. २ पै., १९ पै., २३ पै., २४ पै. | १४.४० |
| ३ | चिंचवड | स.नं. २८५ पै., २८६ पै.,२८७ पै.,२८८ पै.,२८९ पै., २९० पै., २९१ पै., २९२ पै., २९३ पै., २९४ पै., २९५ पै., २९६ | १३.५० |
| ४ | वाकड | २६० पै., २६१ पै., २६२ पै., २६३ पै.,२६४ पै., २६५ पै., २६६ पै., २६७ पै., २६८ पै.,२६९ पै.,२७९ पै.,२७० पै., २७१ पै., २७२ पै., २७३ | २५.० |

,

| | | | |
|---|---|---|---|
| | | पै., २७४ पै., २७५ पै., २७७ पै., २७८ पै., २७९ पै., १४,१८,१९,२२ पै., २३ पै.,२५ पै.,२८ पै.,२७ पै.,३२ पै.,३४ पै.,३५ पै., | |
| ५ | रहाटणी | स.नं. ५० पै, १२६ पै.१२७ पै.१२८ पै.,१२९ पै., ४५ पै. | १०.३ |
| | रहाटणी | स.नं. ६९ पै., ७० पै., ७१ पै., ७२ पै., १२९ पै.,७४ पै. | १३.९ |
| | रहाटणी | स.नं.९७ पै., ९९ पै., ९१ पै.,९२ पै., ९३ पै., ९० पै.,८९ पै., | १४.३ |

वरील प्रमाणे नमूद केलेल्या क्षेत्राचा नगररचना योजना TP Scheme राबविण्यासाठी समावेश करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच पिपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत नगररचना योजना (Town Planning Scheme) बाबत महापालिका सभेतील विषय क्र. ११ यामधील मौजे थेरगाव येथील स.नं. २४ व २५ चा समावेश Town Planning Scheme मध्ये करण्यास व Town Planning Scheme मध्ये स.नं.२४ व २५ येथे सुध्दा Town Planning Scheme राबविण्यास मान्यता देणेत यावी. तसेच विषयामधील अनुक्रमांक ४ वरील च-होली भागाचा व अनुक्रमांक १० वरील डुडूळगाव भागाचा तसेच मोशी भागातील प्रभाग क्र. ३ मध्ये समाविष्ठ असलेल्या सर्व्हे नंबरचा भाग टि.पी.स्किम राबविण्याचे प्रस्तावामधुन वगळणेस मान्यता देणेत यावी. तसेच ज्या शेतक-यांच्या विहीरी DP Plan मध्ये जातील त्यांना TDR सह वेगळी भरपाई देणेस मान्यता देणेत यावी. तसेच ज्या नगरसदस्यांना हा विषय मान्य असेल अशा नगरसदस्यांचे प्रभागात टी.पी. स्किम राबविण्यास व ज्यांना मान्य नसेल अशा नगरसदस्यांचे प्रभागातील टी.पी. स्किम वगळण्या बाबतचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यास मान्यता देण्यात यावी.

**मा.सुरेश भोईर** –मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.योगीता नागरगोजे**- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.सचिन चिखले** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरं तर नगररचना योजना TP Scheme अंतर्गत राबविण्यास मान्यता देत आहोत यामध्ये

,

थेरगांव असेल, चिंचवड असेल,रावेत असेल,च-होली असेल ,किवळे,पुनावळे,ताथवडे, मामुर्डी, डुडुळगांव,मोशी असे असंख्य स.नं. दिलेले आहेत. आणि याच्यावर तुम्ही सल्लागार नेमला,सगळं व्यवस्थितपणे केलं आणि सभागृहासमोर दिला आहे. महापौर साहेब मी तुम्हांला नम्रपणे विनंती करतो की, या विषयाची थोडीशी माहिती देणे गरजेचं आहे.

**मा.राहूल कलाटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह,हा विषय आपण TP Scheme चा आणलेला आहे. हा विषय असताना आपल्या शहरात एक्झीस्टींग डीपी आहे त्याची अंमलबजावणी आपण करतोय. आपण बरेचसे रोड, आरक्षणे ताब्यात घेतलेले नाहीत. म्हाळुंगेला डीपी आला साहेब तुम्ही म्हणले चांगलं आणलं, मुख्यमंत्र्यानी गिते साहेबाच कौतूक केलं पण त्याठिकाणी डीपी नव्हता. आपल्याकडे डीपी आहे. मी आपल्याला उदा.देतो ताथवडे, पुनावळे आर झोन आहे साहेब तरी तिथं तुम्ही डीपी आणलेला आहे. थेरगांवचा ग्रीन,वाकडचा ,पिंपरीचा ग्रीन हे आम्हांला मान्य आहे. पण याठिकाणी निश्चितच त्या त्या भागातील शेतक-याचे वाद निर्माण होतील. आज माझं आहे आता मला माहिती पाहिजे की, सगळं आर झोन हे चांगल्या मेन रोडला आहेत आणि उद्या तुम्ही मला एक व्हा आणि टीपी स्कीममध्ये जा असं सांगितलं तर तो जाईल का? तो तयार होईल का ? कुठं तरी या सगळया गोष्टीचा बारकाईने विचार केला की नाही केला. साहेब तुम्ही किवळे,पुनावळे विचारलं का त्या त्या भागातील लोकप्रतिनिधींना, तुम्हीं मिटींग घेतली आणि सादरीकरण केलं, तुम्ही त्यांची बैठक घेतली का? साहेब तुम्ही एक्झीस्टींग डीपी ची अंमलबजावणी करण्यास सक्षम नाहीत.आणि नवीन डीपीची प्रोसेस तुम्ही सुरु केलेली आहे. ती प्रोसेस एका बाजुला, टीपीची प्रोसेस एका बाजुला, आहे ते करतोय ते एका बाजुला, म्हणजे साहेब नक्की चाललंय काय यामध्ये सगळयांचा समन्वय आहे का माझ्या प्रभागात पुनावळे, ताथवडे येतोय ताथवडेचा स.नं. २८ आर झोन मध्ये आहे, ४१,८६,८९ इथ शेत झोन आहे, तुम्ही इथं डायरेक्ट टीपी स्कीम सुरु केली. तुम्ही त्या भागातील शेतक-यांना विश्वासात घेतले किंवा नाही, ताथवडेचे , थेरगांवचे जे ग्रीन आहे जी लॅण्ड लॉस झालेली आहे त्याठिकाणी तुमचा टीपी स्कीम आम्हांला मान्य आहे.पण ज्या ठिकाणी एक्झीस्टींग आर झोन आहे तिथं तुमची टीपी स्कीमची प्रक्रिया सुरु आहे तुम्ही आता सांगितल की, रोड डेव्हलप करा ते करतील का, ते म्हणतील टीपीची काय स्कीम आहे ते बघु आणि नंतर करु. शहरावर कुठलीही गोष्ट लादताना एक्झीस्टिंग परिस्थितीचा विचार करावा. तुम्ही डायरेक्ट विषय याठिकाणी

,

आणलेला आहे यामध्ये गावंची गाव याच्यामध्ये टाकलेली आहेत. तुम्ही या शेतक-यांना विचारणा करावी.

**मा.महापौर** – आयुक्त साहेब खुलासा करतील.

**मा.आयुक्त** – सन्मा.महापौर, सन्मा.सभागृह आता जो विषय सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे नगररचना योजना टीपी स्कीम राबविण्याच्या क्षेत्राच्या बाबतीमध्ये मंजुरी घेण्यासाठीचा विषय ठेवण्यात आलेला आहे. सन्मा.सदस्यांनी आता काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यावेळेला आपण टीपी स्कीम करण्याची योजना ज्यावेळेला आली त्यावेळेला पहिल्या प्रथम आपण अहमदाबाद येथे त्यावेळेला अभ्यास करण्यासाठी निघालो त्यावेळेला पहिल्यांदा पार्श्वभुमी आपण त्यांच्या समोर ठेवली की,सन्मा.नगरसेवकांना टाऊन प्लॅन स्कीमचं महत्व कशा पध्दतीनं आहे याचे सादरीकरण त्याठिकाणी ठेवण्यात आलेलं होतं त्यानंतर आपण एजन्सीची नियुक्ती केली. टाऊन प्लॅन स्कीम करणं हा एक डीपी इम्प्लीमेंटचाच प्रकार आहे. सभागृहाच्या समोर क्लेरीफिकेशन करु इच्छितो की,त्यावेळेला आपण डेव्हलपमेंट प्लॅन तयार केलेला असतो डेव्हलपमेंट प्लॅन मध्ये आरक्षणे ठेवलेली असतात, आरक्षणे आपल्याला ऍक्वायर करावी लागतात. आणि ॲक्वीझेशन करण्यासाठी सध्याची जी पध्दत आहे त्याच्यासाठी आपण एक ॲक्वीझेशन पध्दतीने आपण ऍक्वायर करतो, कम्पलसरी ॲक्वीझेशन पध्दतीने लॅण्ड ॲक्वीझेशन ॲक्टनुसार आपण ऍक्वायर करतो.अथवा टीडीआर किंवा डीआर च्या माध्यमातून आपण किंवा एफएसआय च्या माध्यमातून आपण ऍक्वायर करतो. पण अनेक वेळेला आपण सर्वजण जाणता की, अनेक वर्षापासून सुमारे ९५ सालापासून आपला डीपी जो अस्तित्वात आहे त्याची अंमलबजावणी करताना अनेक आरक्षणे आपण इम्पलीमेंट करु शकलो नाही. याचं कारण ॲक्वीझेशन मध्ये येत असलेल्या अडचणी किंवा निधीची कमतरता अनेक वेळेला नागरीक ज्यांची जमीन आरक्षणाखाली जाते त्या आरक्षणाची जमीन दिल्यामुळे जमीनीपासून वंचित रहातात पण त्यांच्या आजुबाजुचे जे नागरीक असतात त्यांना फायदा होतो. त्यामुळे डीपी प्रोसेस मध्ये अनेक वेळेला काहींचा फायदा होत असतानांच अनेकांचा तोटा देखील त्या प्रक्रियेमध्ये होत असतो. आणि यामुळे अत्यंत तयार पध्दतीने ऐरिया डेव्हलपमेंट करायची असेल तर त्यासाठी टाऊन प्लॅनिंग स्कीम किंवा लॅण्ड पोलींग स्कीम यांचा उपयोग केला जातो. आणि या तत्वाचा

,

वापर करुनच आपण आरक्षणे विकसीत करण्याचे धोरण हे यामध्ये ठेवलेलं आहे. त्यामुळे पहिल्या प्रथम सर्व नगरसेवक/ नगरसेविकांनी लक्षात ठेवण आवश्यक आहे की, आपण टीपी स्कीम म्हणजे नवीन डीपी आणत नसुन आपण एका एरियाचा ओलीस्टीक आहे ती आरक्षणासह डेव्हलप करीत आहोत आणि ही डेव्हलपमेंट करीत असताना केवळ ज्याची जमीन आरक्षणाखाली जाते त्यालाच नुकसान न देता तीच नुकसानी सर्वांमध्ये इक्वल करतो आहोत.आणि जेणेकरुन सर्वांचा फायदा जेवढा तोटा होईल तो सर्वांचा तोटा इक्वल प्रमाणामध्ये शेअर करणं या पध्दतीने विकास करण्याचं हे धोरण आहे. मला विश्वास आहे की, आपण या शहरामध्ये महानगरपालिकेने विकास करताना खूप मोठया प्रमाणात आरक्षणे विकसीत केली आणि ती विकास करीत असताना अनेकांना अनेक अडचणी भोगाव्या लागल्या. अनेकांच्या मनामध्ये त्या टीपी स्कीमच्या बाबत संदेह आहे पण आज आपण जी सभागृहात प्रक्रिया करतो आहे ती केवळ सुरुवात आहे. सर्व जे भूधारक आहेत त्यांच्याशी चर्चा करण्यासाठीचा आज केवळ आपण प्रशासनाला देत असलेला कौल आहे. ही प्रक्रिया झाल्यानंतर आम्ही त्या नागरिकांशी बसून संपुर्णतः प्रक्रिया त्यांच्या समोर उलगडून सांगणार आहोत. कशा पध्दतीने टाऊन प्लॅन स्कीम राबविली जाईल. आरक्षणे कशा पध्दतीने विकसीत केली जातील. कशा पध्दतीने त्यांच्या जमीनीचं वर्गीकरण केलं जाईल,कशा पध्दतीन त्यांना कमी/जास्त ऍडजेस्टमेंट केले जातील, कोणाला किती फायदा होईल. दुसरी गोष्ट जो फायदा मला या शहरात विशेष करुन हा टीपी प्लॅन डेव्लप करण्यात दिसतो. गेल्या दोन वर्षापासून मी पहातोय इकडच्या स.नं.ची जी स्थिती आहे ती अनेक वर्षापासून लांबोळक्या स्वरुपाच्या स्ट्रीप स्वरुपामध्ये इकडचे स.नं. आहेत आणि त्याच्यामध्ये सब डिव्हीजन होत,होत खुप निमुळत्या स्ट्रीप अनेकांच्या मालकीच्या आहेत. टाऊन प्लॅन स्कीम करीत असताना आरक्षण तर विकसीत होत असतंच पण ते होत असताना प्रत्येकाच्या प्लॉट साईजेस देखील रेग्युलाईझ होत असतात आणि चांगले डेव्हलप पेपर्स प्लॉट त्या माध्यमातून निर्माण होत असतात. आणि त्यामुळे डेव्हलपमेंट प्रोटेक्शनमध्ये देखील वाढ होत असते.अनेक ठिकाणी आपल्या शहरात चांगला विकास झालेला आहे. पण आज जे स.नं.आपल्यासमोर ठेवतो आहोत ते असे स.नं.आहेत की,जे अद्यापही कुठल्याही स्वरुपाच्या विकासापासून वंचित राहीलेले आहेत. याठिकाणी आरक्षणाचा देखील खूपच कमी प्रमाणात विकास झालेला आहे. प्रायव्हेट डेव्हलपमेंट देखील तुरळक स्वरुपाची किंवा अस्तित्वात नसलेली अशीच आपण लॅण्ड फोर्स,लॅण्ड पार्सलस् आपण स्विकारलेल्या

,

आहेत. मला निश्चितपणे विश्ववास आहे की, आज जर आपण ही प्रक्रिया सुरु केली तर सर्व तिकडचे भूधारकांना विश्वासात घेऊन त्यांना सर्वांना पूर्णपणे पारदर्शीपणानं कशा पध्दतीनं त्या जमीनीचा विकास केला जाणार आहे त्यांच्यात कसा त्यांचा फायदा आहे या प्रक्रियेमध्ये महानगरपालिकेला देखील काही जागा ॲक्वायर करता येणार असून त्याच्या सेलमधुन जे प्रोसीडींग्स आपल्याला मिळतील त्यातून त्या ऐरियाचा देखील विकास करणं शक्य होणार आहे.आणि या सर्व बाबींचा एकत्रित विचार करुन कुठल्याही प्रकारे डीपी ला बाधा न आणता आपण टाऊन प्लॅन स्कीमची अंमलबजावणी करणार आहोत. पॅरलली जरी आपण डीपी चे डेव्हलपमेंट करीत असलो तरी नवीन डीपी तयार करीत असताना टाऊन प्लॅन स्कीम राबविताना त्याची कुठलीही बाधा येणार नाही याची देखील आपण खबरदारी घेत आहोत. नागरीकांना पूर्णपणे विश्वासात घेतले जाईल. केवळ आजची प्रक्रिया ही संपुर्ण टीपी स्कीम करण्याच्या इंटेन्शन डिक्लेअर करण्याची पहिली स्टेप आहे. यानंतर सगळया नागरिकांच्या त्या परिसरातील भूधारकांच्या बैठका घेतल्या जातील त्यांना विश्वासात घेऊन पूर्ण बाबी समजावून त्यांच्या मतानुसार टीपी स्कीम विकसीत करण्यात येईल. आणि त्यानंतर पुनश्च सभागृहाच्या मान्यतेने, राज्य शासनाच्या मान्यतेनंतरच त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यामुळे ही केवळ सुरुवात आहे ही केल्यास आपल्याकडे एक नवीन चांगले धोरण एक चांगल्या पध्दतीची अंमलबजावणी शहर विकासासाठी आपल्याकडे उपलब्ध होणार आहे.आणि त्यामुळं या विषयाला सभागृहाची मान्यता मिळावी अशी मी सभागृहासमोर विनंती करतो.

**मा.राहूल कलाटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आयुक्त साहेब आपण आता सांगितलं आहे की, कुठल्याही प्रकारे डीपी ला हात न लावता या टीपी प्लॅन स्कीमची अंमलबजावणी करणार आहोत. दुस-या बाजुला म्हणताय मनपा ॲक्वीझेशन पण करावं तिस-या बाजुला म्हणताय की, फक्त आम्ही चर्चा करण्याच्या परवानगीला बेसिक स्टेजला आहे आता जे आपण बोललो तेच सांगतोय**.** चौथ्या बाजूला म्हणताय टीपी करतोय आपण साहेब तुम्ही यातली बरेचसे स.नं.काढले तर ब-याचशा गावातील डेव्हलपमेंट थांबेल लोक काय म्हणतील टीपी येणार आहे मला अजुन १० वर्ष ताब्यात द्यायचं नाही. होणार ना साहेब, तुम्ही सांगताय ते आम्हांला मान्य आहे. आता वाल्हेकरवाडीचा काही भाग जो नदीला लागून आहे,थेरगांवच्या मागचा काही भाग नदीचा भाग आहे. आज त्याठिकाणी जायला पुर रेषा नाही,तिथं जायला –यायला पर्याय नाही, त्या भागातील लोक आरक्षण देण्यास तयार होणार नाहीत. आणि हे सगळं आशेवर आहे पुढं आपलं चांगल होईल त्यामुळे आता नका तुम्ही असं काही करत बसाल, तुम्ही बेसिक

,

प्लॅन द्या. तिथं सगळयांना इंटरेस्ट आहे करण्याचा आता तुम्ही सांगाल हे निमुळता पट्टा आहे, समजा एक उदा.देतो माझी पट्टी रस्त्याला आहे,माझा या टीपी ला विरोध असणार आहे म्हणजे या सुध्दा बेसीकच्या अडचणी होतील. आपण ब-याचशा भागामध्ये रस्त्याची कामं काढलेली आहेत. ती सगळी कामं ठप्प होतील. हे जर का सगळ वाचलं तर लोक म्हणतील आता कशाला द्यायचं बघु टीपी झाल्यावर बघू त्यामुळे आपले काम डिले होईल. आपलं आरक्षण दुसरीकडे जाईल. तुम्ही करताय त्याच इन्टेन्शन किल् अर आहे पण हे करत असताना याचा पूर्ण अभ्यास करुन प्रक्रिया पूर्ण करुन घ्या. बेसिक याच्यावर तुम्ही राबवू नका,याचं सक्सेस पाहिलं तर शहरातील नागरीकांची मतं बदलतील. नाही तर तुम्ही असे जर ठराव केले तर उद्या हे सगळे स.नं. इकडं तिकड फिरत राहतील. तुम्हांला करायचं असेल तर एकदम व्यवस्थित करा. ठराव जरी केला वाल्हेकरवाडी असेल,थेरगांव असेल जवळ जवळ सगळे पुररेषा आहेत किंवा समांतर आहे त्याचं तुम्ही काय करणार आहात. या सर्व गोष्टीचा आपण अभ्यास करावा अशी विनंती आहे.

**मा.संदीप वाघेरे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आता जो टीपी स्कीमचा विषय आणलेला आहे राहूलभाऊ जे म्हणले ते बरोबर आहे. ग्रीन झोन आणि बल्यू लाईनला पॅरलल ग्रीन झोन त्याच्यामध्ये आलेला आहे. आज आपल्याला आयुक्त सो. जो नदीत प्रोजेक्ट राबवायचा आहे त्याच्यामध्ये एरिगेशन डिपार्टमेंटकडुन जी ब्ल्यू लाईन टाकलेली आहे ती पूर्ण महाराष्ट्रात कुठंच राबवित नाही फक्त पिंपरी चिंचवड शहरात आहे, आणि आता पुण्यामध्ये आलेली आहे. बाकी नाशिकला नाही, मुंबईला न्राही बाकी कुठंच नाही. हे आपण त्यावेळेला एरिगेशन डिपार्टमेंटकडुन मार्कींग करुन पुररेषेची ब्ल्यू लाईन तुमच्या मानगुटीवर बसलं आयुक्त सो.आपण जी टीपी करतोय ती त्या टीपीमध्ये साधारणपणे एखादया शेतक-याची एक जागा असेल तर २० गुंठे जागा त्याला भेटेल किंवा डेव्हलप प्लॉट भेटेल २० गुंठयामध्ये जी आरक्षणे आहेत ती सगळयामध्ये डिव्हाईड होतील, काही आरक्षण महापालिकेकडे येतील, आणि त्या शेतक-याची जागेचे १०० टक्के नुकसानच आहे. ब्ल्यू लाईन किंवा शेती ना विकास मध्ये असल्यामुळे नुकसानच आहे. १ एकरच्या जागी २० गुंठे भेटली तर त्याला २० गुंठयाच प्रोटेक्शन त्याला पूर्ण १ एकरच भेटल. आणि १.७ एरिया म्हणजे त्याच प्रोटेक्शन २.७ झालं. आयुक्त सो.तुम्हांला खरंच सांगतो की, पिंपरी चिंचवडच प्रत्येकांनी जागा विकुन मोकळे झालेले आहेत.आणि जे काही मागचे राजकारणी झालेले आहेत किंवा आताचे

,

आहेत यांनी फक्त स्वत:चा फायदा बघीतला आणि बाकीचे जे भूमीपुत्र आहेत ते गरीब कसे राहतील आणि माझाच कार्यकर्ता म्हणुन कसा राहील एवढाच विचार केला. माझं म्हणणं आहे की, प्रत्येक माणुस सुधारला पाहिजे, त्याची प्रगती झाली पाहिजे. आता राहुलचं म्हणणं आहे की, अंमलबजावणी झालं, तुम्ही पूर्ण सर्व्हे करुन,पूर्ण प्लॅनिंग करुन एक,एक एरिया आता समजा तुम्ही १२ ठिकाणी डीपी दाखवत आहात तिथं अजुन ५/६ ठिकाणचा सर्व्हे केला. त्यामध्ये पिंपरी, चिंचवड,वाकड आहे, पिंपळे सौदागर आहे, भले तिथं १० एकर असेल,६ एकर असेल किंवा २५ एकर असेल जेवढं काही क्षेत्र असेल त्यात जे शेतकरी असतील समजा १० हजार शेतकरी असतील तर त्यापैकी ५ हजार शेतक-यांना डेव्हलप प्लॉट मिळतील. म्हणजे आपल्या महापालिकेला वेगवेगळे रिर्झव्हेशन आणि आर्थीक फायदा होईल. साधारणपणे १ टीपीचं इम्प्लीमेंट झालं पूर्ण नदीच्या कडेचं ब्ल्यू आणि ग्रीन याचं काऊंट केलं तर १० ते १२ हजार एकर क्षेत्र पूर्ण बारीक होत आहे. पिंपरी चिंचवड मध्ये इंद्रायणी,पवना आणि मुठेचं मुळासह पकडून या सगळया लोकांच पकडून ८० टक्के सगळे स्थानिक भूमीपुत्र आहेत त्यांना रोजगाराचं साधन उपलब्ध होईल. त्यांना त्यांच्याकडून पैसे येतील.आणि महापालिकेला सुध्दा २० ते २५ हजार कोटी रु. चा फायदा होईल. आणि वेगवेगळे क्षेत्र डेव्हलप करता येतील. आणि तुम्ही आता जे नवीन प्रोजेक्ट करताय त्या अनुषंगाने पण हे पैसे आपण नदी सुधारचा प्रोजेक्ट होत आहे त्यासाठी खर्च केला तर आपण फॉरेन मध्ये गेल्यासारखं होईल आणि त्या नदीचा लुक बदलेल. आणि आयुक्त सो.तुम्ही २०० कोटीचे बाँड काढलेले आहेत पण तुम्ही १ ते २ हजार कोटीचे बाँड काढून ते काम द्यावे आणि ते काम देतानी कोणी सांगेल की, त्याचे दोन पार्ट करा, चार पार्ट करा हे काम असं करा, तसं करा पण माझी आपल्याल विनंती राहील की,कुठल्याही मोठया कंपनीला हे काम द्यावे त्यामध्ये एल ॲण्ड टी कं.असेल, टाटा कं.असेल, जी कोणती मोठी कंपनी असेल त्यांना द्यावे. मोठया कंपनीला काम दिल्यामुळे त्यांचे इन्फ्रास्ट्रक्चर मोठया प्रमाणात असते त्यामुळे ते आपल्याला वेळेत पूर्ण काम करुन देतील.आणि आपल्या पिंपरी चिंचवड मधील वेगवेगळे ठेकेदार लावले तर त्यांच्याकडुन नदी सुधार योजना होणार नाही आणि बाकीच्या ज्या गोष्टी आहेत त्यामध्ये डीपी प्लॅन जो आहे त्याची अंमलबजावणी करावयाची असेल तर या बीओटी स्तरावर करावं एवढं बोलतो आणि थांबतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

,

